# एक
# नवी गुलामगिरी

लेखक

जिर एन्. बाल्डविन

IRBK-0105312

IRBK-0105312

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. 4392

डॉ. फु - ५३१२

# एक नवी गुलामगिरी

( " A New Slavery " या पुस्तकाचा अनुवाद )

अनुक्रम
विभाग 2383
वाचनालय

लेखक

रॉजर एन्. बाल्डविन

का. क्र. 41392
IRBK-0105312

१९५५

किंमत दोन रुपये

# "A NEW SLAVERY"

( Forced Labor : The Communist Betrayal of Human Rights. )

by

Roger N. Baldwin, Editor.

Copyright 1953 by Oceana Publications, New York.
The book is Reproduced by permission of the Publisher
Oceana Publications, New York.

—: प्रकाशक :—

**पंडित अनंत कुलकर्णी,**
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६, शनवार, पुणें २.

—: मुद्रक :—

**न. शं. कुलकर्णी,**
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७, शनवार, पुणें २.

# एक नवी गुलामगिरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 30963
विभाग
क्रमांक 2343
नों. दि.
वाचनालय मुंबई

लेखक

रॉजर एन्. बाल्डविन

नवें प्रकाशन

डॉक्टर

( The Physicians )

अनुवादक

वि. वि. बोकील

किंमत दोन रुपये

## ग्रंथकर्त्यासंबंधीं थोडें

रॉजर नॅश बाल्डविन यांचा जन्म वेलस्ली मॅसाच्यूसेटस येथें २१ जानेवारी १८८४ रोजीं झाला. १९०४, १९०५ सालीं त्यांनीं A. B. आणि A. M. या हार्वर्ड युनिव्हर्सिटींतील पदव्या मिळवल्या. बाल्डविन हे राजकीय सुधारक असून त्यांनीं आपलें सर्व आयुष्य नागरिकांच्या व मानवी हक्कांच्या संरक्षणाप्रीत्यर्थ खर्च केलें आहे.

१९१७ ते १९५० पर्यंत अमेरिकन नागरिक स्वातंत्र्यसंघाचे ते डायरेक्टर होते. आणि ह्याच काळांत ते त्या संस्थेचे नॅशनल चेअरमन झाले. १९४७ मध्यें जपान व कोरिया यांजवरील युनायटेड स्टेट्सच्या अधिकाऱ्यांचे नागरिकत्वाच्या हक्कांसंबंधींचे सल्लागार होते. १९४८ सालीं जर्मनी व आस्ट्रियामध्येंहि अशाच तऱ्हेचें काम त्यांनीं केलें. १९५० पासून मानवी हक्कांसाठीं स्थापिलेल्या आंतरराष्ट्रीय संघाचे ते अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. हा संघ म्हणजे अनेक राष्ट्रांतील नागरी स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं अस्तित्वांत आलेला संघ आहे.

बाल्डविन् ह्यांनीं स्वातंत्र्य-प्रश्नावर अनेक पुस्तकें व लेख लिहिले आहेत. सर्वंकष सत्तेविरुद्ध त्यांनीं सतत झगडा केलेला आहे. 'एक नवी गुलामगिरी' या त्यांच्या नव्या पुस्तकांत लेखी पुरावा सादर करून लोखंडी पडद्याआडच्या वेठबिगारींचें दर्शन त्यांनीं वाचकांना घडविलें आहे.

# प्रस्तावना

सोव्हिएट सरकारनें आपल्या राज्यांत आणि सोव्हिएट अंकित कम्युनिस्ट राष्ट्रांनीं आपल्या देशांत सुरू केलेल्या गुलामांच्या वेठविगारीसंबंधीं माहिती सांगणारा हा पहिला सप्रमाण लिहिलेला आणि मला वाटतें, सत्यपूर्ण असा ग्रंथ आहे. जागतिक कम्युनिझमबद्दल विचार करणाऱ्या प्रत्येकानें ज्या ग्रंथाकडे लक्ष दिलें पाहिजे. असा हा ग्रंथ आहे.

रशियाबद्दल सहानुभूति असणारे लोक आरंभीं रशियांतील वेठविगारींच्या छावण्यांची तरफदारी करतांना म्हणत कीं, त्या केवळ क्रांतीच्या काळांतील कडवट घटना आहेत. पण त्या काळांत हें क्षम्य, असें समजावयाचें म्हटलें तर आतां क्रांतीचा खडतर जन्मकाल संपल्यालाहि एक पिढी झाली. चालू कम्युनिस्ट वेठपद्धति व गुलामांच्या लावण्याची पद्धति म्हणजे नागरिकांच्या बंडांतून अचानक उद्भवलेला तात्कालिक दुर्दैवी चमत्कार नव्हे. या पद्धति म्हणजे कम्युनिस्ट सरकारचा निश्चित व कायम स्वरूपाचा विशेष आहे. या दोन्हींची सांगड घालून पोलिस राज्यांतील दडपशाही व अर्थव्यवस्था राखलेली आहे. सतत दहशत बसविण्यासाठीं विचार-पूर्वक आंखलेल्या योजनेचा तो एक भाग आहे. क्रेमलिनच्या अधिपत्याखालीं असलेल्या कम्युनिस्ट यंत्रणेनें आपली सत्ता व अर्थव्यवस्था टिकवून धरण्यासाठीं हें खात्रीचें म्हणून हाताशीं धरलेलें एक साधन आहे.

जगानें मानवी गुलामगिरी ही उत्पादनाचें साधन म्हणून मानली असली तरी सुसंस्कृत राष्ट्रांनीं अशा गुलामगिरीचा शंभर वर्षांपासून निषेधच केला आहे. आणि आतां आपल्या काळांत तीच जुनी पद्धत आणखी दुष्ट स्वरुपांत सुरू झाली आहे ही एक भयानक सत्य घटना आहे

पुढें आलेल्या पुराव्यावरून ही दुष्ट पद्धति अस्तित्त्वांत आली असल्याचें निःसंशय सिद्ध होत आहे. लोखंडी पडद्यामागील मिळणारा पुरावा आणि आंकडे पाहतां सोव्हिएट अंकित राष्ट्रांत वेठीला धरलेल्या लोकांसाठीं कोठें कोठें छावण्या आहेत यांचे नकाशेसुद्धां काढतां येतात. स्वतः कम्युनिस्ट सरकारांनीं जे कायदे पास केले आहेत त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, कम्युनिस्ट देशांत असलेले भारी उद्योगधंदे आणि तथाकथित निर्मिति–योजना यासाठीं फार मोठ्या प्रमाणावर गुलाम राबविले जात आहेत.

भारी उद्योगधंद्यासाठीं कारखाने उभारण्याची योजना. नैसर्गिक संपत्तींत वाढ करण्याची योजना, वहातुकीचीं साधनें या प्रदेशांत वाढविण्याची योजना या सर्व योजना कैदी गुलामांच्या छावण्या कायम ठेवण्यानें आणि गुप्त पोलिसांतर्फे त्यांत सतत मजूर भरती करण्यानेंच पार पडणार आहेत हें अगदीं स्पष्ट आहे. कैदी

जगण्यासाठीं असहाय्यपणें अधिक झगडतात आणि झगडून झगडून हजारोंनीं मरतात. पण त्याची ही सतत दुबळी होत जाणारी मनुष्य–शक्ति राष्ट्राच्या आर्थिक व लष्करी फायद्यासाठीं वापरली जाते.

एका शतकापूर्वी अस्तित्वांत असलेल्या गुलामांच्या पद्धतीपेक्षां ही नवी पद्धति अत्यंत निर्घृण व अमानुष आहे. त्यावेळीं गुलाम ही चीज मोलाची आहे असें मालकांना वाटे आणि त्यामुळें त्यांच्याकडून भरपूर कष्ट करवून घेण्यासाठीं त्यांना भरपूर जेवूं खावूं घालण्याची व त्यांना जगवण्याची मालक काळजी घेत. कम्युनिस्टांच्या सिद्धांताप्रमाणें आजचे वेठकरी हें 'गुन्हेगार' आहेत. म्हणून त्यांच्या जीवनासाठीं चाललेल्या अखेरच्या धडपडींतील वेदना ही त्यांना मिळणारी न्याय्य शिक्षा आहे. मनांच्या आणि शरीरांच्या अधःपाताबद्दल कम्युनिस्ट पद्धति पूर्ण उदासीन असतें.

येथें आम्हांला मिळालेल्या माहितीबद्दल कांहीं थोडें सांगितलें पाहिजे. वेठबिगारी आणि गुलामांच्या छावण्या या दोन्ही पद्धतींचा अंगिकार करणाऱ्या सरकारांनीं निःपक्षपाती निरिक्षकांना ह्या पद्धतीचें प्रात्यक्षिक पाहण्यासाठीं बोलाविलें नाहीं हें अगदीं उघड आहे. यामुळें जीवर अवलंबून राहावें अशी तेथील अस्सल सरकारी माहिती किंवा अधिकृत माहिती अगदींच थोडी आहे. सोव्हिएट रशियानें आणि त्याच्या अंकित राष्ट्रांनीं संयुक्त राष्ट्रांकडून केल्या जाणाऱ्या चवकशीला कडकडून विरोध केला. त्यामुळें दुय्यम दर्जाच्या पुराव्याचाच उपयोग करणें भाग पडेल. पण असा पुरावा अपूर्ण असला तरी तो आहे हें निश्चित आणि त्याचें योग्य पृथक्करण केलें तर तो विश्वसनीय वाटण्यासारखाच आहे.

या देशांत वेठ कायदेशीर ठरविणारे जे कायदे आहेत ते आमच्याजवळ आहेत. पकडलेले लेखी पुरावे आमचेजवळ आहेत. उदाहरणार्थ "१९४१ ची राष्ट्रीय अर्थविकासासाठीं आंखलेली सरकारी योजना'– ही प्रकाशित करावयाची नाहीं असें ठरलेलें असूनहि ती योजना महायुद्धाचे काळांत जर्मनांचे हातीं लागली आणि युद्धाचे अखेरीस ब्रिटिशांच्या हातीं लागली. कांहीं प्रदेशांतील सोव्हिएट छावण्यांसंबधींचे नियम आणि सोव्हिएटच्या कबुलीचे मधून मधून मिळालेले लेखी पुरावे आमचेजवळ आहेत. अशा रीतीनें आम्हांला जें म्हणावयाचें तें म्हणण्यास पक्का आधार आहे.

थोड्या थोडक्या नव्हे तर या छावण्यांतून निसटलेल्या बहुसंख्य स्त्रीपुरुषांनीं सांगितलेल्या स्वानुभवाशीं हा लेखी पुरावा ताडून पहातां येण्यासारखा आहे. या

लेखी पुराव्यांत सोव्हिएट सरकारचे मधून मधून काढलेले हुकूम असून ते पाश्चिमात्य देशांच्या हातीं लागलेले आहेत. त्या सोव्हिएट सरकारच्या हुकुमांनीं वेळोवेळीं सुदृढ माणसें पकडून सक्तीनें भरती करण्याची विनंति गुप्त पोलिसांना केलेली आहे. आर्थिक योजनांच्या परिपूर्तीचे आंकडे व पुरावाहि या पद्धतीच्या अस्तित्वाची साक्ष देतात. मोठमोठ्या प्रदेशांतील पुरावा तोकडा असला तरी तो एकत्र केल्यावर एका नव्या गुलामगिरीची पद्धति निःसंशय अस्तित्वांत आल्याची तो साक्ष देतो.

या विषयाचा अभ्यास चालू असतां अभ्यासाचें एक उपांग म्हणून अमेरिकन उदार मतवाद्यांना रशियन हुकूमशाहीचें सत्य सिद्ध करून दाखवणें कसें अवघड गेलें हेंहि बाल्डविन् यांनीं सांगितलें आहे. हें अवघड जाण्याचें कारण बाल्डविन्नीं असें दिलें आहे कीं, अमेरिकन उदारमतवाद्यांचा रशियन घोषणांवर विश्वास होता आणि अखेरपर्यंत या घोषणा प्रत्यक्षांत येतील अशी उत्कट आशा त्यांना वाटत होती. नाझींच्या नागड्या भयानक धोरणांवर प्रारंभीं अनेक अमेरिकनांचा विश्वास वसत नसे. तें इतकें अविश्वनीय भयानक होतें कीं अमेरिकनांनीं त्यावर विश्वास ठेवणें शक्य नव्हतें. तसेंच कम्युनिस्ट धोरणाबद्दलहि झालें. दुर्दैवानें वस्तुस्थिति अशी आहे कीं, परराष्ट्र खात्यांतील नवख्या लोकांचा परकी सरकारें काय म्हणतात यावर विश्वास वसतो. उलट धिम्या वृत्तीचे लोक सरकार काय करतें यावरून काय ठरवायचें तें ठरवितात. मि. बाल्डविन् हे सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नसलेले उदार मतवादी आहेत आणि त्यांनीं प्रश्न योग्य रीतीनें पुढें मांडला आहे.

" राजकीय दूषित ग्रहामुळें नव्हे तर कठोर सत्य पाहूनच अमानुष अशा कम्युनिस्ट पोलिस राष्ट्रांमध्यें अस्तित्वांत असलेल्या सिद्धान्ताच्या एका अत्यंत भडक अंगाचा आम्ही निषेध करीत आहों. आणि तें अंग म्हणजे वेठबिगारी. "

हा उदार मतवाद्यांना आणि पुराण मतवाद्यांना दिलेला एक धडा आहे. लिंबाच्या झाडाला आंबे येत नाहींत. लोककल्याण हें मनुष्याच्या आत्म्याच्या अधःपातावर किंवा पद्धतशीर भोगावयास लावलेल्या वेदनांवर कधींच अधिष्ठित होऊं शकत नाहीं. समाजाची प्रगति ही सुसंघटित निर्घृणतेवर कधींच आधारतां येत नाहीं. सतत चालू ठेवलेल्या वर्ग युद्धांतून शांति जन्म घेत नाहीं. मनुष्यजातीच्या दास्यावर तिचें स्वातंत्र्य उभारतां येत नाहीं.

**ॲडॉल्फ ए. बर्ले ( ज्यू. )**
स्वतंत्र युरोपाची राष्ट्रीय समिति.
प्रोफेसर ऑफ् लॉ ( कोलंबिया युनिव्हर्सिटी )

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रंथालय मुंबई

# भाग पहिला

## एका वैयक्तिक दृष्टिकोनांतून दिसलेलें नव्या गुलामगिरीचें स्वरूप

### आशा, शंका आणि भ्रमनिरास

१९३० च्या सुमारास प्रचलित मतप्रणालीपेक्षां भिन्न राजकीय मत-प्रणाली असलेल्या लोकांकडून वेठीनें काम करवून घेण्याची प्रचंड योजना रशियांत अस्तित्वांत असल्याबद्दल अनेक गोष्टी ऐकूं येऊं लागल्या. एवढ्या प्रचंड संख्येनें माणसें अमानुष बंधनांत खितपत असल्याचें कानीं येणारें वृत्त हें अतिशयोक्त असलें पाहिजे असें समजणारांपैकीं मी एक होतों. सोशॅलिस्ट म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रांत मानवी स्वातंत्र्य अधिक असणार अशी इतर उदार मतवाद्यांप्रमाणेंच माझी कल्पना. ती विरोधी पुराव्यानें फोल ठरली असली तरी कोणतीहि हुकूमशाही आपल्या स्वदेशबांधवांना जीवनांतून उखडून दूरवर फेकून त्यांच्याकडून अमानुषपणें वेठबिगारी करवून घेत असेल यावर माझा विश्वास बसेना. चालू राज्यपद्धतीला जनतेचा पाठिंबा आहे हा तेथील सत्तेचा दावा खोटा ठरला. देशाबाहेर जगाच्या पाठीवरील श्रमिकांचा पाठिंबा मिळ-विण्यासाठीं निघणाऱ्या कम्युनिस्ट विनंति-पत्रकांच्या खरेपणालाहि बाध आला.

पण सोव्हिएट पोलिसी राज्याच्या भयानकतेची मला पुरी जाणीव होती. दूर देशीं असणाऱ्या राजबंद्यांना मदत करण्यासाठीं अस्तित्वांत असलेल्या

एका अमेरिकन समितीचा अध्यक्ष म्हणून १९२४ मध्यें मीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्यांत सैबेरियांत हद्‌पार केलेल्या आणि रशियन तुरुंगांत डांबलेल्या लोकांचीं पत्रें होतीं. तीं पत्रें सोशॅलिझम विरोधकांचीं नव्हतीं. सोशॅलिस्टांनीं व त्या वेळीं कम्युनिस्ट पार्टीनें आंखून दिलेल्या धोरणाप्रमाणें वागण्यांत कसूर झालेल्या व म्हणून पार्टींतून हकालपट्टी झालेल्या कम्युनिस्टांनीं लिहिलेलीं तीं पत्रें होतीं.

नंतर थोड्या वर्षांनीं सो. युनिअनमध्यें तीन महिने प्रवास केल्यावर "सोव्हिएटमध्यें मिळणारें स्वातंत्र्य" यावर मीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांतील मीं काढलेला निष्कर्ष हा आतां मला एक साधाभोळा आशावाद वाटतो. त्या वेळीं मात्र माझ्या लिहिण्याचें तात्पर्य असें होतें कीं, प्रभावी गुप्त राजकीय हेरांच्या व सार्वत्रिक नियंत्रणाच्या बळावर एकमेव राजकीय पक्षाची हुकूमशाही रशियांत अस्तित्वांत असली तरीहि मार्क्सच्या तत्त्वज्ञानानें दाखविलेलीं मानवी हक्काचीं व स्वातंत्र्याचीं स्वप्नें वास्तवांत दिसूं लागतील असें मानायला भरपूर जागा आहे.

पण त्या वेळीं बळजबरीनें हजारों शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांच्यावर उपासमारीची व हद्‌पारीची आपत्ति आणणारा सक्तीचा सामुदायिक शेतीचा प्रयोग झाला नव्हता. पार्टीच्या कडक नियंत्रणांनीं ट्रेड युनिअन्स कांचलीं नव्हती. शिक्षणाचें स्टॅलिनीकरण झालें नव्हतें. हुकूमशाहीनें साऱ्या विरोधकांना व भिन्न मतवाद्यांना कठोरपणें चिरडून टाकलें नव्हतें. कम्युनिस्ट पार्टीनें अंतर्गत विरोधकांचा नायनाट करून आत्मशुद्धि केली नव्हती. वेठबिगार ऐकिवांत नव्हती. नाहीं म्हणायला असा कांहींसा नमुना झारशाहींत याप्रमाणें दूरवर सैबेरियांत हद्‌पार केलेल्या किंवा गुप्त पोलिसांनीं 'मजुरांच्या आदर्श छावण्या' म्हणून ज्यांना अभिमानानें संबोधलें होतें अशा छावण्यांतील थोड्या राजबंद्यांना अनुभवायला मिळाला होता. ह्यांतूनच वेठबिगारीच्या प्रचंड यंत्रणेचा जन्म झाला हें उघड आहे.

माझ्यासारख्या परक्या प्रेक्षकानें रशियन राज्यक्रांतीमुळें विलक्षण स्थित्यंतरें होत असलेल्या देशांतील अनिश्चित स्वरूपाच्या आंतरिक शक्तींचें संतुलन निराळ्या दृष्टीनें पहाणें हें अगदीं साहजिक होतें. अनेक प्रकारच्या परस्परविरोधी गोष्टींची पूर्ण जाणीव असल्यानें मी एका गोष्टीविषयीं पूर्ण जागरूक होतों. ती ही कीं, आत्ताच्या परिस्थितींत मिळणाऱ्या पुराव्यानें ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीप्रमाणें जो तो आशादायी किंवा निराशामय चित्र रंगवील. मी स्वतः आशावादी होतों. एवढें खरें कीं, मी आणखी एक पाऊल पुढें गेलों. नंतर माझा विश्वास अस्थानीं होता याची साक्ष मला पटली असली तरी त्या वेळीं मात्र मी असेंच समजत होतों कीं, जागतिक कम्युनिस्ट चळवळ ही लोकशाहीला संपूर्ण पाठिंबा देणार आणि म्हणून भांडवलशाहीला विरोध, शांतता या कोणालाहि प्रिय असणाऱ्या अंतिम साध्यांना जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठीं इतर कांहीं उदारमतवाद्यांबरोबर मींहि संघटनेंत भाग घेतला. सोव्हिएट–नाझी करारानें सर्व मानवता–तत्त्वांना फांसलेला हरताळ आणि लोकशाहीच्या ढोंगाचा केलेला परिस्फोट यामुळें उरलासुरला भ्रमहि नाहींसा झाला. सोव्हिएट पोलिसी राज्य आणि त्याबरोबरच त्याची नोकरशाही आणि वेगवेगळे कम्युनिस्ट पक्ष हे राजकीय किंवा नैतिक दृष्ट्या फॅसिस्ट सत्ताकेंद्रापेक्षां कोणत्याहि बाबतींत निराळे नाहींत आणि त्यांनीं जगन्मुक्तीच्या उच्च स्वरांत केलेल्या घोषणा या दांभिक आणि म्हणूनच मानवी स्वातंत्र्याला अधिकच धोक्याच्या आहेत हें उघड झालें.

अमेरिकेंतील नागरी स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाणारे उदारमतवादी एके काळीं या परदेशांतील हुकूमशाहीकडे आस्थेनें पहात होते, हा एक विरोधाभासच होय. पण ही उदारमतवाद्यांची फसगत सुरवातीला कशी झाली हें समजण्यासारखें आहे. कम्युनिस्ट हे स्वातंत्र्याची घोषणा स्पष्टपणें करीत असल्यानें उदारमतवाद्यांना असा विश्वास वाटत होता कीं, जनशक्ति ही हुकूमशाहीला पायबंद घालील आणि अखेरीस ठरल्याप्रमाणें

हुकूमशाही हळूंहळूं नाहींशी होईल. त्यांना असेंही वाटत होतें कीं, दारिद्र्यावर मात करणें हा जो क्रांतीचा मुख्य हेतु त्यानें स्वातंत्र्याचा पाया घातला जाईल. स्वातंत्र्याच्या या उच्च ध्येयांचा ताठर पोलिसी राज्यसत्तेपुढें बळी गेला हें सिद्ध करायला बऱ्याच पुराव्याची गरज लागली. पण अशा रीतीनें भ्रमनिरास होण्यापूर्वीं नागरी सत्तेचे पुरस्कर्ते रशियांतील हुकूमशाहीनें चालवलेल्या दडपशाहीबद्दल अनुकूल बोलत होते असें नव्हे. त्यांनीं तेथें आणि इतरत्रहि त्या दडपशाहीचा धिक्कारच केला. कम्युनिस्ट, फॅसिस्ट व लोकशाही सरकारांनीं मानवी हक्कांची केलेली पायमल्ली त्यांनीं एकाच मापानें मोजली.

मी जरी व्यक्तिनिरपेक्ष तत्त्वप्रणालींतून हें पुस्तक सादर करीत असलों तरी कम्युनिस्ट राज्याबद्दल किंवा जागतिक कम्युनिस्ट चळवळीबद्दल माझ्या स्वतःच्या प्रतिक्रिया ज्या मीं येथें सांगितल्या आहेत त्यांतून माझ्या कित्येक-किंबहुना माझ्या बहुसंख्य सहकारी व्यक्तींच्या मनांचा गोंधळ व वृत्तिपालट स्पष्ट झाला आहे. त्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, राजकीय पूर्वग्रहानें नव्हे तर वास्तव हकिकतींच्या आधारें कम्युनिस्टांच्या ढळढळींत दिसणाऱ्या अमानुष पोलिसी राज्यांतील एका जुलमाचा निषेध आम्हीं केला आहे आणि तो जुलूम म्हणजे वेठ–बिगार.

## वेठबिगारीची व्याप्ति

वेठ हा केवळ रशियन हुकूमशाहीविरुद्धच आक्षेप आहे असें नव्हे. अनेक ठिकाणच्या पुराव्यावरून हा आरोप प्रत्येक कम्युनिस्ट राज्याविरुद्ध सिद्ध करतां येईल. बऱ्याचशा सत्यकथा पुरेशा उजेडांत आलेल्या नाहींत, किंवा कांहीं अर्ध्यामुर्ध्याच कळलेल्या आहेत. तरी असें म्हणतां येईल कीं, सर्वच नमुने रशियन धर्तीचेच आहेत. राजकीय दृष्ट्या रशियाविरुद्ध असलेल्या, एवढेंच नव्हे तर पाश्चिमात्य राष्ट्रांकडे मदतीसाठीं पहाणाऱ्या युगोस्लाव्हियानेंहि तोच–कम्युनिस्ट पोलिसी राज्याशीं संलग्न असलेला जुलमाचा नमुना अनुसरलेला आहे. या गोष्टी

आम्हीं सादर केलेल्या पुराव्यानंतरहि कित्येकांना अतिशयोक्त वाटतील, किंवा लोहभिंती मागील देशांत चौकशीला प्रत्यक्ष अवसर नसल्यानें व अशा गोष्टी अस्तित्वांत नाहींत असें तेथील सरकारी पत्रकें उच्च रवानें सांगत असल्यानें आमचा पुरावा विपर्यस्त आहे असें वाटेल. परंतु कोणत्याहि सरळ माणसाची खात्री पटवून देणारा हा पुरावा सरकारी छापील कायदे व हुकूमनामे यांवर आधारलेला आहे; राष्ट्रांच्या सरहद्दी भींतीनें ओलांडून आलेल्या शेंकडों लोकांच्या निश्चित व पुनः पुनः दिलेल्या साक्षींवर आधारलेला आहे; सरकारी नियंत्रणांतून गाळून आलेल्या पत्रांवर आणि आतां दुसऱ्या देशांत पळून आलेल्या एके काळच्या कम्युनिस्ट अधिकाऱ्यांनीं प्रकाशांत आणलेल्या सत्यांवर आधारलेला आहे. कम्युनिस्ट राज्यांतील वृत्तपत्रांनीं प्रचंड श्रम योजनांबद्दल आडपडद्यानें केलेल्या उल्लेखांवर आधारलेला तो पुरावा आहे.

अशा प्रकारच्या निर्घृण व भरमसाट उपाययोजनांचा अंगिकार हा स्वतःला लोकसत्ताक म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रांनीं करणें हें विशेष कठोरपणाचें वाटत असलें तरी त्यामुळें दोन व्यावहारिक हेतु साध्य होतात हें सांगितलें पाहिजे. एक म्हणजे जनतेंतील असंतुष्ट व्यक्तींचा कांटा काढला जातो आणि त्यामुळें इतर जनतेला जरब बसते. दुसरी गोष्ट म्हणजे सोशॅलिस्ट पुनर्रचनेसाठीं किंवा लष्करी योजनांसाठीं स्वस्त मजुरांचा भरपूर पुरवठा त्यामुळें होऊं शकतो. सामुदायिक शेतीला विरोध करणाऱ्या एक लाख शेतकऱ्यांना आणि रुमानियांतील आलेल्या वार्तेप्रमाणें म्हणजे ज्यांना संपावर जातांच येत नाहीं, अशा असंतुष्ट मजुरांना पकडून मोठमोठ्या कालव्यांच्या एखाद्या योजनेसाठीं बळजबरीनें राबवायला लावणें यापेक्षां कम्युनिस्ट पोलिसी राज्याला दुसरी फायदेशीर गोष्ट कोणती असणार? मानवी जीविताच्या नाण्यांत दिलेली अशा योजनांची किंमत म्हणजे अल्पच. पुनः जनतेवरील पकड त्यामुळें अधिक बळकट होते आणि विरोधाचा कांटा काढला जातो. बारीकसारीक असंतुष्ट वृत्तींचा कानोसा घेण्यामध्यें तरबेज असणाऱ्या गुप्त पोलिसांच्या मदतीनें चाललेल्या सक्तमजुरीच्या योजनेमुळें

आणि सरकारी नियंत्रण खात्यामार्फत नेमक्या सरकारला पाहिजे असलेल्या गोष्टीच जनतेला कळविल्या जात असल्यामुळें सार्वत्रिक शिस्त राखली जाते.

कम्युनिस्ट राज्यामधील सक्तमजुरीबद्दलच्या आमच्या दूषित पूर्वग्रहामुळें आम्हीं इतरत्र अशाच तऱ्हेच्या चालवलेल्या भयानक गोष्टींकडे कानाडोळा करीत आहोंत असा ग्रह होण्याचा संभव आहे. फॅसिस्ट, सरंजामशाही राष्ट्रांत व वसाहतींत असाच जुलूम नाहीं का ? इतर देशांत कैद्यांच्या छावण्या, दास्य आणि श्वेतवर्णीयांकडून कृष्णवर्णीयांना मिळत असलेली गुलामासारखी वागणूक या गोष्टी नाहींत का ? लोकशाही म्हणून स्वतःबद्दल घोषणा करणारीं कांहीं राष्ट्रें यांसारख्या वाईट गोष्टींपासून अलिप्त आहेत कां ? असें कोणीहि विचारील.

त्याला उत्तर स्पष्ट आहे : असा जुलूम आहे हें खरें; पण ह्यांपैकीं कोणत्याहि देशांत राजकीय छळासाठीं वेठ—मजुरीचा वापर केला जात नाहीं. कम्युनिस्टेतर देशांत वैयक्तिक फायद्यासाठीं, स्वस्त मजूर मिळावे म्हणून किंवा श्वेतवर्णियांची श्रेष्ठता टिकावी म्हणून असा खेदकारक आणि अमानुष जुलूम केला जातो. मानवी हक्कांचे पुरस्कर्ते अशा जुलमांचा धिक्कारच करतात, आणि यासंबंधींच्या सत्य हकिकती सहज मिळूं शकत असल्यानें अशा जुलमांचा निषेध तिथल्या तिथें केला जातो आणि जनमताच्या दडपणाखालीं सुधारणाहि घडवून आणल्या जातात. परंतु कम्युनिस्ट हुकूमशाहीमध्यें असंतुष्टांचा व्यवस्थित कांटा काढण्यासाठीं सतत चाललेल्या पद्धतशीर जुलमाच्या पासंगालाहि इतर देशांतील असले जुलूम येणार नाहींत. अत्यंत निर्घृण अशी फॅसिस्ट किंवा लष्करी हुकूमशाही—अगदीं स्पेन किंवा लॅटिन अमेरिकेंतील हुकूमशाही राज्यें देखील आपली सत्ता कायम टिकविण्यासाठीं अशा तऱ्हेचा जुलूम करीत नाहींत.

## जागतिक मानवी हक्कांसाठीं

हा पुरावा सादर करण्याचा हेतु कम्युनिस्ट पोलिसी राज्याविरुद्ध असलेल्या

लांबलचक आरोपांच्या यादींत भर टाकणें हा नाहीं, तर दूरच्या भविष्यकाळांत साध्य होणाऱ्या परंतु अत्यावश्यक ठरणाऱ्या एका ध्येयाच्या सिद्धीसाठीं सर्वांचा पाठिंबा मिळविणें हा होय. हें ध्येय म्हणजे मानवी हक्कांच्या जागतिक मानदंडाची निर्मिति-कम्युनिस्ट पोलिस राज्यांत असलेल्या वेठबिगारीचें आतांचें स्वरूप निदर्शनास आणणें म्हणजेच त्यांचीं कृत्यें जगाच्या न्यायासनासमोर खेंचण्याचें जें मोठें कार्य त्याच्या दिशेनें पहिलें पाऊल टाकणें आहे.

वेठबिगारीचा तपास करण्यासाठीं संयुक्त राष्ट्रांनीं एक खास समिती नेमली आहे. पण कम्युनिस्ट राष्ट्रांनीं असहकारच केल्यावर किंवा असा जुलूम नाहींच म्हणून असे ठासून सांगितल्यावर अशा समितीकडून तपासाचें कार्य कसें पुरें पडणार ? पण सत्य गोष्टीबद्दल पुरावा मिळाल्यावर समिती पुढील गोष्टी करूं शकेल:—

( १ ) कम्युनिस्ट राज्यांविरुद्ध संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेकडून निषेधाचा ठराव पास करून घेऊन जगभर त्या राष्ट्रांची अप्रतिष्ठा केली जाईल.

( २ ) कम्युनिझमचें आकर्षण त्यांतील धोके दाखवून नाहींसें करतां येईल.

( ३ ) कम्युनिझमनें मानवी हक्कांची चालवलेली मोठी व अमानुष पायमल्ली जगाच्या निदर्शनास आणून मानवी हक्कांसाठीं चाललेल्या प्रयत्नांना जोर चढवतां येईल.

( ४ ) जगांतील असंतुष्ट असणाऱ्या जनतेंत संयुक्त राष्ट्रांबद्दल आशा उत्पन्न होऊन संयुक्त राष्ट्रांची इभ्रत वाढेल.

संयुक्त राष्ट्रांतील बहुतेक सर्व सभासदांनीं जगाच्या इतिहासांत प्रथमच ज्या मानवांच्या मूलभूत हक्कांची जागतिक घोषणा स्पष्टपणें केली त्या मानवी स्वातंत्र्याच्या चिरंतन मूल्यांचा जय व्हावा ही अनेकांची इच्छा व चिंता मी पुढील पानांतील पुरावा सादर करतांना व्यक्त करीत आहें.

• • •

# भाग दुसरा

## संयुक्तराष्ट्रें वेठबिगारीचा अभ्यास करतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर लाखों स्त्रीपुरुष सोव्हिएट रशियांतून किंवा मध्ययुरोपांतून इतर देशांत आश्रयासाठीं येऊं लागले, तेव्हां ह्या देशांत प्रचलित असलेल्या वेठबिगारीच्या छावण्यांबद्दल प्रमाणें मिळूं लागलीं. या छावण्यांत राहून पळून आलेल्या शेंकडों लोकांच्या मुलाखती शपथेवर घेतल्या गेल्या. त्यांनीं दिलेले जबाब एकत्र करून ते प्रसृत करण्यांत आले. ज्या कांहीं गोष्टींविषयीं संशय येत होता आणि ज्या लोकांपासून आजवर दडवल्या गेल्या होत्या त्या गोष्टी उघड करून सांगण्यासाठीं या पळून आलेल्या लोकांतून आणि त्यांच्या पाठीराख्यांतून निवडलेल्या लोकांच्या समित्या नेमण्यांत आल्या. प्रारंभी कांहीं थोड्या लोकांनीं ज्या साक्षी दिल्या त्यांत भर पडून आतां प्रचंड पुरावा जमला.

समितीनें ह्या साक्षी युरोपांत घेतल्या. वर्तमानपत्रांनीं या गोष्टीचा पाठपुरावा केला. अमेरिकन मजदूर संघानें अनेक वर्षें कम्युनिस्ट पोलिसी राज्याचा निषेध केला होता. तसेंच अमेरिकन मजदूर संघामध्यें कम्युनिस्टांच्या पडलेल्या प्रभावाची आणि कम्युनिस्टांची चांगली हजेरी घेतली होती. आतांहि त्याच मजदूर संघानें सर्वांच्या आधीं कम्युनिझमपासून असलेल्या धोक्यासंबंधीं खरमरीनें लिहिण्याचा निर्धार केला. अमेरिकन मजदूर संघ हा त्या वेळीं संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेनें सल्लागार म्हणून मानला होता; म्हणून १९४७ सालीं अधिकृत रीत्या परिषदेनें या गोष्टींचा शोध घ्यावा अशी परिषदेला विनंति करून अमेरिकन मजदूर संघानें हा प्रश्न परिषदेपुढें आणला. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदे-मध्यें यावर खल झाला पण कृति कांहींच झाली नाहीं. दुसरीं निकडीचीं कामें

परिषदेपुढें आहेत या सबबीखालीं हा प्रश्न दोन वर्षे डावलला गेला. तेव्हां आंतरराष्ट्रीय मजदूर संघटनेकडे अमेरिकन मजदूर संघानें विनंतिपत्रक धाडलें; तेथेंहि या प्रश्नावर खल झाला.

## औपचारिक तपासणी

अखेर तपास करण्याच्या बाबतींतील पहिलें पाऊल उचलायला १९४९ साल उजाडलें आणि तेव्हांहि अगदीं प्राथमिक स्वरूपाचेंच कार्य झालें. आणखी दोन वर्षे गेलीं, आणि नंतर आंतरराष्ट्रीय मजदूर संघटनेच्या सहकार्यानें संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेनें निश्चितपणें कामाला सुरवात केली. एवढ्या अवधींत साक्षीपुरावे भरगच्च जमले होते आणि या बाबतींत कांहीं उपाययोजना झाली पाहिजे ही मागणीहि प्रचंड प्रमाणांत वाढली होती. आपल्याविरुद्ध आंदोलन सुरू झाल्याचें पाहून रशियन लोकांनीं निराळाच पवित्रा टाकला. १९४७ सालीं जेव्हां या प्रश्नावर वादविवाद सुरू झाला तेव्हां सुरवातीलाच रशियानें संयुक्त राष्ट्रांकडून अशा चौकशीची मागणी केली कीं जिच्यामुळें रशियांत मात्र अशा प्रकारच्या तपासाला सर्वस्वी मना व्हावी आणि भांडवलशाही देशांना मात्र 'वेठबिगारी' या व्याख्येनें जबर तडाखा बसावा.

अशा तऱ्हेनें चिली देशाची राजधानी सान्टयागो येथें १९५१ सालीं जी सामाजिक आणि आर्थिक परिषद भरली तिच्यापुढें दोन ठराव आणले गेले. पैकीं रशियानें पुढें मांडलेल्या ठरावाचा हेतु सोव्हिएट युनियन व त्याच्या पुढ्यांतील राष्ट्रें यांच्यावरील लक्ष उडविण्यासाठीं सर्व प्रकारच्या वेठबिगारीची तपासणी करण्यासाठीं एक मोठी मजदूर संघ समिती (ट्रेड युनिअन कमिशन) नेमून घेणें एवढाच होता.

युनायटेड स्टेट्समध्यें मांडलेल्या ठरावाचा उद्देश कम्युनिस्ट पोलिस राज्यांमधील नव्या गुलामगिरीचें स्वरूप ढळढळीत उजेडांत आणण्याचा होता. रशियन ठराव जितक्या मतांनीं फेटाळला गेला तितक्याच मतांनीं म्हणजे

१५:३ मतांनीं युनायटेड स्टेट्स्चा ठराव मान्य केला गेला. ( विरोधक मतें फक्त सोव्हिएट युनियन, पोलंड आणि झेकोस्लोव्हाकिया यांचीं होतीं. )

मान्य केलेल्या ठरावाचा इत्यर्थ असा होता:—" जगांतील कित्येक देशांत वेठ ही कायद्यानें मान्य केली गेली असून प्रत्यक्षपणें प्रचलित आहे आणि त्यामुळें कांहीं राष्ट्रांतील जनता मोठ्या प्रमाणावर अत्यंत खडतर परिस्थितींत जीवन कंठीत आहे हें समोर आलेल्या कागदपत्रांवरून व पुराव्यावरून कळून आल्यानें या परिषदेला दुःख होत आहे आणि ती असा निर्णय घेत आहे कीं,

( १ ) परिषदेशीं सहकार्य करण्यासाठीं आंतरराष्ट्रीय मजदूर संघाला आमंत्रण देऊन त्याच्या सहकार्यानें शक्य तितक्या तांतडीनें वेठीच्या प्रथेचा तपास घेण्यासाठीं पांच जणांपेक्षां अधिक सभासद नसलेली अशी एक स्वतंत्र समिती नेमली जावी.

( अ ) राजकीय दडपणासाठीं, तसेंच विशिष्ट राजकीय मतें धारण करणें किंवा तीं व्यक्त करणें ह्याबद्दल शिक्षा देण्यासाठीं जगांत वेठबिगार किंवा 'सुधारणें' मजुरीला लावण्याच्या अनेक पद्धति अस्तित्त्वांत आहेत. त्या पद्धतींचा अवलंब प्रचंड प्रमाणावर केल्यामुळें त्या देशांच्या आर्थिक जीवनाचें त्या आवश्यक अंगच होऊन बसल्या आहेत. यासाठीं अशा पद्धतींचा अवलंब करणारे कायदे व नियम यांना कलमवार अभ्यासून व त्यांची अंमलबजावणी वर सांगितलेल्या तत्त्वानुसार होते किंवा नाहीं याचा शोध घेऊन वेठीच्या पद्धतीनें निर्माण झालेल्या प्रश्नांची व्याप्ति व स्वरूप ह्यांचा नीट अभ्यास व्हावा.

( ब ) अशा अभ्यासानंतर काढलेले निष्कर्ष व झालेली सुधारणा यासंबंधींची माहिती आर्थिक व सामाजिक परिषदेला व आंतरराष्ट्रीय मजदूर संघाला दिली जावी.

हा ठराव मान्य होण्यापूर्वीं जी चर्चा झाली त्यावेळीं रशियनांनीं या ठरावाला कसून विरोध केला. संपूर्णपणें स्वतंत्र अशा व्यक्तींची म्हणून सम-

जल्या जाणाऱ्या त्या छोट्या समितीला विरोध करतांना सोव्हिएट प्रतिनिधीनें असें ठासून म्हटलें कीं ही समिती सोव्हिएट रशियाविरुद्ध प्रचार व निंदा करणारी एक यंत्रणाच होईल. 'सोव्हिएट राष्ट्रांत सर्व ठीकठाक आहे. बिनसलें आहे तें भांडवलशाली राष्ट्रांमध्यें ' असें म्हणून ठराविक पद्धतीनें सोव्हिएट वक्तृत्व चर्चेच्या वेळीं गाजवलें गेलें; परंतु पंधराहि देशांची खात्री झाली कीं एक नवी व विशिष्ट तऱ्हेची वेठीची पद्धत कम्युनिस्ट राष्ट्रांत अस्तित्वांत आली असून मानवी हक्कांचीं संयुक्त राष्ट्रांनीं जीं तत्त्वें मानलीं आहेत त्यांचीं तीं सरकारें इतकी पायमल्ली करीत आहेत कीं संयुक्त राष्ट्रांनीं तिकडे लक्ष दिलें पाहिजे.

वेठीच्या दुसऱ्या तऱ्हा अस्तित्वांत असल्याची संयुक्त राष्ट्रांना माहिती होती व त्या तऱ्हा अस्तित्वांत असल्याची कबुली त्या त्या राष्ट्रांनीं दिली होती. परंतु त्यांचें स्वरूप व मर्यादा पाहतां त्यांची कम्युनिस्टांच्या वेठीशीं कोणतीच तुलना होण्यासारखी नव्हती. कारण कम्युनिस्ट वेठ हें राजकीय जुलमाचें अस्त्र म्हणून वापरीत आहेत.

## वेठीची पाहणी करणारी स्वतंत्र सभासद समिति

संयुक्त राष्ट्रें व आंतरराष्ट्रीय मजदूर संघ या दोघांनीं मिळून पत्करलेली ही कठीण जबाबदारी पार पाडण्यासाठीं तीन व्यक्तींची एक वजनदार समिती नेमली गेली. तिचें पुढारीपण हिंदी मुत्सद्दी सर रामस्वामी मुदलियार यांच्याकडे होतें. हिंदी मुत्सद्दी रामस्वामी मुदलियार ही संयुक्तराष्ट्र परिषदेमधील प्रमुख व्यक्ति गणली जात असून आर्थिक व सामाजिक परिषदेचे ते पहिले अध्यक्ष होते. नॉर्वेचे माजी चीफ जस्टिस आणि आंतरराष्ट्रीय मजदूर संघाच्या नियामकमंडळाचे माजी अध्यक्ष पॉल बर्ग् हे त्या समितीचे आणखी एक सभासद होते. दुसरे सभासद मेक्सिकोचे फेलिक्स फुलजेन्शिओ पालाविसिनी हे होते. १९१७ सालीं झालेल्या मेक्सिकन् घटनेचे ते एक निर्माते असून मेक्सिकोचे माजी मंत्रि व परराष्ट्र वकील होते.

समितीतर्फे काम सुरू असतांच मि. पालाविसिनी वारले आणि त्यांच्या जागीं पेरूचे इ. ग्रेशिया सायन यांची नेमणूक झाली. ते स्वतः परराष्ट्रीय खात्याचे माजी मंत्री असून संयुक्त राष्ट्रांचे माजी कार्यकर्ते होते.

या समितीनें कामाला एकदम सुरुवात करून साक्षीपुरावा ऐकण्याचें, कागदपत्र तपासण्याचें काम सुरू झालें. ठरावांच्या मर्यादेंत जीं जीं राष्ट्रें वेठ-बिगारीला लावणारीं ठरत होतीं, त्यांच्या चौकशीचें काम सुरू झालें. तीन स्वतंत्र परिषदा झाल्या. त्यांपैकीं दोन जिनिव्हाला व एक न्यूयॉर्कला झाली आणि अखेरची चौथी परिषद १९५३ सालीं होऊन तींत अंगिकारलेल्या कामाची तड लावून संयुक्त राष्ट्रांना व आंतरराष्ट्रीय मजदूर परिषदेला द्याव-याच्या अहवालाची आंखणी झाली.

या समितीच्या बैठका कांहीं थोडे अपवाद वगळल्यास लोकांना किंवा वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना खुल्या नव्हत्या. साक्षीला येणाऱ्या कित्येक साक्षीदारांची ओळख पटून त्यांचा छळ होऊं नये एवढ्यासाठीं गुप्तपणानें चाललेल्या ह्या साक्षींचा गोषवारा प्रत्येक बैठकीनंतर प्रसिद्ध केला जात असे. केवळ लोह-भित्तीमागीलच नव्हे, तर साम्राज्यवादी व सरंजामशाही राष्ट्रां-संबंधींहि अनेक संघटनांनीं आपले पुरावे दाखल केले. वेठीच्या जुलुमांतून पळून स्वतःची सुटका करून येणाऱ्या कित्येक व्यक्तींच्या साक्षी झाल्या. समितीपुढें प्रतिज्ञालेख आले, कायद्यांचे व नियमनांचे मूळ ग्रंथ आले. वेठीच्या छावण्यांचे नकाशे, तेथील मजुरांची संख्या, वेठबिगारीच्या अमानुषतेचीं वर्णनें या साऱ्या सामुग्रीनें एका भयंकर आरोपाची सिद्धता झाली.

पूर्व युरोपमधील रशियाच्या पुढ्यांतील राष्ट्रांतून साक्षीदार आले. युगो-स्लाव्हिया, पूर्वींचीं बाल्टिक राष्ट्रें व सोव्हिएट युनिअन येथूनहि साक्षीदार आले. एका बैठकींत तर केवळ पूर्व जर्मनींतील साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. कम्युनिस्ट चीनला या चौकशींत स्थानच नव्हतें. कारण अजूनपर्यंत कम्युनिस्ट चीनमधून पळून येण्यास अवसर मिळून कोणताच साक्षीदार संयुक्तराष्ट्रांपुढें

येऊं शकलेला नाहीं. आफ्रिकन वसाहतींतील गुलामगिरीच्या कहाण्या सांगणारे आले. स्पेन व ग्रीसमधील वेठबिगारीच्या छावण्यांबद्दल साक्ष देणारेहि आले आणि युनायटेड स्टेटस्‌मध्येंहि वेठीची पद्धत ( Peoange ) असल्याची एक साक्ष मिळाली.

समितीपुढें साक्ष देण्यासाठीं येणाऱ्या संघटनांत लोहभित्तीमागील देशांतून हकालपट्टी झालेले किंवा पळून आलेले लोक जसे होते तसेंच सर्व जगांतील मजुरांसंबंधींच्या कार्यांत गुंतलेल्या कित्येक संस्था होत्या व कम्युनिस्ट हुकुमशाहीविरुद्ध झगडणाऱ्या लोकशाही संघटनाहि होत्या. या संघटनांत विशेष उल्लेखनीय म्हणजे आंतरराष्ट्रीय मजदूर सहसंघ तसेंच मानवी हक्कांच्या प्रस्थापनेसाठीं स्थापन झालेला आंतराष्ट्रीय संघ ( १९४७ सालीं झालेल्या एका खाजगी अमेरिकन कामिशनच्या तर्फे वेठबिगारीपद्धतीची तपासणी करण्याचें कार्य सुरू झालें होतें. त्याच कामिशनतर्फे व मध्य युरोपांतील एका अभ्यासकेंद्रातर्फे या संघानें आपला पुरावा सादर केला होता.) लंडनमधील दास्यविरोधी समिती, आंतरराष्ट्रीय स्वतंत्र पत्रकार संघ ( हा लोहभित्तीमागील पळून आलेल्या शरणार्थी पत्रकारांचा संघ होता. ) आणि अशाच तऱ्हेचा स्वतंत्र विधिविशारदांचा संघ हे होत. पूर्व युरोपांतील सर्व देशांतून शरणार्थी म्हणून आलेल्या निरनिराळ्या राष्ट्रीयांच्या संस्थांनीं साक्षीदार पाठवले किंवा कागदपत्रांचे पुरावे समितीपुढें ठेविले. ज्या ज्या देशांविरुद्ध वेठीच्या प्रथेसंबंधीं आरोप केले गेले किंवा प्रमाणें आणलीं गेलीं, त्या त्या देशांकडे समितीनें अखेरचा अहवाल पाठवला. हेतु हा कीं, त्या त्या देशांतील सरकारांना त्यावर आपलें भाष्य करितां यावें आणि तें प्रसिद्ध करितां यावें किंवा जीं सरकारें उत्तरेंच देणार नाहींत त्यांच्या मुग्धतेची दखल घेतली जावी. ही पद्धति संयुक्तराष्ट्रांच्या नेहमींच्या पद्धतीहून निराळी होती. सामान्यतः कोणत्याहि राष्ट्रांतील सरकारविरुद्ध तें सरकार मानवी हक्कांची पायमल्ली करीत असल्याचा आरोप आला तर संयुक्त राष्ट्रें त्या आरोपाची एक प्रत या राष्ट्राच्या केवळ माहितीसाठीं म्हणून पाठवतात. त्याचा एक

परिणाम असा होतो कीं संबधित सरकार ती प्रत केराच्या टोपलींत टाकून मोकळें होतें !

ज्या देशांविरुद्ध आरोप होते त्या देशांमधील सरकारें ज्या ज्या ठिकाणीं अनुमति देतील त्या त्या ठिकाणीं जाऊन चौकशीचें काम करण्याची व्यवस्थाहि ह्या स्वतंत्र सभासदांच्या समितीनें केली; पण युगोस्लाव्हियाखेरीज कोण-त्याहि राष्ट्राची चौकशीला तयारी असल्याचें अद्याप कळलेलें नाहीं. युगो-स्लाव्हियावर केलेले आरोप पाहतां त्या देशांतील सरकारच्या उत्तरानें मात्र अस्सल तपासाला वाव मिळणार आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांपैकीं त्या एकाच राष्ट्रानें सहकार्याची अशी तयारी दाखवली आहे.

समितीचा दररोजच्या बैठकींचा गोषवारा आणि संयमानें व न्यायबुद्धीनें सभासदांनीं त्यावर व्यक्त केलेलीं मतें कोणत्याहि सरळ मनाच्या माणसानें वाचलीं तर त्याला असेंच आढळेल कीं चौकशीचें काम काळजीपूर्वक तसेंच प्रामाणिकपणानें झालें आहे. ठराव जितक्या पूर्वग्रहांनीं पुढें आणला तित-क्याच पूर्वग्रहांनीं चौकशी झाली असें टीकाकार म्हणतील, तो पूर्वग्रह म्हणजे तरी काय ? तर कम्युनिस्ट पोलिस राज्यांत अभूतपूर्व जुलमामुळें स्वप्नांतही खरा वाटणार नाहीं एवढा प्रचंड जनसमुदाय जीवें जात आहे याबद्दल कम्युनिस्टेतर देशांना वाटणारी खंत.

# भाग तिसरा

## सोव्हिएट रशिया

### वेठीचें तत्त्वज्ञान आणि आचार

जगाच्या आजतागायतच्या इतिहासांत निरनिराळ्या प्रकारची वेठीची ही दुष्ट पद्धति दिसून येते. गुलामांचा निर्जीव वस्तूंप्रमाणें क्रयविक्रय करणें, जमीन किंवा घर ह्याप्रमाणें त्यांना आपल्या मालमत्तेचा एक भाग समजून स्थावर मालमत्तेबरोबर त्यांची विक्री करणें असे मानवी पिळवणुकीचे अनेक नमुने जगांत अस्तित्वांत होते, ते हळूंहळूं अमान्य होऊं लागले. इतके कीं, विसाव्या शतकांत जगामध्यें गुलामगिरीच्या नानाविध प्रकारांचें जवळजवळ उच्चाटन झालें असें वाटूं लागलें.

पण मानवी स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या एका राजकीय शासनपद्धतींत एक नव्याच गुलामगिरीचा जन्म होऊन जगांतील एक तृतीयांश जनता तिच्या वरवंट्याखालीं चिरडली जाऊं लागली आहे. जुनी दुष्ट गुलामगिरी नव्या रूपानें सोव्हिएट युनिअनमध्यें अवतरली आहे. " श्रमजीवींच्या हुकुमशाहीनें " शासित अशा प्रत्येक कम्युनिस्ट पोलिस राज्यांत ही गुलामगिरी शासनाचें एक आवश्यक अंगच होऊन बसली आहे.

### वेठीच्या पद्धतीचें राजकीय किंवा आर्थिकअधिष्ठान

मार्क्स किंवा लेनिन यांच्या कल्पनेप्रमाणें कम्युनिस्ट राज्यपद्धतींत वेठीला महत्त्व नव्हतें. उलट तुरुंग आणि कैदी ही सारी यंत्रणा कम्युनिस्ट राज्यपद्धतींत हळूंहळूं नाहींशीं होईल हीच कल्पना होती. पण हा प्रारंभीचा ध्येयवाद " व्यावहारिक " उपाययोजना करून हुकुमशाहीचें संरक्षण करण्याच्या विचारांत पार ढासळला. अगदीं आरंभापासूनच सोव्हिएट हुकुमशाही

गाजवणारे मूठभरच होते. आपली सत्ता कायम ठेवण्यासाठीं या मूठभर हुकुमशहांना कडक पोलिसी योजनांचा अधिकाधिक अवलंब करावा लागला.

राजकीय विरोधाला देहान्त प्रायश्चित्त देण्याची पद्धत परत सुरू झाली. झारशाहींत उखार नांवाचे कुविख्यात असलेले गुप्त पोलिस असत. आतां नव्यानें त्याच धर्तीचे—ज्यांना पुढें जीपीयू म्हटलें जाऊं लागलें ते—पोलिस कुविख्यात झाले. रशियन यादवी सुरू असतां कैद्यांना ठेवण्यासाठीं ज्या तुरुंगवजा छावण्या उभ्या केल्या होत्या त्यांचीच वाढ करून हजारों नवे राजकीय विरोधक त्यांतून डांबले गेले आणि जे तुरुंग म्हणूनच अस्तित्वांत होते ते राजकीय कैद्यांनीं भरून गेले. चालू राज्यपद्धतीला धोकेबाज वाटणारे लोक आर्च एन्पाल जवळ असणाऱ्या सोलोव्हेटस्की बेटांसारख्या खास राजकीय तुरुंगांत आणि छावण्यांत ठेवले गेले. सर्व रशियन छावण्यांत व तुरुंगांत वेठ ही पद्धतशीरपणें सुरू झाली. "चारित्र्य-सुधारणा" किंवा "शिक्षण" यांसाठीं मजूरीला लावण्याचा आरंभीचा कम्युनिस्टांचा सिद्धांत बदलून आर्थिक योजनांच्या सिद्धीसाठीं राजकीय विरोधकांना वेठीला लावण्याची प्रथा पडली.

१९२८ सालच्या सुमारास एकसारखी अशी कैद्यांची प्रचंड संख्या व अत्यंत संघटित, सर्वशक्तिमान् अशी वृद्धिंगत होणारी पोलिस संघटना हेंच चित्र नजरेंत भरतें. त्या वर्षीची दुसरी विशेष घटना म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेची मुहूर्तमेढ आणि 'दुसऱ्या क्रांतीची' सुरुवात. ही क्रांति रशियन लोकांना कांहीं बाबतींत पहिल्या क्रांतीपेक्षां अधिक खडतर वाटत होती. शेती सामुदायिक मालकीची व्हावयाची होती आणि सरकारनें औद्योगीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रयोग सुरू केला. हें औद्योगीकरण भारी उद्योग-धंद्यांवर उभारलेलें होतें.

ह्या सुमारास कम्युनिस्ट रशियाची भांडवलशाही जगाच्या बाजारांत कांहींच पत नव्हती, आणि या प्रयोगांसाठीं लागणारें प्रचंड भांडवल राष्ट्राच्या

फायद्यासाठीं लोकांच्या श्रमरूपानेंच केवळ मिळण्यासारखें होतें. सरकारजवळ हुकूमशाहीची यंत्रणा इतकी मोठी व शक्तिशाली होती कीं, शेतकरी कामकऱ्यांना जेमतेम जगण्यापुरती मजुरी देऊन सुद्धां कोणत्याहि रीतीनें जनतेच्या असंतोषानें प्रतिक्रांति होण्याचा संभव नव्हता. त्यामुळें गिऱ्हाइकांसाठीं माल निर्माण करण्यांत श्रम वाया जाऊं न देतां केवळ आपली योजना पुढें ढकलण्यासाठीं कामकऱ्यांचें श्रम घेतलें गेलें.

पण सामुदायिक शेतीच्या योजनेविरुद्ध शेतकऱ्यांमध्यें होणाऱ्या प्रतिक्रियेचा अंदाज बरोबर ठरला नाहीं. सरकारी नियंत्रणानें चालणाऱ्या सामुदायिक शेतीच्या प्रयोगांत आपले पशुधन सामील करण्यापेक्षां शेतकऱ्यांनीं फारच मोठ्या प्रमाणांत पशुधनाचा नाश करणें पत्करलें. कित्येक शेतकऱ्यांनीं स्वतःच्या गरजेपुरतीच शेती पेरली. शेतकऱ्यांचा विरोध हा संघटित नव्हता तरीहि तो इतक्या व्यापक प्रमाणावर होता कीं तो विरोध मोडून काढण्यासाठीं सरकारला लाल सैन्यदलें वापरावीं लागलीं. खेडींच्या खेडीं हद्दपार करावीं लागलीं. शेतकऱ्यांना वठणीवर आणून त्यांजवर सामुदायिक शेतीची सक्ती करण्यासाठीं जीपीयूच्या नेतृत्वाखालीं कम्युनिस्ट यंत्रणेनें फांशीं व निर्घृण जुलूम या साधनांचा अंगिकार केला. शेतकऱ्यांचें बंड मोडण्यासाठीं प्रचंड प्रमाणावर धरपकड व हद्दपारी या उपायांचा केलेला अवलंब हा पंचवार्षिक योजनांसाठीं राष्ट्राच्या वाढत्या मनुष्यबळाच्या गरजेशीं सुसंबद्धच होता.

१९३० च्या सुमाराच्या जवळजवळ दुष्काळाचेच परिणाम तीन वर्षें रशियाला भोगावे लागले. तो दुष्काळ म्हणजे नवीनच सर्वसत्ताधारी झालेल्या स्टॅलिननें पुरस्कारलेल्या सामुदायिक शेतीच्या जबरी प्रयोगाचें फळच होतें. ह्या दुःखद घटनेचा उपयोग कम्युनिस्टांनीं आपल्या हेतूंच्या सिद्ध्यर्थ करून घेतला.

'कुलकांना' ( Kulaks ) दोषी धरून 'कुलक' वर्गाविरुद्ध प्रचाराचें व विनाशाचें हत्यार पाजळून, राष्ट्राला पाहिजे असलेल्या मनुष्यबळाच्या पुरवठ्यासाठीं कम्युनिस्टशाहीला 'कुलकांचा' उपयोग करतां आला. थोड्याच

वर्षांत ‘ कुलकांचा ’ निःपात केला—त्यांना मनुष्यजातींतून उखडून टाकलें. अशा रीतीनें कम्युनिस्टांच्या शेतकी धोरणाला विरोध करणारा स्वामी शेतकऱ्यांचा वर्ग उखडून टाकून त्याचा त्याच वेळीं औद्योगीकरणयोजनेला हव्या असलेल्या लक्षावधि मजुरांच्या ताफ्यांत समावेश करून टाकला.

## रशियन सीमेबाहेर वेठीचा विस्तार

रूसो-जर्मन करार आणि दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात यामुळें सोव्हिएट वेठबिगारीची पद्धति रशियाबाहेरहि सुरू झाली. पूर्व पोलंड, एस्थोनिया, लाटव्हिआ, लिथुआनिया हीं तीन बाल्टिक राष्ट्रें आणि पूर्वीचा रुमानिअन बेसअरेबिया या प्रदेशांत नव्या गुलामगिरीच्या शृंखला खळखळूं लागल्या. वेठबिगारींसाठीं हकालपट्टी हें राजकीय हत्यार म्हणून वापरल्यानें हुकूमशाही-विरुद्ध झालेले भयानक परिणाम दिसूं लागले. रशियाच्या प्रभुत्वाविरुद्ध असणारे क्रियावान विरोधकच या प्रदेशांत भरडले गेले असें नव्हे तर संभाव्य विरोधक जेथें जेथें भासले ती जनताच्या जनताच वेठबिगारीसाठीं सोव्हिएट रशियांत हाकलली गेली. नव्या अंकित प्रदेशांतील विरोध मोडून काढण्यासाठीं हजारों लोकांना वेठीची शिक्षा देण्यांत रशियाचा एक संपूर्णपणें पूर्व-नियोजित व्यूह स्पष्ट दिसत होता.

जरी निश्चित आंकडेवारी माहीत नसली तरी जो पुरावा मिळाला त्यावरून पोलिस अधिकाऱ्यांचा असा अंदाज आहे कीं; १९३९ ते १९४१ या काळांत एन् के. व्ही. डी. च्या ( जीपीयूच्या पाठोपाठ अस्तित्वांत आलेली गुप्त पोलिस संस्था ) पोलिसांकडून पूर्व पोलंडमधील दहा लाख लोक तरी वेठबिगारीसाठीं हांकलले असावे.

पुढें केव्हांतरी या जबरदस्तीनें हलवलेल्या लोकांतून जिवंत राहिलेल्या लोकांना मुक्त करण्याचा प्रसंग येईल अशी शक्यताहि त्या वेळीं सोव्हिएट अधिकाऱ्यांना वाटली नव्हती. पण जेव्हां नाझी-कम्युनिस्ट प्रेमाचा उमाळा लवकरच ओसरला आणि जर्मनीनें रशियावर स्वारी केली तेव्हां रशियाला

मनुष्यबळाची जबरदस्त गरज लागल्यानें जर्मनीबरोबर लढण्यासाठीं पोलिश नागरिकांना वेठीच्या छावण्यांतून मुक्त करणें भागच पडलें.

पोल लोकांना निर्वासित करून छावण्यांत डांबलें असलें तरीहि ते जर्मन सैन्याबरोबर जनरल अँडर्सच्या नेतृत्वाखालीं निकरानें लढले आणि दोस्तांना विजय मिळवून देण्यास कारण झाले. पण महायुद्धानंतर जेव्हां हजारों पोल लोकांकडून वेठबिगारीच्या हकिकती निवेदिल्या जाऊं लागल्या तेव्हां बाहेरच्या जगाला राशियांत प्रचलित असलेलें वेठीच्या पद्धतीचें प्रचंड स्वरूप कळून आलें. मुक्त पोल लोकांचा पुरावा हा भरपूर कागदोपत्रीं पुरावा आहे. तो इतका प्रचंड व सही सही सत्य आहे कीं, त्यावद्दल संशय घेणेंच शक्य नाहीं. हा पुरावा संयुक्त राष्ट्रापुढें आल्यानें रशियांतील वेठ-पद्धतीचें विदारक चित्र स्पष्ट झालें आहे.

छोट्या तीन बाल्टिक राष्ट्रांचें भवितव्य तर यापेक्षांहि अधिक दुःखमय ठरलें; कारण तींच तेवढीं रशियन नसलेलीं पण राशियांत सर्वस्वी सामील करून टाकलेलीं अशीं तीन छोटीं राष्ट्रें आहेत. १९४० ऑगस्टला हीं तीनहि राष्ट्रें गिळंकृत केल्यावर तेथील एक लाखावर लोकांना त्यांच्या " नव्या पितृदेशीं " पाठवून गप्प करण्यांत आलें, तेथें आपली राजकीय लोकशाही गमावून राजकीय दडपशाही मात्र बिचाऱ्यांना पत्करावी लागली. लिथुआनिआ-मधून सोव्हिएट रशियांतील वेठीच्या छावण्यांत प्रचंड जनसमूहाला पाठ-विण्यासंबंधींची १९४१ सालची रशियनांची गुप्त पोलिसांची योजना आणि गुप्त पोलिसांचा त्या नंतरचा अहवाल या गोष्टी युद्धकाळींच विरोधकांच्या हातीं पडल्या. हे कागदपत्र संयुक्त राष्ट्रांपुढें ठेवण्यांत आले.

गुप्त पोलिसांच्या हस्तकांना वेठीच्या छावण्यांत हद्दपार करावयाच्या लोकांची यादी करण्याबद्दल दिलेले हुकूम त्या कागदपत्रांत होते. त्या याद्यांत 'थिऑसफिस्ट' 'फ्री मेसन्स' पासून तो, ज्यू लोकांचे फॅसिस्ट गटापर्यंत सगळे लोक होते. 'समाजकंटकांच्या' यादींत 'दुकानदार, हॉटेलांचे व चहाच्या

दुकानांचे मालकहि ' होते. गुप्त पोलिसांनीं कोणत्या तऱ्हेनें पावलें टाकावीं, यासंबंधीं पूर्ण मार्गदर्शन होतें. या योजनेप्रमाणें जनतेचें निर्वासन केलें गेलें आणि अंमलबजावणीसंबंधींच्या अहवालावरून पाहतां हजारों निर्वासितांना आगगाड्यांत कोंबून कांटेरी कुंपणांतील सोव्हिएट नागरिकत्व भोगण्यास पाठवून देण्यांत आलें.

प्रत्यक्ष सोव्हिएट रशियांत युद्धकालांत अविश्वसनीय अशा भासणाऱ्या जातींना उखडून निर्वासित करण्यांत आले. ६ लाखांची छोटीशीं व्होल्गा जर्मनांची जमात पिढ्यानुपिढ्या रशियांत वास्तव्य करून होती, तिला साऱ्या सोव्हिएटराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून हुसकून देण्यांत आलें. चेचेन, इंगुश, तार्तर आणि किल्मिक जमातींची तीच अवस्था करण्यांत आली. सर्व निर्वासितांना जरी वेठीच्या छावण्यांत जाण्याची शिक्षा दिली नाहीं तरी सोव्हिएट रशियांतील दूरवरच्या मुलखांत गुप्त पोलिसांच्या व्यवस्थेखालीं आणि नियंत्रणाखालीं ठेवल्यामुळें तेथें जाणारांची अवस्था छावण्यांत राहणारांइतकीच बिकट होती. सुमारें पंचवीस लाख लोक स्वायत्त अशा चार प्रदेशांत रहात होते. पैकीं कांहीं स्वायत्त प्रदेश उध्वस्त करण्यांत आले आणि कांहींची पुनर्रचना केली गेली. ( सोव्हिएट एनसायक्लोपीडिया; हेरल्ड ऑफ दी सुप्रीम कोर्ट सप्टेंबर २, सप्टेंबर २१, १९४१; ट्रुड,(Trud जून २६ )

जसजशीं जर्मन सेनेची पीछेहाट होऊं लागली आणि लाल सैन्याची सरशी होऊन तें पुढें जाऊं लागलें तसतशी गुलामांची सेनाहि त्यांच्या मागोमाग वाढत जाऊं लागली. इतके दिवस नाझींच्या तावडींत सांपडलेल्या हजारों सोव्हिएट नागरिकांचें रशियानें प्रेमानें स्वागत केलें आणि ' राष्ट्रद्रोही ' म्हणून त्यांना वेठीची शिक्षा ठोठावली. अमेरिकन, ब्रिटिश किंवा दुसऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सैन्यानें जर्मनींत किंवा नाझीव्याप्त प्रदेशांत जे रशियन युद्धकैदी होते त्यांना मुक्त केलें आणि याल्टा कराराप्रमाणें पुष्कळदां त्यांची इच्छा नसतांहि त्यांना त्यांच्या स्वदेशांत परत पाठवलें.

मे १९५१ मध्यें ब्रूसेल्स येथें वेठपद्धतीविरुद्ध आंतरराष्ट्रीय समितीची बैठक भरली असतां वासिली येरशॉव्ह या माजी सोव्हिएट सैन्याच्या कर्नलनें स्वानुभवावरून पुढील साक्ष दिली आहे:—मला सोव्हिएट कँपमध्यें काम दिलें होतें. या छावणींत मायदेशीं परत आलेले लोक होते. त्यांपैकीं एक लक्ष ऐशीं ते नव्वद हजार लोकांसाठीं आगगाडीच्या प्रवासाची व्यवस्था करण्याचा मला हुकूम होता. ७५ ते ८५ टक्के लोकांना वेठीची शिक्षा झाली होती. त्यांचा अपराध दोन प्रकारचा होता. कैदी म्हणून पकडले गेल्या-मुळें त्यांचें शौर्यधैर्य शंकास्पद ठरत होतें, हा एक अपराध आणि याहून मोठा अपराध असा कीं, पाश्चात्य भांडवलशाही राष्ट्रांतील श्रेष्ठतर राहणीचें मान त्यांनीं प्रत्यक्ष अनुभवलेलें असल्यामुळें त्यांना मोकळें राहूं दिल्यास ते ह्या राहणीच्या मानासंबंधीं जी साक्ष देणार होते ती सोव्हिएट सोशलिस्ट राष्ट्राच्या श्रेष्ठतेसंबंधींचा जो सरकारी प्रचार चालू होता त्याच्या संदर्भात धोक्याची ठरणार होती.

आंतरराष्ट्रीय कायद्याचा धडधडीत भंग करून सोव्हिएट युनियननें कित्येक जर्मन आणि जपानी लोक तसेच हजारों इटालियन, हंगेरियन, रुमानियन आणि इतर किती तरी लोक कैदी म्हणून वेठीला धरून महायुद्धानंतर आठ वर्षे राबवले आहेत. लढाईनंतर निश्चितपणें जिवंत असलेल्या पण पत्ता लागत नसलेल्या हजारों कैद्यांची नामावली तयार असतां आणि या कैद्यांची स्वदेशांतील सरकारें या गोष्टीचा निषेध करीत असतांहि सोव्हि-एट युनियननें असे कैदी अस्तित्वांत नसल्याचें सांगितलें आहे. कांहीं थोडें जे मुक्त झाले किंवा पळून आले त्यांनीं जिवंत असलेल्या इतरांच्या कहाण्या बाहेर ऐकवल्या आहेत. ‘ युद्धकैदी ’ तेवढेंच कैदेंत आहेत असें सोव्हि-एट युनिअननें आपलें समर्थन केलें असलें तरी अपेक्षेप्रमाणें तुरुंगांत सांपडत नाहींत असे कित्येक लोक आहेत. ते ‘ चारित्र्य सुधारणाऱ्या ’ छावण्यांत राबवले जात आहेत. जर्मनींतील सोशल डेमोक्रॅटिक पार्टीनें युद्धकैद्यांच्या

मदतीसाठीं एक शाखा उघडली असून तिच्यातर्फे ज्या ज्या सोव्हिएट छावण्यांतून जर्मन कैद्यांना वेठीला धरण्यांत आलें आहे त्यांची यादी केली गेली आहे.

## सोव्हिएट आर्थिक व्यवस्थेंत सक्तमजुरीचें स्थान

सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत वेठबिगारीला आर्थिक दृष्ट्या महत्त्व कसें आहे याची स्पष्ट कल्पना एका गुप्त ७५० पानी रशियन आंकडेवारीच्या लेखी पुराव्यानें येतें. ही १९४१ ची सोव्हिएट राष्ट्रीय अर्थवाढीची सरकारी योजना असून शिवाय तत्संबंधीं पूरक लेख तिला जोडला आहे (ही योजना प्रसिद्धीसाठीं नाहीं अशी तिजवर सूचना आहे). युद्धकाळीं ही योजना जर्मनांच्या हातीं पडली. नंतर ती ब्रिटिशांच्या हातीं आली. तिच्या अस्सलपणाबद्दल शंका घेतां येणार नाहीं. संयुक्त राष्ट्रांपुढें तिचीं कागदपत्रें आल्यावर सोव्हिएट अधिकाऱ्यांनींहि तिचा इन्कार केलेला नाहीं.

या वर्षी औद्योगिक निर्मिती आणि (Capital construction,) महत्त्वाचीं बांधकामें यांसाठीं बजेटमध्यें आंकडे घालतांना गुप्त पोलिसांकडे योजनेचा कोणता भाग सोंपविला जावयाचा याचा उल्लेखहि त्यांत आहे. वेठमजुरीनें किती निर्मिती करावयाची यासंबंधींचा दिलेला आंकडा पाहातां रशियन अर्थयोजना गुलामांच्या श्रमांवर किती अवलंबून आहे हें स्पष्ट होतें. योजनेंतील कांहीं आंकडे पुढीलप्रमाणें आहेत. ५३२५००० मेट्रिक टन कोळसा, ३४७३०००० क्यूबिक मीटर उद्योगधंद्यांना लागणारें लांकूड व सर्पण, (एकंदर रशियन निर्मितीचा ११·९% इतका भाग) १४·४९% हिस्से लांकडी सामान, १४७०००००० जोडे, रेल्वे रस्त्यांतील आडवे सांधे, एकंदर निर्मितीपैकीं २२·५८% व ४०·५% क्रोम, पूर्व सैबेरियांतील एकाकी प्रदेशांत प्रचंड प्रमाणावर बांधलीं जाणारीं घरें व रेल्वे रस्ते खास गुप्त पोलिसांच्या अंमलबजावणी खात्यांतील गुशोसडॉर व स्लेव्हज हेल्डोस्टॉय य

दोन खात्यांकडे वेठ मजुरीनें चालवण्यासाठीं अति उत्तरेकडील खाणीचा प्रदेश सोंपवला होता.

१९४१ च्या आंकडेवारीच्या अहवालांतून सोन्याच्या उत्पादनाचे आंकडे गाळलेले आहेत. ह्या सोन्याच्या खाणी अति-ईशान्य सैबेरियांतील कोलिमा विभागांत आहेत. तो विभाग म्हणजे सोव्हिएट युनियनमधील एक स्वतंत्र औद्योगिक साम्राज्यच होऊन बसलेला आहे. तेथील वेठींत अमानुषतेची परमावधि आहे. केवळ अशा मजुरीच्या जोरावरच या खाणी उघडल्या गेल्या, शासिल्या गेल्या आणि चालू ठेवल्या गेल्या आहेत. १९३२ सालीं डॉलस्टॉय या नांवानें ह्या प्रदेशाची व्यवस्था पाहण्यासाठीं एक स्वतंत्र खातें उघडलें गेलें. त्याचा अंतर्भाव गुप्त पोलिस संघटनेंतच असून अति-ईशान्य सैबेरियांतील प्रदेशाची वाढव्यवस्था त्याच्याकडे सोंपविली आहे. जेथें शून्याखालीं ६०% पारा जातो अशा प्रदेशांत वेठबिगारी छावण्या उघडल्या आहेत.

रशियाच्या, कम्युनिस्टांच्या किंवा जगाच्या इतिहासांतहि न आढळणारी अशी वेठबिगारी छावणी येथें आढळते. हा सारा प्रदेश डॉलस्टॉयच्या नियंत्रणाखालीं आहे. सोव्हिएट युनियनची घटना येथें लागू नाहीं. सर्व-सत्ताधीश अशा एकच कमांडंटची सत्ता येथें असून या प्रदेशांतील वस्ती असलेल्या प्रत्येक भूभागाची व्यवस्था त्याच्याच हातीं आहे. डॉलस्टायच्या खास नियमांप्रमाणें या कमांडंटला कैद्यांना मृत्यूची शिक्षा देण्याचाहि अधिकार आहे. १९२६–२७ च्या खानेसुमारीप्रमाणें कोलीमा प्रदेशांतील लोकवस्ती आठ हजारांहूनहि कमीच होती. आतां वेठीला धरलेल्या येथील लोकांची संख्याच १५ ते २० लाख असावी. येथील मुख्य धंदा सोन्याच्या खाणीचा. कोलीमा येथील सोन्याच्या खाणींमुळें सोव्हिएटचे सोन्याचें उत्पादन ४०० ते ६०० टक्के वाढलें असलें तरी सोव्हिएट सरकार या प्रदेशांतील खाणीचा उल्लेखहि कधींच करीत नाहीं.

या खाणींखेरीज चुकोटस्क पेनिनशुला येथील शिशाच्या व इतर कांहीं खनिजांच्या खाणींतहि गुलामांना काम करणें भाग पडतें. परंतु डॉलस्टॉयच्या निर्मितीचें, तसेंच यंत्रावर व मानवी जीवितांवर इतकें भारी भांडवल खर्च करण्याचें कारण मुख्यत: तेथील सोन्याचें उत्पादन हेंच होय. याच प्रदेशांत प्लॅटिनमहि भरपूर प्रमाणांत सांपडतें, आणि सोव्हिएटच्या अॅटॉमिक योजनांसाठीं प्लॅटिनमचा उपयोग होतो अशी समजूत असल्यानें सोव्हिएटच्या लष्करी अॅटॉमिक प्रोग्रॅमबरोबरच प्लॅटिनमची निर्मितीहि जोरांत सुरू झाली असेल. ( येल युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू हेवन, १९४७ मध्यें छापलेल्या 'रशियांतील वेठबिगार' या पुस्तकांतील प्रकरण ६, पानें १०८ ते १४६, डॅलिन आणि निकोलॅव्हस्कीच्या या अमोल व विद्वत्ताप्रचुर पुस्तकांत कोलीमा प्रदेशांतील वेठीसंबंधीं अमोल माहिती मिळते. )

'मास्को सोनें' ही एके काळीं जवळजवळ अस्तित्त्वांत नसलेली वस्तु आज प्रत्यक्षांत दिसते. सोव्हिएटच्या खजिन्यांत दहा महापद्म ( बिलियन ) डॉलर किंमतीचें सोनें असावें असा अंदाज आहे. जगांतील सुवर्णउत्पादनांत सोव्हिएटचा दुसरा क्रम लागतो, आणि या सोन्यांतील तीनचतुर्थांश सोनें हें केवळ गुलामांच्या वेठीनें उत्पन्न झालेलें आहे.

## वेठबिगारीनें उत्पादन-वाढ होण्याचें कारण भूक

सोव्हिएट वेठ ही आधुनिक युगांतील एक अद्वितीय प्रथा आहे. कारण राजकीय दडपशाहीसाठीं तिचा प्रचंड प्रमाणावर वापर होत आहे आणि एवढें असूनहि ती कम्युनिस्टशाहीला कशी फायदेशीर आहे हेंहि दाखवलें जात आहे.

आधुनिक अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें आणि मार्क्स व एंजल्स यांनीं प्रतिपादन केलेल्या सिद्धांताप्रमाणेंहि गुलामांची पद्धति ही नैतिकदृष्ट्या व मानवतेच्या दृष्टीनें तर हीन आहेच पण त्याखेरीज आर्थिक दृष्ट्याहि ती आंतबट्ट्यांत आणणारी आहे. कारण स्वतंत्र श्रमिकांइतकी गुलामांमध्यें कार्यक्षमता आढळत नाहीं. गुलामाला काम करण्यांत उत्साह वाटण्याजोगें

कांहीं नसतें आणि त्याचें श्रम हें केवळ शारीरिक श्रमच असल्यानें यंत्रांनीं कामें करणारा व यंत्रकुशल कामकरी वर्ग हा राष्ट्राला केव्हांहि अधिक फायदेशीर ठरतो. परंतु मार्क्सच्या सिद्धांताउलट चालणाऱ्या स्टॅलिनची पद्धति असें दाखवूं पहाते कीं; विशिष्ट परिस्थितींत शास्त्रीय पद्धतीनें गुलामांकडून घेतलेले श्रम हे अधिक फायदेशीर होतात.

गुलामांचे श्रम हे केवळ शारीरिक श्रम असूनहि सोव्हिएट अर्थयोजनेला त्यामुळें बाध येत नाहीं. कम्युनिस्ट आर्थिक योजनेच्या परिपूर्तीसाठीं प्रचंड शारीरिक श्रमांची सतत गरज असते. स्टॅरनोव्हिटिझम या नांवाखालीं साऱ्या सोव्हिएट कामकऱ्यांत नमुनेदार कामाची व तांतडीनें काम संपविण्याची पद्धति प्रचलित आहे. पण त्या पद्धतीचा गुलामांच्या राज्यांत नवा आणि भयंकर अर्थ होतो. सुदृढ व भरपूर अन्न मिळणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं दररोज किती काम करावें याची विशिष्ट मर्यादा ठरवलेली आहे. त्याच मर्यादेप्रमाणें कैद्यांनाहि काम करावें लागतें. सोंपवलेलें काम कैद्यांकडून झालें नाहीं म्हणजे त्यांना देण्यांत येणाऱ्या रोजच्या अन्नांत कपात करण्यांत येते. अशा रीतीनें तेथें भरपूर कामासाठीं भूक हा अंकुश आहे.

कामाची कमाल मर्यादा गांठण्यासाठीं किंवा त्याहून अधिक काम करण्यासाठीं लागणारें शरीरसामर्थ्य कमावतां येईल इतकें पुरेसें अन्न गुलामांच्या छावण्यांत दिलेंच जात नाहीं. देहाला आत्मा जेमतेम चिकटून राहील इतकेंच अन्न कैद्यांना मिळतें आणि तें अपुरें अन्न मिळविण्यासाठीं कैद्यांना आपल्या सहनशक्तीच्या मर्यादा तुटतील इतकें काम करणें भाग पडावें अशीच या छावण्यांतील अन्नवांटपाची योजना मुद्दाम आंखण्यांत आली आहे.

या बाबतींत वादातीत अस्सल लेखी पुरावा सोव्हिएटच्या कायद्यांतच आढळतो. १९३० च्या सुमारास पेचोरा नदीकांठीं छावण्यांची इतकी वाढ झाली कीं, उख्ता व पेचोरा अशा दोन पद्धतींनीं त्यांची विभागणी करावी लागली. त्या छावण्यांतील कैद्यांना करावयाचा अन्न पुरवठा व अन्न वांटणी या संबंधीं नियम केले होते. संयुक्त राष्ट्रांपुढें रशियन सरकारच्या

दाखल झालेल्या ७५ पानी लेखांत ते सर्व नियम आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, कमींत कमी १२९२ कॅलरीज मिळतील इतकेंच अन्न रोज कैद्याला मिळतें. नेमलेल्या कामांतील ७५ टक्के काम पुरें करणाराला १५०८ कॅलरीज मिळतील इतकें अन्न मिळतें.

कठीण शारीरिक श्रम करणाऱ्याला ४५०० कॅलरीज कमीत कमी पाहिजेत अशी शिफारस असतां कैद्यांना दिलें जाणारें हें अन्न अपुरें आहे हें उघडच आहे. शिवाय आर्क्टिकजवळ असलेल्या या विशिष्ट छावणीबद्दल विचार करतां तेथील अत्यंत थंड हवामानामुळें शास्त्रज्ञांच्या शिफारसीपेक्षां जास्तच कॅलरीज कामकऱ्याला मिळाल्या पाहिजेत.

शरीराच्या सुदृढतेच्या दृष्टीनें तुरुंगांतील अन्न अधिकच वाईट असण्याचा संभव. ब्रेड, मासे, तेलें, भाज्या आणि सर्व तऱ्हेच्या अन्नपदार्थांचें प्रमाण दरमहा किती असावें हें नियमांत सांगितलें आहे. त्या नियमांकडे पहातां सामान्यतः कोणत्याच कैद्याला चरबी किंवा तेलें मिळत नाहींत आणि महिन्याला एका पौंडापेक्षां कमीच मांस मिळतें असें दिसून येतें. शेकडों साक्षीदारांच्या अहवालांवरून असें सिद्ध होतें कीं, जीवनसत्त्वें न मिळाल्यामुळें उत्पन्न होणारें स्कर्व्ही, दंतनाश, केश गळणें, रातांधळ यांसारखें रोग कैद्यांमध्यें मोठ्या प्रमाणावर असतात.

उख्ता पेचोरा छावण्यांत अन्नासंबंधीं सरकारी नियम आहेत, ते पहातां सोव्हिएट वेठबिगारीच्या इतर छावण्यांत असणाऱ्या नियमांचीच ती आवृत्ति आहे. जास्तींत जास्त अन्न नियमानें जेवढें जास्तींत जास्त देतां येतें तेवढें दिलें तरीहि नियमाची अमानुषताच सिद्ध होते. साक्षीचे अहवाल पहातां असें दिसतें कीं नियम कांहीं असोत, प्रत्यक्ष व्यवहारांत कांहीं अंमलदार नियमांनीं सांगितलेल्या मर्यादेइतकेंहि अन्न देत नाहींत. शिवाय बहुतेक छावण्यांतून अन्न अवर्णनीय घाणेरडें असतें. कुजलेल्या भाज्या, कच्ची ब्रेड हेंच जेवणांतील मुख्य पदार्थ. ते तोलून देणें हा अपवाद नसून बहुधा नियमच आहे.

दुबळा रोगी कैदी कामाची ठरवलेली कमाल मर्यादा गांठण्यासाठीं जिवाचें रान करतो, हा विचार ज्या गुप्त पोलिस खात्याला व सोव्हिएट कम्युनिस्टांना सुचला त्यांच्या कल्पकतेला नाखुषीनें धन्यवादच दिले पाहिजेत खरें. सामान्यतः उत्तेजन ही गोष्ट अस्तित्वांतच नाहीं. पण कम्युनिस्टांच्या वेठबिगारीच्या धोरणानें मनुष्यजातीला खरें उत्तेजन कशानें मिळतें हेंच शोधून काढलें असें नव्हे तर त्या शोधाचा पुरा उपयोग करून घेतला. तें उत्तेजन म्हणजे माणसाची जगण्याची दुर्दम्य इच्छा. गुलाम-कामकरी जणूं आपलें जीवितच कामाची अखेर मर्यादा गांठण्यावर अवलंबून आहे अशा समजुतीनें कामें करतात असें आढळून आलें आहे. सोव्हिएट छावण्यांतून तरी ही अक्षरशः वस्तुस्थिती आहे. कामाचा उरक न होण्यानें कैदी एका दुष्ट चक्रव्यूहांत सांपडतो. कमी काम म्हणजे कमी अन्न. कमी अन्न म्हणजे कमी सामर्थ्य. कमी सामर्थ्य म्हणजे कमी काम. कमी कामाचा परिणाम म्हणजे अन्न वाटपांत कपात. कैदी सहनशीलतेची पराकोटी गांठून कामाची कमाल मर्यादा गांठतो. नाहींतर आजार आणि उपासमारीनें आयुष्याच्या घसरगुंडीवरून मृत्यूच्या खाईत पडण्याखेरीज मार्ग नाहीं. या तुरुंगांत कैद्यांना माणसें म्हणून समजलें जात नाहीं तर राष्ट्राच्या अर्थयोजनांत खर्ची जाणारें साहित्य म्हणून समजलें जाते. त्यामुळें कैद्यांकडून जास्तींत जास्त काम करवून घेण्याइतकी निघृण कार्यक्षमता या तुरुंगांतून सर्वत्र आढळते.

## सोव्हिएट युनियनमधलि वेठबिगारीची व्याप्ति

गेल्या वीस वर्षांत वेठीला धरलेल्या कैद्यांची संख्या अगर त्यांच्या छावण्यांचा ठावठिकाणा त्यांबद्दल सोव्हिएट सरकारनें कोणतीच माहिती दिलेली नाहीं. म्हणजे अत्यंत कसोशीनें संभाळलेलें तें ‘ राष्ट्रीय गुपित ’ आहे. आणि तें जर कोणाकडून फुटलें तर त्याला त्याबद्दल जबर शिक्षा भोगावी लागेल. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक मंडळांतील एका ब्रिटिश प्रतिनिधीनें असा आरोप केला कीं, दहा लक्ष गुलाम कामगार सोव्हिएट युनियनमध्यें असून त्यांच्याकडून पिळून काम करून घेतलें जात आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीनें हाच आंकडा ८० ते १४० लाखांपर्यंत असल्याचा अंदाज सांगितला.

डॅलिन आणि निकोलॅव्हस्की यांसारख्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा अंदाज असा आहे कीं वेठीला लावलेले सोव्हिएट गुलाम ८० ते १२० लाख असावेत. हार्वर्ड युनिव्हर्सिटींतील रशियन संशोधन केंद्रांतील एका सभासदाच्या मतें सोव्हिएट आंकडेवारीच्या आधारानें आणि धंद्यावरून केलेल्या मोठ्या गटांमुळें लोकसंख्येंत होणारीं घट पहातां १ जानेवारी १९३९ ला सोव्हिएट युनिअनमध्यें एक कोट वेठीला धरलेले गुलाम असल्याचें सिद्ध होतें. आणखी एका तज्ज्ञांच्या मतें एक कोटी पस्तीस लक्ष लोक गुलामींत खितपत आहेत. (रिव्ह्यू ऑफ इकॉनॉमिक्स आणि स्टॅटिस्टिक्स, फेब्रुवारी १९४८. पानें ४०–४१) या बाबतचे अंदाज कमींत कमी पस्तीस लाखांपासून (नॉम जॅस्नी, जर्नल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, आक्टोबर १९५१ पानें ४०५ ते ४१९) ते जास्तींत जास्त दोन कोटीपर्यंत (८ व्हिक्टर क्रॅ व्हचेन्को आय चोझ फ्रीडम्) केलेले आहेत.

हातीं असलेल्या पुराव्यावरून हें उघड दिसतें कीं, सोव्हिएट युनिअनमधील गुलामांची संख्या एक ते दीड कोटीपर्यंत असावी. रशियाचे समर्थक असें म्हणतात कीं, या मजुरांच्या छावण्यांत अगर वसाहतींत केवळ गुन्हेगारांनाच त्यांच्यामध्यें सुधारणा घडावी ह्या हेतूनें ठेवलेलें असतें. हे समर्थक पाश्चिमात्यांचे ह्या संबंधींचे आंकडे फुगवलेले म्हणून त्याज्य म्हणत असतांना सोव्हिएटचे सरकारी आंकडे कोणते ते मात्र सांगत नाहींत. जर सोव्हिएटच्या वेठपद्धतीच्या अभेद्य संघटनेला राजकीय आणि आर्थिक कारणांचा आधार नसता तर अशा तुरुंगांतून इतक्या प्रचंडपणें कैद्यांची संख्या वाढत जाणें हें तितक्याच प्रचंड प्रमाणांत गुन्हे घडल्याखेरीज अशक्य कोटींतीलच झालें असतें. केवळ गुन्हेगारांचीच संख्या तेथें असती तर गुन्ह्यांत शेंकडा हजार ते दहा हजार इतकी वाढ झाल्याखेरीज कम्युनिस्ट पूर्वकाळांतील १८४००० ही कैद्यांची संख्या एका पिढींत दशलक्षांनीं मोजण्याइतकी झाली नसती.

सोव्हिएट युनिअनमध्यें गुलामांच्या छावण्यांचें जाळें सर्वत्र पसरलेलें आहे. अमेरिकन मजदूरसंघाच्या फ्री ट्रेड युनिअन कमिटीनें तयार केलेल्या नकाशांत १७० पेक्षां अधिक अशा छावण्या दाखविलेल्या आहेत. औद्योगिक व रचनात्मक जाहीर योजना सरहद्दीवरील प्रदेशांत कामकरी मजुरांच्या प्रचंड पुरवठ्याची मागणी करीत असतांना या छावण्यांचीं ठिकाणें आणि औद्योगिक व रचनात्मक योजना यांचा आपसांतील संबंध पाहिला तर कामकऱ्यांच्या या स्वर्गामध्यें गुलाम मजुरांच्या शोषणाची धूर्ततेनें केलेली व्यवस्था ही हिडिस म्हणण्याइतक्या हीन स्थितीला पोंहोचली आहे, असें दिसून येतें.

कम्युनिस्ट वेठाविगारीचें अगर छावण्यांचें वस्तुनिष्ठ विवेचन कुणी केलेलें नाहीं. सोव्हिएट सरकारचें एकहि कागदपत्र अस्तित्वांत नाहीं. सोव्हिएट कायदा अगर अधिकारी यांनीं उच्चारलेल्या कोणत्याच शब्दांनीं या मानवी दुःखांचें चित्र रेखाटलें जाण्याचा संभव नाहीं. या छावण्यांत जे लक्षावधि लोक मेले व लक्षावधि लोक आजहि यातना भोगीत पडले आहेत त्यांचें दुःख आणि त्यांची निराशा यांची स्पष्ट कल्पना केवळ ती दुःस्थिती स्वतः भोगून आलेल्या साक्षींनींच मिळूं शकते.

सोव्हिएट युनिअनमधील वेठपद्धति व तिची अंमलबजावणी ज्या प्रदेशांत चालू आहे असे यासंबंधींचा पुरावा सोव्हिएट मजुरांच्या छावण्यांत पूर्वी असलेल्या राजकीय कैद्यांच्या अमेरिकेंतील संघटनेच्या प्रतिनिधींनीं संयुक्त राष्ट्रांपुढें मांडला आहे. तसेंच एथोनिया परामर्श परिषद, लाटविया, आणि लिथुनिया परामर्श परिषद (अमेरिका) आंतरराष्ट्रीय परिषद (ब्रुसेल्स) आंतरराष्ट्रीय मानवी हक्कासाठीं संघ (न्यूयॉर्क) आंतरराष्ट्रीय स्वतंत्र पत्रकार संघ (लंडन) आंतरराष्ट्रीय भूतपूर्व बंदी केंद्र (पॅरिस) यांनींहि पुरावा सादर केला आहे.

• • •

# भाग चौथा

## झेकोस्लोव्हाकियांत वेठपद्धतीची आयात

### औद्योगिक झेकोस्लोव्हाकियाचा वेठविगारीनें फायदा

कम्युनिस्टांनीं सत्ता काबीज केल्यापासून झेकोस्लोव्हाकियाचें आर्थिक जीवन सोव्हिएट साम्राज्याच्या आर्थिक यंत्रणेचा एक भाग होऊन बसलें आहे. या सर्व योजनांचा मूळ एकच उद्देश आहे आणि तो म्हणजे सोव्हिएटची लष्करी शक्ति जास्तींत जास्त वाढीं कोस्लोव्हाकियांत जी औद्योगिक व नैसर्गिक साधन संपत्ति प्राप्त होण्यासारखी आहे तिच्या बळावर त्या देशाकडे विशिष्ट योजनेचा भाग सोपवला आहे. या देशानें स्वातंत्र्य काळांत अत्यंत परिश्रमानें औद्योगीकरणांचे बाबतींत कार्यक्षम असा कामगार वर्ग तयार करण्यांत यश संपादन केलें. ह्या दोहोंचाहि संपूर्ण उपयोग पद्धतशीरपणें झेकोस्लोव्हाकियाकरितां न करतां सोव्हिएटच्या गरजा संपूर्णपणें भागविण्याकडे केला जात आहे. तेथील कार्यक्षम आणि औद्योगिक यंत्रांचा उपयोग हे नवे शास्त्रे पूर्व युरोपांतील कम्युनिस्टांच्या प्रदेशासाठीं हत्यारें व साधनसामुग्री तयार करण्याकडे करीत आहेत.

झेकोस्लोव्हाकिया युरेनियमचे बाबतींत पूर्व युरोपांतील कोणत्याहि देशापेक्षां अधिक समृद्ध आहे. ॲटम बॉंब निर्मितीसाठीं चाललेली सोव्हिएटची धडपड ही या युरेनियमवर आधारलेली असल्यानें अनेक रशियन यंत्रज्ञ युरेनियमच्या प्रदेशांत येऊन थडकले असून युरेनियमच्या खाणींचा जास्तींत जास्त उपयोग कसा होईल याची पहाणी करीत आहेत. त्याचा परिणाम म्हणजे प्रचंड झेक मजूरसेना रशियाच्या नियंत्रणाखालीं आलेली आहे.

युरेनियमच्या खाणी-संबंधींच्या बातम्या फार भयंकर आहेत. कामगारांच्या

सुरक्षणाचीं साधनें तेथें मुळींच अस्तित्वांत नाहींत. कच्च्या युरेनियमपासून रेडियमधर्मी लहरी निघतात. त्यापासून मजुरांचा बचाव करण्यासाठीं सामान्यपणें केल्या जाणाऱ्या उपाययोजनांपैकीं येथें कोणतीहि उपाय योजना अमलांत आणली जात नाहीं. वेठीला लावलेल्या मजुरांना बैठ्या कामांतहि प्रकृति ठीक राहील इतकेंहि अन्न दिलें जात नाहीं मग भयंकर शारीरिक श्रम बरेंच तास करणारांसाठीं तर तें पुरेसें नाहींच नाहीं. याचा अटळ परिणाम म्हणजे क्षय, अकालीं दांत पडणें, आणि अपूर्ण अन्न व अतिश्रम या दोहोंमुळें निर्माण होणारें सर्व रोग कैद्यांत असतात. या देशांतील वेठीच्या छावण्यांतील परिस्थिति हृदयविदारक आहे. पण त्याहूनहि भयंकर स्थिति खाणकाम करणाऱ्या मजुरांची आहे.

## जॅन होरेकची कथा

पुढील साक्ष ही या देशांत चालू असलेल्या वेठपद्धतीचें उत्कृष्ट चित्र आहे.

जॅन होरेक हा ( टोपण नांव ) एक तरुण व्यापारी होता. त्याची एक लहानशी मोटार—वहातुकीची कंपनी असून तींत आठ कामगार काम करीत होते. त्याच्या मोटारची सरकारनें सरकारी कामासाठीं मागणी केली पण ती नादुरुस्त असल्यानें सरकारच्या ताब्यांत ताबडतोब देण्यास त्याला वेळ लागला. २२ फेब्रुवारी १९५० ला संरक्षण खात्यांतील दोन पोलिसांनीं त्याच्या ऑफिसांतून त्याची उचलबांगडी करून त्याला मुख्य पोलिस ठाण्यावर नेले व १६ तास त्याची चौकशी चालवली. गाडी सरकारच्या ताब्यांत देण्याची टाळाटाळ करण्यासाठीं त्यानें गाडीची मुद्दाम मोडतोड केली हा त्याच्यावर आरोप ठेवलेला होता. पोलिस ठाण्यावरून त्याला म्युनिसिपल तुरुंगांत नेलें व आठवड्यानें त्याची मुक्तता केली.

६ एप्रिल १९५० रोजीं पुन्हां त्याला त्याच्या घरीं पकडण्यांत आलें. पुन्हां त्याला पोलिस ठाण्यावर नेण्यांत आलें. त्याच्या नोकरांना त्यानें गुड-फ्रायडे हा कामाचा दिवस असतां सुट्टी कां दिली याची बराच वेळ चौकशी

झाली. सरकारनें ताब्यांत घेतलेली मोटार सरकारकडे पोचती करण्यास विलंब कां लागला हा प्रश्नहि पोलिसांनीं पुन्हां उकरून काढला.

आठ दिवस मुख्य पोलिस ठाण्यावर जॅन होरेकला निट्रा डिस्ट्रिक्ट जेल-मध्यें नेण्यांत आलें. आणि राष्ट्राविरुद्ध केलेल्या गुन्ह्याची त्यानें कबुली द्यावी म्हणून त्याला चोपण्यांत आलें. ६ मे १९५० रोजीं एका न्यायाधिशासमोर त्याला उभें करण्यांत आलें त्यानंतर पोलिसांनीं त्याला एका गार्डीत घातलें आणि सांगितलें कीं, पुन्हां तपासण्यासाठीं तुला ठाण्यावर नेण्यांत येणार आहे. पण तिकडे नेण्याऐवजीं परस्पर त्याला नोव्हकी येथील वेठीच्या छावणींत नेण्यांत आलें. त्याचें नांव रीतसर नोंदविलें गेलें. तेव्हां प्रथमच त्याला आपणांस एक वर्षाची सक्तमजुरी शिक्षा झाली असल्याचें कळलें.

नोव्हकी येथील मजुरांच्या छावणींत होरेक असतांना दोन ते तीन हजार कैदी ३९ बराकींत ठेवलेले होते. मोठ्या तीन आवारांपैकीं एका आवारांत १२ बराकी असून त्यांत केवळ स्त्री कैदीच ठेवलेले होते. मालवाहू मोटार गाड्यांतुन सशस्त्र पोलिस बंदोबस्तांत कैद्यांना नियोजित कामावर नेण्यांत येई. जॅन होरेक हा प्रथम एका कोळशाच्या खाणींत कामाला होता. नंतर एका रासायनिक कारखान्यांत कांहीं दिवस गवंडी म्हणून तो काम करीत असे. खाणींत कामाचा आठवडा नियमाप्रमाणें सहा दिवसांचा असला तरी प्रत्यक्षतः सात दिवस काम करावें लागे. नियमाप्रमाणें दररोज आठ तास काम घ्यावयाचें असलें तरी प्रत्यक्षांत तें अधिक तास करावें लागे. कामाला जाण्यायेण्याला लागणारा वेळ हा कामाच्या वेळांत धरला जात नसे. कागदावर मजुरांना महिन्याची मजुरी ठीकशी वाटली तरी प्रत्यक्ष त्यांच्या वाट्याला कांहींच येत नसे. छावणींतील अन्न, राहण्याची जागा, कपडे संस्कृति आणि शिक्षण यांसाठीं अधिकारी लोक पगार कापून घेत. आणि नेमलेल्या पगारांतून जेमतेम दहा टक्के कैद्यांच्या हातीं पडे. ही रक्कम सामान्यपणें कैद्याच्या घरीं पाठवली जाई. कामावर असतांना कैद्यास अन्न दिलें जाई. पण तें असें असे

संग्रहालय, 30162 23-5-61

कीं, पचण्यास कठीणच पडे. शौचकूप जरी सर्व बराकींतून असले तरी स्नानासाठीं टब् किंवा हजारे नव्हते.

जॅन होरेकच्या शिक्षेच्या पूर्ण मुदतींत त्याला प्रवलत मिळाली आणि दर आठवड्याला पोलिसांना हजेरी द्यावयाची या अटीवर त्याची तीन वर्षे सशर्त सुटका करण्यांत आली. नंतर तो देशांतून पळून गेला. साधारणपणें सौम्य अशी वागणूक मिळालेल्या कैद्यांचें हें उदाहरण अनेक दृष्टींनीं बोधप्रद आहे. जॅन हा क्रियाशील राजकीय विरोधकहि नव्हता किंवा त्यानें कोणताहि गंभीर गुन्हा केलेला नव्हता. त्याचा एकच साधा गुन्हा होता तो म्हणजे तो मध्यमवर्गीय होता. त्याची गाडी सरकारनें ताब्यांत घेतली तेव्हां त्यानें विरोध दर्शविला नाहीं किंवा ती गाडी सरकारला देण्यांत मुद्दाम विलंब केला नाहीं. त्याला एका तुरुंगात मिळालेला मार हा अशा प्रकारच्या लोकांशीं वागणाऱ्या कम्युनिस्टांच्या पद्धतिनुसार होता. त्यांतल्या त्यांत जॅनचें भाग्य एवढेंच कीं, जेथें व्यापारी शिक्षक किंवा असेच कम्युनिस्टशाहीला विशेष धोक्याचे असे न वाटणारे परंतु केवळ 'अविश्वसनीय' समजले जाणारे कैदी होते, अशाच छावणींत तो होता.

## जोसेफ पोलकची कथा

जोसेफ पोलक (टोपण नांव) हा पकडला जाण्यापूर्वीं प्राग येथील अमेरिकन वकिलातींत मोटारहाक्याचें काम करीत होता. अमेरिकेची नोकरी केल्यामुळें कोणत्या ना कोणत्या आरोपाखालीं आपण पकडले जाणार या भीतीनें त्यानें व आणखी कांहीं झेक् नोकरांनीं पकडले जाण्यापूर्वींच देशांतून पळून जाण्याचें ठरविलें होतें.

त्यांनीं २१ जूनला पळून जाण्याचें ठरविलें होतें. २२ जूनला पहाटेच दबा धरून पोलिसांनीं कार्ल्सबादजवळ पोलकला पकडलें. इतरांना जर्मन सरहद्दीवरील चेब् या शहरांत पकडलें. पोलकला कार्ल्सबादच्या तुरुंगांत नेण्यांत आलें आणि नंतर त्याच दिवशीं प्रागमधील पॅनक्रॅक् तुरुंगांत बंदो-

बस्तानें त्याची पाठवणी झाली. २२ जून ते ५ आक्टोबर १९५० पर्यंत त्या भयंकर तुरुंगांत त्याला डांबलें होतें. ५ आक्टोबरला पॅनक्रॅक तुरुंगांतून भूगर्भमार्गानें जोडलेल्या नागरिकांच्या न्यायासनासमोर त्याला नेण्यांत आलें. तेथें प्रथमच चेबूमध्यें पकडलेल्या त्याच्या सहकाऱ्यांची व त्याची गांठ पडली. या प्रतिवाद्यांवर राष्ट्रद्रोहाचे अनेक प्रकारचे आरोप होते. त्यांच्या-विरुद्ध पुरावा त्यांची चौकशी करणारांनीं त्याच्या चौकशींतूनच निर्माण केलेला होता. पोलकला १५ वर्षांची सजा झाली व शिवाय त्याचे नागरिकत्वाचे सर्व हक्क व मालमत्तेवरचे हक्क काढून घेऊन त्याला दहा वर्षे प्रोबेशनवर राहण्याची सजा मिळाली.

खटल्याचें काम संपल्यावर युरेनियम खाण—विभागांतील वेठबिगारीच्या एका मध्यवर्ती छावणींत त्याला पाठवण्यांत आलें. ज्या पन्नास जणांच्या एका जथ्यांतून याला पाठवण्यांत आलें, त्या सर्वांना हातकड्या घातलेल्या असून एका बसमध्यें कोंबण्यांत आलें व सशस्त्र पहाऱ्यांतून नेण्यांत आलें होतें. जेथें जमिनी धड केलेल्या नाहींत, उबेची सोय नाहीं अशा जुन्या लांकडी पंधरा घरांपैकीं एकांत पोलकला ठेवण्यांत आलें. त्यावेळीं त्या आवारांत असलेल्या पंधरा बराकींत अठराशें कैदी होते. एकाच भटारखान्यांतून अन्न पुरविलें जाई, ब्रेड, कॉफी, सूप आणि दुसरें कांहीं पदार्थ मिळून फक्त दिवसांतून एक भरपूर जेवण देण्यांत येई. छावणींत नव्यानेंच आलेल्या कैद्यांपैकीं बहुतेक तरुण आणि सुदृढ होते. ते भूगर्भांत दररोज ८ तासांप्रमाणें सातहि दिवस काम करीत असत.

खाणींत चोवीस तास तीन पाळ्यांनीं काम होई. दर तिसऱ्या आठवड्याला प्रत्येक कैद्याला निराळ्या पाळींत घालीत. कैद्यांना रोज देण्यांत येणारें काम हें ते कैदी ज्या खाण विभागांत काम करीत असत त्या खाण विभागाच्या क्षेत्रफळावर, त्याच्या काठिण्यावर आणि त्याच्या निश्चित स्थानावर अवलंबून असे. माणसाची सहनशक्ती पणाला लागेल एवढा हा

कामाचा वाटा असे. आपलें सारें जीवित हें काम संपविण्यावर अवलंबून आहे अशा बेतानें कैदी काम करीत. आणि खरोखरच त्यांचें जीवन कामाच्या उरकावर अवलंबून होतें. कारण कामाचा नेमून दिलेला वांटा जर संपला नाहींतर पुन्हां दुसऱ्या पाळींत काम करावें लागे. म्हणजे २४ तासांपैकीं १६ तास जमिनीखालीं काम करावें लागे. नाहींतर दुसऱ्या दिवशीं त्यांच्या अन्न-वांटपांत कपात होई.

छावणीचें मैदान व बराकी यांवर २४ तास जागता पहारा असे. खालीं खाणींतहि सशस्त्र शिपाई पहारा करीत. पगार चिठीच्या रूपानें मिळे. सुटकेनंतर त्या चिठ्यांवर पैसे मिळतील असें आश्वासन दिलें जाई. राहणीचा खर्च वजा जातां एका सहामाहींतील पोलकची प्राप्ति दरमहा चिठीच्या रूपानें चाळीस क्राऊन इतकी पडत होती. ( १९५० च्या कायदेशीर भावाप्रमाणें एक अमेरिकन डॉलर. )

कामाची एक पाळी संपली म्हणजे कैद्याचें दिवसाचें काम संपलें असा अर्थ नसे. आपल्या राहत्या जागेच्या झाडझुडी यासारख्या किरकोळ कामाखेरीज नव्या बराकी बांधण्याचें कामहि त्यांना करावें लागे. चाळीस बिछाने असलेल्या दवाखान्यांत कैदी डॉक्टर व कैदी साहाय्यक यांच्याकडून वैद्यकीय मदत मिळे. कैद्यांना फक्त पहिल्या पाळीच्या वेळांत ( सकाळीं ६ ते दुपारीं २ पर्यंत ) आपल्या सामान्य आजारांसाठीं दवाखान्यांत जाण्याची परवानगी असे. एरवीं २४ तास खाणींत दुखापत झालेल्यांसाठीं फक्त दवाखाना खुला असे. खाणींत सुरक्षिततेची योजना नसल्यानें दुखापत होणारांची संख्या फार मोठी असे.

त्याच आवारांत एक सभामंडप होता. तेथें कम्युनिझमचें व रशियन भाषेचें शिक्षण दिलें जाई. रशियांत तयार झालेले व रशियन राजनीतीचा प्रचार करणारे चित्रपट दाखविले जात. या कार्यक्रमांना हजर राहणाऱ्या कैद्यांना लहान लहान सवलती मिळत असल्या तरी येथें हजेरीची बाह्यत: तरी सक्ती नसे. तितकेंच धैर्य असलेले पोलकसारखे कैदी या कार्यक्रमांना हजर रहात नसत.

मार्च १९५१ मध्यें पोलक आणि दुसऱ्या सहा कैद्यांनीं भुयार करून त्यांतून पळून जाण्याच्या तयारीस सुरवात केली. वापरांत नसलेले एकमेकाशीं जोडलेले खाणींतील रस्ते खुले करून खाणींच्या मध्यवर्ती ठिकाणापासून १५० मीटर लांब भुयार तयार केलें. खूप परिश्रमानंतर काम फत्ते होण्या-आधींच सांपडले जाऊन ती एक सारी दुर्घटनाच होणार होती. त्यांच्या जीवनाची जवळ जवळ शोकांतिकाच होणार होती. पण अखेरीस ते जर्मन सरहद्दीवर सुरक्षित पोहोंचले.

## सक्तमजुरीचा झेक नमुना

रशियाच्या अंकित असलेल्या राष्ट्रांतून पळून आलेल्या शेंकडों लोकांच्या साक्षीवरून झेकमधील वेठीचा नमुना कसा असेल याची कल्पना येऊं शकते. झेकोस्लोव्हाकियामधील वेठीचा कांहीं विशेष असेल तर तो असा कीं, युरे-नियम खाणींतूनच कैद्यांना काम दिलें जाते. बहुतेक छावण्या ह्या खाणींच्या प्रदेशाजवळ किंवा औद्योगिक केंद्राजवळ आहेत. सर्वांत जास्त छावण्या जॅकीमोव्ह नांवाच्या युरेनियमच्या प्रदेशांत आहेत. त्या एकट्या प्रदेशांत २६ मोठाल्या छावण्या आहेत. याशिवाय प्रिब्रॅम नांवाच्या युरेनियम प्रदेशामध्यें ६ छावण्या आढळतात. कोळशांच्या खाणींच्या प्रदेशांत ९ छावण्या असून त्या पैकीं क्लॅडनो पी सी तीन एफ्. एल्. सी. या नांवाच्या छावणींत दहा हजार बंदी काम करीत आहेत. शहरांच्याजवळ सुमारें शंभर जादा छावण्या आहेत. त्यांतून आर्थिक व औद्योगिक अशा अनेक प्रकारच्या व्यापक योजनांसाठीं वेठीचे मजूर पुरविले जातात. १४ छावण्यांतून तर वेठीला लावलेल्या केवळ बायकाच आहेत, ६ छावण्यांत तरुण मजूर आहेत. २० छावण्यांत केवळ पाद्री लोक ठेवलेले आहेत. कारपेथोरशिया या नांवाच्या प्रदेशांत उझहोर्ड नांवाची एक फिरती छावणी असून तेथें सोव्हिएट रशियाकडे पाठविल्या जाणाऱ्या कैद्यांना ठेविलें जातें. झेकोस्लोव्हाकियामधील वेठ-बिगारीसंबंधींची वरील माहिती ही मध्ययुरोपांतील संशोधन केंद्राच्या पूर्व

युरोपच्या चौकशी समितीनें जमा केलेली आहे. या समितीनें वेठबिगारी छावण्यांतून कैद्यांची निश्चित संख्या किती आहे याचा अंदाज दिलेला नाहीं. परंतु आंतराष्ट्रीय स्वतंत्र पत्रकार संघाच्या कमिटीनें संयुक्त राष्ट्रांपुढें नोव्हेंबर १९५२ मध्यें जे आंकडे सादर केले त्यावरून झेकोस्लोव्हाकिया-मध्यें अशा कैद्यांची संख्या १,९५००० आहे अशी माहिती कळूं शकते. ही संख्या १५ आक्टोबर १९५२ पर्यंतची आहे. झेकोस्लोव्हाकियामधील वेठबिगारी पद्धतीसंबंधीं या शिवाय जे आधार मिळालेले आहेत, ते स्वतंत्र झेकोस्लोव्हाकिया परिषद आणि स्वतंत्र युरोपियन राष्ट्रीय समिती यांच्याकडून मिळालेले आहेत.

# भाग पांचवा

## लाल हंगेरी

इतर अंकित देशांहून हंगेरी कांहींसा भिन्न आहे. तेथील वेठीला कोणत्याहि विशिष्ट नव्या कायद्यांचा आधार अद्याप मिळाळेला नाहीं. होर्थीच्या वेळेपासून किंवा त्यापूर्वीहि अस्तित्वांत असलेल्या जुन्या कायद्यांचा वेठीला उपयोगीं पडेल असा अर्थ काढला जातो. आपला संबंध केवळ हंगेरींतील राजकीय कैद्यांच्या पिळवणुकीशीं असल्यानें आपण सोव्हिएट रशियामध्यें वेठीला लावलेले जे हजारों हंगेरीयन कैदी अजूनहि कैदेंत खितपत आहेत, त्यांच्या विश्वसनीय माहितीकडेच आपलें लक्ष वेधलें पाहिजे. त्याचप्रमाणें कम्युनिस्ट सत्तेनें या ठिकाणीं आक्रमण केल्यादर वेठीसाठीं तेथें पाठविलेल्या हजारों निर्वासित नागरिकांच्या खात्रीलायक माहितीकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. मायदेशीं आलेल्या युद्ध कैद्यांनीं अशा साक्षी दिल्या आहेत कीं त्यामुळें ज्यांचा तपास लागत नाहीं असे लोक हे सोव्हिएट वेठ पद्धतीनेंच गिळंकृत केलेले आहेत हें निश्चित झालें आहे.

## हंगेरीच्या अर्थव्यवस्थेचें समाजीकरण

कम्युनिस्ट हंगेरीवरून रशियाच्या अंकित प्रदेशामध्यें वेठ ही वाढत्या प्रमाणावर असल्याचा पुरावा मिळतो. त्याचप्रमाणें या पद्धतीच्या वाढत्या उपयोगाचीं कारणें पटणाऱ्या उदाहरणांनीं दाखविलीं जातात. कम्युनिस्टांनीं या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केल्यावर हंगेरीच्या अर्थव्यवस्थेचें वाढतें समाजीकरण झालें आणि सोव्हिएट रशियाच्या फायद्यासाठीं हंगेरीचें आर्थिक जीवनांत शोषणहि वाढत्या प्रमाणावर झालें. भारी उद्योगधंद्याचें आणि छोट्या कारखान्यांचें समाजीकरण झाल्यावर लहान उद्योगधंद्यांचें आणि

व्यापारांचें समाजीकरण होऊन सर्व कांहीं सरकारच्या पूर्ण नियंत्रणाखालीं आलेलें आहे. खाजगी व्यापार व्यवहार हा बेकायदाच ठरला आहे. हंगेरीयन अर्थव्यवस्थेचें समाजीकरण झाल्यानंतर त्यामुळें समाजाच्या होणाऱ्या फायद्यांबद्दल दिलेलीं आश्वासनें पुरीं होण्याऐवजीं दरिद्री रहाणीचें वाढतें मान न सुधारतां केवळ कठीण काम आणि अधिक तास काम एवढेंच कामगारांच्या नशीबीं आलें. या अपयशाचीं जीं मुख्य दोन कारणें तीं ही : आरी मूल उद्योगधंदे उभे करण्याच्या प्रयत्नांत फार मोठी मजुरांची संख्या कामाला लावावी लागतें त्यामुळें उत्पादन जलदीनें होऊं शकत नाहीं. दुसरें असें कीं, सोव्हिएट रशियाच्या गरजा आणि निर्यात व्यापाराची गरज यासाठीं हंगेरींतील उत्पादनाचा फार मोठा भाग हंगेरीबाहेर जातो. हंगेरीचा आजपर्यंतचा अनुभव पहातां हें स्पष्ट होतें कीं, रशिया व त्याचे अंकित देश यामध्यें व्यापार म्हणून जो चालतो त्यापासून जास्त फायदा रशियाच्याच पदरीं पडतो. हें अगदीं उघड आहे कीं, थोड्याच काळांत हंगेरींतील शेतीचेंहि संपूर्ण समाजीकरण होईल. त्या शेतीच्या समाजीकरणाची सुरवात १९४७ सालीं झाली आहे आणि तिची अखेर लवकर होणार हें निश्चित. छोट्या शेतमालकांची शेती सरकारी मोठमोठ्या शेतीमध्यें सामील केली जाईल. पूर्वीचे भरभराटीस आलेले शेतकरी हे जवळजवळ सर्व वेठबिगारी छावण्यांतून कोंबले गेलेले आहेत आणि त्यांना तेथें कोंबण्याइतके आरोपहि त्यांच्यावर लादलेले आहेत. मिस्कोल नांवाच्या नव्या जिल्ह्यांतील राजनैतिक पोलिसांच्या मुख्य ठाण्यांतून एका मध्यम वयीन शेतकऱ्याला पकडण्यासाठीं जे वारंट निघालें त्याची फोटोप्रत पाहतां तो ' समृद्ध ' असल्याच्या आरोपाखालीं त्याला पकडलेलें होतें. त्याच्यावरील प्रस्तुत आरोप असे : हा शेतकरी आपल्या गांवांतील उजव्या पक्षाच्या राजकारणांत भाग घेतो; काम करीत नाहीं; लोकशाहीविरुद्ध लोकांना चिथावतो. तेव्हां याच्या बाबतींत असें समजण्यास हरकत नाहीं कीं सरकारला धान्य देण्यांत तो अडथळा आणील. यासाठीं त्याला तुरुंगांत टाकणें आवश्यक आहे. या माणसाला मोकळा

सोडल्यास आर्थिक दृष्ट्या राष्ट्राला अहितकारी असणाऱ्या चळवळी हा करीत राहील असें समजण्यास भरपूर जागा आहे."

खेडुत जनतेची चौकशी न करतां तिला तुरुंगांत डांबण्यांत दिसून येणारा आर्थिक व राजकीय दृष्टीकोन लक्षांत घेण्याच्या दृष्टीनें हें पकड वॉरंट महत्त्वाचें आहे. हंगेरींतील छोटे शेतकरी हे कम्युनिस्टशाहीच्या शेतकी योजनेंतील अडथळे समजले जातात. (मोठे जमिनदार तर कम्युनिस्ट सत्ता प्रस्थापित झाल्याबरोबर नाहींसे करण्यांत आले.) राजकीय दृष्ट्या छोटे शेतकरी हे कम्युनिझमचे संभाव्य विरोधक किंवा अकम्युनिस्ट लोकशाही शक्ति असें समजलें जात असल्यानें त्यांचा संपूर्ण कांटा काढण्याचा कम्युनिस्टशाहीचा कटाक्ष आहे.

## एका रेल्वे कामगाराची कहाणी

एका हंगेरीयन रेल्वे कामगाराला पोलिसांनींच स्वतः काढलेल्या पकड वॉरंटानें वेठीला कसें लावलें गेलें याची कहाणी ही या पद्धतीची चांगली निदर्शक आहे. ही कहाणी म्हणजे सदर कामगारानें बंदीतून पळून आल्यावर दिलेली साक्ष आहे. ४ सप्टेंबर १९५० रोजीं हंगेरियन संरक्षक पोलिसाच्या हुकुमानें हा पकडला गेला. याच्या पकडण्याला एकच कारण असें दिलें आहे कीं, तो कामावर असतां मित्रांच्याबरोबर बोलतांना कम्युनिस्टशाहीविरुद्ध त्यानें खाजगीरीत्या उद्‌गार काढले होते. प्रथम त्याला तुरुंगांत घातलें आणि नंतर बांधकामासाठीं म्हणून वेठबिगारी छावणींत नेण्यांत आलें.

ओरोझ्लानी येथें घरें बांधण्याच्या कामीं यानें मदत केली. पुढें इनोटा येथें ॲल्युनियमचा कारखाना बांधण्यांत मदत केली. आणि इसाझेग येथेंहि एक कारखाना उभारण्याच्या कामावरहि त्याला ठेवण्यांत आलें होतें. त्याच्या सांगण्याप्रमाणें पाहतां तेथील अन्न निकस व अपुरें असलें तरी त्या अपुरेपणानें रोग निर्माण होण्याइतकें तें वाईट नव्हतें. नियमाप्रमाणें कामाचे तास ८ च होते. पण नेहमीं १० किंवा ११ तास काम करवून घेण्यांत येई.

रविवार हा अधिकृत सुट्टीचा दिवस असूनहि सुट्टी दिली जात नसे. कैद्यांना कठोरपणें वागविलें जाई. कधीं कधीं तर जास्तीत जास्त काम करून घेण्यासाठीं पशुतुल्यहि वागणूक मिळे. येथील कामावर असणाऱ्या कामगारांना तात्पुरत्या बराकींत ठेवलें होते. निजावयाची व्यवस्था नेहमींप्रमाणेंच दाटीदाटीनें व एकावर एक मागसें रचल्याप्रमाणें असे. कैद्यांना सतत भोंसकून जास्तींत जास्त लवकरांत लवकर आणि चांगलें काम करण्यासाठीं ठोकलें जाई. परंतु इतर ठिकाणच्या भयानक छावण्या पाहतां या छावणींतील स्थिति बरीच चांगली होती. हा माणूस एप्रिल १९५२ सालीं तुरुंगांतून पळाला आणि आस्ट्रियन सरहद्द ओलांडण्यांत त्यानें यश मिळविलें. त्याच्या माहितीला इतर पळून आलेल्या कैद्यांनींहि पुष्टी दिली आहे. त्याच्या माहितीप्रमाणें हंगेरींमध्यें सक्तमजुरीच्या पद्धतीचे अनेक प्रकार आहेत. तेथें कायद्याला धाब्यावर बसविलें जातें. साधी खाजगी टीकाहि होऊं नये, यासाठीं त्या मर्यादेपर्यंत कम्युनिस्टशाही जातें हेंहि स्पष्ट दिसतें.

## हंगेरींतील वेठबिगारी छावण्या

१८ जून १९५२ ला संयुक्त राष्ट्र स्वतंत्र समितीची बैठक झाली. मानवी हक्कांचा पुरस्कार करणाऱ्या इंटरनॅशनल लीगनें या बैठकींत हंगेरीमध्यें माहीत असलेल्या ९५ छावण्यांबद्दल पुरावा सादर केला. त्यांपैकीं ठळक छावण्या पुढील होत्या.

व्होकोन्या—पुस्झा येथील ट्रान्स—तिस्झा प्रदेशांत एक छावणी असून तेथें सहाशें स्त्रिया आहेत. त्या कालवे बांधण्याच्या कामावर आहेत डेब्रेसेनच्या उत्तरेला नाग्यालाझ येथें सशस्त्र पोलिसांच्या जागत्या पहाऱ्यांत कम्युनिस्ट पार्टींतील ‘ चुकार ’ आणि पार्टींतून हांकललेले सभासद आहेत. डेब्रेसनची छावणी शहरापासून ५ ते ६ किलोमीटर दूर असून रशियन सैन्यानें तिची स्थापना केली आहे. १९४८ पासून या छावणींत रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हाकिया आणि हंगेरी येथून आलेले व्होल्क्स डाइझ

निर्वासित ठेवले जातात. या छावणीची दोन आवारांत विभागणी झालेली असून त्यांतील एक स्त्रिया व चौदा वर्षांखालील मुलांसाठीं आहे, दुसऱ्या आवारांत पुरुष व चौदा वर्षांवरील मुलें आहेत. एकंदर कैद्यांची संख्या ४५०० आहे. हंगेरींतील मोठमोठ्या शहरांतील ६०० ते ८०० कुशल कारागीर मेझोटर येथील छावणींत लष्करी बांधकामावर लावलेले आहेत.

फेल्सोमाग्या रोरझॅग प्रदेशांतील झेरेन्स शहराच्या उत्तरेला असलेल्या एका छावणींत बहुतेक पाद्री व इतर धंदेवाईक असे २५० कैदी डिसेंबर १९५० ला आणले; तेव्हांपासून त्यांना दगडाच्या खाणींत कामाला लावलें आहे. काझिंग–बार्सीका येथें विजेच्या कारखान्यांत आणि घरांच्या बांध कामांत एक हजार कैदी काम करीत आहेत. सयोबाबोनी हें मिस्कोल्क-जवळ असून तेथें नव्या औद्योगिक केंद्राच्या उभारणीचें काम ते कैदी करीत आहेत; रेस्क छावणींतील साडे चार हजार कैदी तांब्याच्या व सोन्याच्या खाणींत कामें करीत आहेत. वॅक येथें १६०० ते २००० कैदी आहेत. हें वॅक जुन्या वॅककहून निराळें आहे. जुन्या वॅकमध्यें लांब मुदतीच्या शिक्षा झालेले राजकीय कैदी ठेवलेले आहेत. उना तिस्जा कोजे नांवाच्या प्रदेशांत शार्टा छावणी आहे. तेथें २६०० कैदी आहेत. तेथील बहुतेक कैदी म्हणजे बुद्धिवादी लोक व ॲरो क्रॉस पार्टीचे सभासद असून त्यांना राष्ट्रीय शेती-वर कामाला लाविलें आहे.

हुनान्तुल प्रदेशांत ब्रेनवर्ग बान्या नांवाची छावणी सप्रोन शहराजवळ आहे. येथील हजार कैद्यांकडून हलका कोळसा खोदण्याचें काम करवून घेतात. येथें तानाबान्याजवळ आरोंझ्लानी खाणी असून त्या प्रत्येकींत १५०० कैदी कामें करीत आहेत. पेक्सजवळ तार्क्सा पुस्झ् छावणी आहे. तिचे तीन भाग आहेत. एकांत ३५० पुरुष नजरबंद कैदी, दुसऱ्यांत ३०० पुरुष कैदी व तिसऱ्यांत २५० स्त्री कैदी आहेत. हे सर्व कैदी शेतकामावर लावलेले आहेत.

सर्व कम्युनिस्ट देशांत वेठीची शिक्षा मिळालेल्या कैद्यांकडून भयानक शारीरिक श्रम करवून घेतले जातात. थोडक्या अन्नावर त्यांना ते श्रम करतां आले नाहींत तर वेठीचा अलिखित कायदा त्यांना लावून त्यांचा नाश केला जातो.

हंगेरींतील छावण्या व कैदखाने हे रशियाच्या अंकित असलेल्या अशा इतर देशांतील छावण्यांच्या व कैदखान्यांच्याच नमुन्याचे आहेत. छावणी छावणींत थोडा फरक आहे, तो एवढाच कीं, कांहीं वाईट तर दुसऱ्या अतिशय वाईट आहेत. सांगायला कोणत्या कायद्याचा आधार घेतात कोण जाणें पण पाश्चिमात्यांच्या दृष्टीनें कोणताच न्याय येथें अस्तित्वात नाहीं. कायदेशीर चौकशी करण्याचें किंवा कायदेशीर शिक्षा देण्याचें कारणच नसतें. कोणालाहि वेठीच्या शृंखलेंत अडकविण्याला केवळ एक पोलिस फर्मान पुरेसें होतें. कायद्याप्रमाणें पहातां असे पकडलेले लोक हे कैदी नव्हेत. पण तरीहि त्यांना तुरुंगाच्या कक्षेंत आणलें जातें आणि कोर्टाकडून शिक्षा झालेल्या इतर कैद्यांबरोबर त्यांच्याच सारखें त्यांजकडून काम करवून घेतलें जातें. त्यांना कायदेशीर शिक्षा झालेली नसते हेंच त्यांतल्या त्यांत त्यांचें सुभाग्य. त्यामुळें त्यांना कधीं ना कधीं मुक्त करावेंच लागतें किंवा न्याया-सनासमोर आणावें लागतें. मानसशास्त्राच्या दृष्टीनें पहातां मात्र या लोकां-वर कायदेशीर शिक्षा झालेल्या कैद्यांपेक्षां जास्त अवकृपा होते. कायदेशीर कैद्यांना नेमलेल्या मुदतीपुरतेंच कामाला लावावयाचें असतें. या बेकायदा कैद्यांना मुदतीचें मापच लावण्यांत येत नाहीं.

संयुक्त राष्ट्रापुढें झालेल्या साक्षीवरून असें दिसतें कीं, हंगेरींत सुमारें दोन लक्ष वेठीला लावलेले कैदी असावेत. हंगेरीयन नॅशनल कमिटीचें मुख्य ऑफिस युनायटेड स्टेट्समध्यें असून या कमिटीनें तसेंच इंटर नॅशनल लीग फॉर फ्री जरनॅलिस्ट्स ( लंडन ) आणि इंटर नॅशनल लीग फॉर दी राइट्स ऑफ मॅन या संघटनांनीं सदर प्रकरणीं पुरावा सादर केलेला आहे.

● ● ●

# भाग सहावा

## शेतकीप्रधान बल्गेरिया

### कम्युनिस्टांची शेतीविषयक अर्थ योजना

कम्युनिस्ट सत्तेपूर्वी बल्गेरिया हा एक आदर्श शेतीप्रधान देश होता तेथील लोक हे लहानलहान शेतकरी असून त्यांच्या मालकीच्या जमिनी असत आणि ते आपल्या शेतांतून काम करीत. रशियाच्या अंकित असलेल्या राष्ट्रांपैकीं बल्गेरिया हा सर्वांत अधिक शेतकींत गुंतलेल्या लोकांचा देश. दहा माणसें घेतलीं तर त्यांतील ८ शेती करणारी. उद्योगधंदे फारच थोडे. त्या देशांतून होणारी निर्यात शेतमालाचीच. तंबाखू, गुलाबाचें अत्तर व गहूं हे निर्यात होत असत. कम्युनिस्ट हे शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन कसें ताब्यांत घेतात याचें बल्गेरिया हें विशेष लक्ष देण्याजोगें उदाहरण आहे. पाश्चिमात्यांच्या सहकारी पद्धतीचा विशेष असा कीं, तेथील सहकारी संस्था स्वेच्छेनें उभ्या राहतात, आणि लोकशाही पद्धतीनें त्यांचा कारभार चालतो. सोव्हिएट पद्धतीचीं सामुदायिकें हीं यापेक्षां फार निराळीं आहेत. सामुदायिक शेती ही तेथें सरकारी संस्था आहे. जेव्हां एखादा शेतकरी तींत सामील होतो तेव्हां त्याची शेती सामुदायिक मालमत्ता होते. आणि जर तो त्यांतून निघाला किंवा त्याला हांकलून दिलें गेलें तर त्याची जमीन, गुरेढोरें, आणि त्यानें केलेले नवे प्रयोग हीं सारी सामुदायिक शेतसंस्थेच्या माळकीची होऊन बसतात कम्युनिस्ट नसलेल्या बल्गेरियांत सहकारी चळवळ ही कांहींशीं यशस्वीपणें चाललेली आहे. नव्या सरकारनें जुन्या पद्धतीच्या सहकारी संस्था चालू ठेवल्या असल्या तरी बल्गेरियन बहुसंख्य शेतकऱ्यांनीं सरकारी प्रचंड प्रचारा नंतरहि सामुदायिक शेतींत सामील होण्याचें नाकारलें. त्यामुळें सरकारनें गोडी गुलाबीनं

व दहशत ह्या दोन्ही उपायांची वेळेनुसार योजना केली, सामुदायिक शेतींत सामील होणाऱ्यांना कर माफी व इतर फायद्यांचीं आश्वासनें दिलीं. आणि जे सामील होणार नाहींत त्यांना वाढते कर आणि जप्ती ह्यांना बळी पडावे लागलें. शिवाय त्यांच्यावर ' कुलक ' म्हणून शिक्के बसले आणि त्यामुळें त्याची अवहेलना होऊन हळूहळू ते शिक्षेला पात्र ठरले.

## सरकारी शेतीवरील वेठ

रशियांतील सामुदायिक शेतीच्या ( Sovhozi ) धर्तीवर सरकारी शेती हा एक नवीनच कम्युनिस्ट शोध आहे. या राष्ट्रीय शेतीवर काम करणारे शेतकरी हे खरे म्हणजे शेतमजूरच; कारण त्यांना सामुदायिक शेतींतील भागीदाराप्रमाणें कोणत्याच फायद्यामध्यें वांटा नसतो. राष्ट्रीय शेतीहि सरकारनें जप्त केलेल्या जमिनींत होत असते. कांहीं स्वतंत्र मजूर, तर कांहीं वेठीला धरलेले मजूर हे वाढत्या संख्येनें तेथें राबत असतात. शेतीवर वेठ पद्धत लागूं करण्यासाठीं जो कायदा केला गेला त्याचा उद्देश हा होता कीं राष्ट्रीय शेती किंवा सरकारी पहाऱ्याखालीं आलेलीं गावें ह्यांतून " वेठकामाच्या शिक्षणाचें कार्य " चालूं व्हावें. मिलीशिया संबंधीं जो कायदा आहे त्या कायद्यानें पोलिसाला असा अधिकार मिळाला आहे कीं, फॅसिस्ट असणारे किंवा जनता विरोधी प्रदर्शन करणारे हा आरोप त्यांना वाटेल त्या लोकांच्यावर लादतां येतो आणि त्यांना शिक्षा म्हणून वेठीला लावतां येतें. ही शिक्षा भोगणारामध्यें " द्वेषपूर्ण असत्य अफवा पसरविणारे " हा आरोप असलेले लोक आहेत.

कम्युनिस्ट अधिकाऱ्यांनीं ज्याच्यावर एकदां ' कुलक ' म्हणून शिक्का मारला त्याला वरील ' गुन्ह्याखालीं ' चौकशी खेरीज वेठीसाठीं, वेठबिगारी म्हणून कोणत्याहि छावणींत नेतां येते. सरकार त्याची जमीन हिसकावून घेऊन सरकारी शेतांत सामील करूं शकते. अशा प्रकारें मालक शेतकऱ्याच्या स्वातंत्र्यासाठीं प्रसिद्ध असलेल्या पूर्व युरोपांतील एका देशांत, या विसाव्या शतकांत, खेडुत सरंजामशाहीची दुष्ट पद्धति अस्तित्वांत येत आहे.

सामुदायिक आणि सरकारी शेतीवर सरकारनें भर देण्यामागें असणारीं कारणें पाहतां कम्युनिस्टांच्या घोषणांशीं तीं विरोधी असून त्यांचा शेतकऱ्यांच्या कल्याणाशीं कोणताहि संबंध नाहीं. असें दिसून येतें. शेती सामुदायिक केली गेली ती सरकारच्या फायद्यासाठीं; व्यक्तीच्या नव्हे. शेतकऱ्याला त्यानें अधिक पिकवलेल्या शेतमालाबद्दली दुसरें कांहीं हवें असल्यास तें जेथें विकत घेण्याची मुभा नाहीं, त्या ठिकाणीं आपल्या कुटुंबाला पाहिजे त्यापेक्षां अधिक शेतमाल तयार करण्याला शेतकऱ्याला उत्साह वाटणें कठीणच. त्यामुळें शेतकऱ्याची कार्यशक्ति ही पूर्वीपेक्षां कमीच झाली आहे आणि त्याचा राहणीचा दर्जाहि खालावला आहे. शिवाय सरकारला अत्यंत कमी किंमतींत शेतमालाचा ठराविक वाटा देणें त्याला भाग पडतें.

## स्त्रियांची वेठ

इतर अंकित देशांतील छावण्यांत जी परिस्थिति आहे तीच सामान्यत येथेंहि आहे. इतर देशांपेक्षां येथें स्त्रियांच्या छावण्यांचें प्रमाण थोडें अधिक आहे. आणि याचें कारण बऱ्याच खेडूत स्त्रिया शेतकाम करतात. कफाल्जा या मोठ्या छावणींतील एक खास विभाग स्त्रियांसाठीं राखून ठेवलेला आहे. यापूर्वीं बल्गेरियन पार्लमेंटांत स्त्री–सभासद म्हणून असलेल्या मिसेस् एलिझाबेथ पोपॅन्टोनोव्हा ह्या छावणींत आहेत. तुत्राकाना शहरांजवळ असलेल्या स्त्रियांच्या दोन छावण्यावरून बल्गेरियांतील स्त्री–कैद्यांना ज्या सक्तमजुरीच्या छावण्यांत ठेवतात आणि ज्या परिस्थितींत त्यांना काम करावें लागतें त्याबद्दल चांगली कल्पना येते.

सरकारी मोठ्या शेतांतील एका भागांत द्राक्षें बीट आणि भाज्या तयार करण्याचें काम स्त्रियांकडे दिलेलें आहे. किमान कामाच्या मर्यादा इतर वेठबिगार छावण्यांतून आहेत तशाच येथेंहि आहेत. शेतकामाची रोजची किमान मर्यादा ही फार अधिक आहे. तीन टन बीट मुळांची काळजी घेणें, पांच डिकेअर्स इतकीं बीटचीं मुळें खणून काढणें, पेप्रिका लावण्यासाठीं एक डिके-

अर जागा नांगरून तयार करणें ही कामाची किमान मर्यादा आहे. इतकें कठीण काम बरेंच तास करीत राहण्यास जी शारीरिक कुवत पाहिजे ती निर्माण होण्याइतकें पुरेसें अन्न देण्यांत येत नाहीं. किमान कामाची मर्यादा गांठतां आली नाहीं म्हणजे अर्धें अन्न वाटपच देण्यांत येतें. दररोज ११ तास काम करावें लागतें.

पुरुषांपेक्षांहि स्त्रियांमध्यें राजकीय मतांचा प्रचार करणें हें अधिक महत्त्वाचें समजलें जातें. सबंध दिवसाचें काम संपल्यावर रात्रीं राजकीय मत प्रचाराच्या सभा होतात. शेतांत दम छाक होईपर्यंत १० किंवा ११ तास काम करून छावणींत परत आल्यानंतर या सभांत स्त्रियांना पुढीलप्रमाणें शपथ घ्यावी लागते. " बल्गेरियाचें जनराज्य उभें करण्यासाठीं आर्थिक आघाडीवर मी माझी सर्व शक्ति व योग्यता खर्च करीन, असें मी वचन देतें. "

## वेठीनें सक्तीचें औद्योगीकरण

कम्युनिझमच्या पूर्वकालांत बल्गेरियामध्यें शेतीचें उत्पादन हें समाधानकारक होतें. शेतकामामध्यें त्या वेळीं बेकारी आधिक असण्याचें कारण शेतीचें वाटप योग्य असलें तरी शेतीवर जगणारीं माणसें अधिक होतीं. औद्योगीकरणाला उत्तेजन देण्यासाठीं उपाययोजना झाली तरी फारसें कांहीं साध्य झालें नाहीं. आतां सक्तीनें सरकार औद्योगीकरण करीत आहे. यासाठीं मानवी सुखांची जबर किंमत द्यावी लागत आहे. सोव्हिएटशीं व सोव्हिएटच्या अंकित असलेल्या इतर राष्ट्रांशीं बल्गेरियाचें आर्थिक जीवन संलग्न करण्यासाठीं बल्गेरियामध्यें जो बदल सोव्हिएट योजनेनें केला आहे त्याचेंच माणसांच्या कपाळीं आलेलें दुःख हें एक अंग आहे.

भारी उद्योगधंद्यांवर तेथें भर दिलेला आहे. १९४७ अखेर बल्गेरियांतील सर्व उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण झालें आणि तेव्हांपासूनच्या कम्युनिस्टांनीं सादर केलेल्या आकड्यांचें पृथक्करण केलें तर तें असें दर्शवितें कीं, औद्योगिक

कामगार वर्ग हा आतां दुपटीनें वाढला आहे. औद्योगिकरणाच्या योजनेंत सर्व प्रकारच्या कामांवर वेठकाम करणारांची भरती झालेली आहे आणि नेहमींप्रमाणेंच भारींतले भारी शारीरिक कष्ट माणसांना करणें भाग पडत आहे. ' मजूर–भरतीच्या नियमांतील ' तिसऱ्या कलमापर्यंत सक्तीचें सामाजिक श्रम हे सार्वजनिक उपयोगाच्या योजनांसाठीं घेतले जातील असें म्हटलें आहे. त्या योजना म्हणजे रस्ते बांधणें, रेल्वे रस्ते तयार करणें, कालवे, धरणें, इमारती बांधणें नद्यांना बांध घालणें, नद्यांचीं पात्रें सुधारणें, अरण्यें वसवणें, सरकारी किंवा सार्वजनिक शेतें नांगरणें, खाणींत अगर दगडाच्या खाणींत किंवा कारखान्यांतून काम करणें इत्यादि योजना होत.

पेर्निक् शहराचें नांव माजी कम्युनिस्ट पुढाऱ्याच्या सन्मानार्थ बदलून डिमिट्रिव्ह असें ठेवण्यांत आलेलें आहे. या शहराजवळ कोळशाचे भूस्तर असून या देशाच्या थोड्याफार नैसर्गिक संपत्तिपैकीं ही एक संपत्ति आहे. कोळशांच्या खाणींत मोठ्या प्रमाणांत बंद्यांकडून सक्त श्रम करून घेतलें जातात. धरणें आणि विजेचे कारखाने हेहि सक्तश्रमींकडून बांधलेले आहेत. सरकार अभिमानानें ज्यांचा ' समाजवादी मजुरांचें नायक ' म्हणून उल्लेख करतें त्या यादींत या बिचाऱ्यांचा क्वचित्‌च समावेश होतो.

जून १९५२ आणि नोव्हेंबर १९५२मध्यें संयुक्त राष्ट्राच्या स्वतंत्र समितीपुढें सादर केलेला, निरनिराळ्या वेळीं ५० छावण्यांत असलेल्या कैद्यांचा आंकडा एक लक्ष दहा हजाराइतका असल्याचा अंदाज आहे. बल्गेरियांतील उद्योगधंद्यांत गुंतलेल्या एकंदर तीन लक्ष कामगारांपैकीं हा एक लक्ष दहा हजारांचा सक्तश्रमींचा आंकडा म्हणजे विश्वास न बसण्याइतका मोठा आहे. स्वतंत्र वृत्तपत्रकारांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेनें आणि मानवी हक्कांसाठीं स्थापिलेल्या आंतरराष्ट्रीय संघानें बल्गेरियांतील सक्तश्रमांबद्दल हा साक्षीपुरावा संयुक्त राष्ट्रांपुढें ठेवला.

# भाग सातवा

## रुमानिया : स्लाव्ह समुद्रांतील लॅटिन बेट

सांस्कृतिक दृष्ट्या रुमानिया ही रशियन सरहद्दीवरील पाश्चिमात्य युरोपची एक चौकी आहे. भाषा आणि वंशानुक्रम या दृष्टींनीं तें मोठ्या थोरल्या स्लाव्ह समुद्रांतील एक लॅटिन बेट आहे. एक जमात म्हणून विचार केला तर रुमानियन लोकांचा इतिहास रोमन लोकांपर्यंत जाऊन भिडतो. पण एक स्वतंत्र राष्ट्रीय गट म्हणून पहातां रुमानिया फक्त ७५ वर्षांइतका जुना देश आहे. मध्य युरोपांत गेल्या शतकांत जीं स्थित्यंतरें झालीं तीं आसपासच्या देशांपेक्षां येथेंच अधिक प्रमाणावर झालीं. याची सत्यता रुमानियाची सतत बदलणारी सरहद्द, त्याचे दोस्तीचे तहनामे आणि राजकीय जीवन, यांवरून पटण्यासारखी आहे.

## रुमानियाचें पोलिस राज्य

या देशानें रशियाबरोबर संयुक्त सरकारांत हात मिळवणी केल्याबरोबर सहा महिन्याच्या आंत कम्युनिस्टांनीं रुमानियांतील सर्व सत्ता ताब्यांत घेतली. ॲन्टोनेस्क्‌शाहींत जो पोलिसी अंमल सर्वत्र होता तोच पुन्हां चालू करणें कम्युनिस्टांना कठीण पडलें नाहीं. त्यावेळचे तुरुंग तसेच्या तसेच होते. सामान्य दर्जाचें आयर्न गार्डिस्ट हे सक्तमजुरीसाठीं लागणारी प्राथमिक मर्यादित मनुष्य-शक्ति म्हणून उपयोगी पडणार होतें. ( १९४४ ची शस्त्र संधीची सभा ) हळूहळू धरपकडीसाठीं कायद्याचा आधार इतका व्यापक केला गेला कीं, उनाड, भिकारी, वेश्या आणि असेच दुसरे लोक सामाजिक दृष्ट्या निरुपयोगी व आर्थिक दृष्ट्या अनुत्पादक गणले गेले. ( डिक्री नं. ३९१, १९४९ ) अशी एकंदर तयारी केल्यावर नव्या

कायद्याची अंमलबजावणी म्हणून जनतेंतील बऱ्याच लोकांची धरपकड आणि वेठीसाठीं पाठवणी सुरू झाली. त्या लोकांत पहिल्या संमिश्र सरकारला पाठिंबा देणारे लोक होते. उद्योगधंद्यांतून कामें करण्यासाठीं तरुणांची भरती झाली. सरकारी सामुदायिक शेतीच्या वाढीसाठीं कित्येकांना नेण्यांत आलें. आणि मोठ्या शहरांतून इतर ठिकाणीं पुनर्वसाहतीसाठीं कित्येक लोकांची उचल बांगडी झाली. रुमानियांतील नगरवासियांच्या व खेडुतांच्या औद्योगिक व शेतीच्या जीवनांत पडलेला फार मोठा फरक नाहींसा करण्यासाठीं म्हणून काढलेले, दर्शनी निरुपद्रवी वाटणारे हुकूम हे कम्युनिझमच्या सौम्य विरोधकांना आणि अविश्वसनीय अशा वाटणाऱ्या लोकांना, वेठीच्या छावण्यांतून डांबण्यासाठीं होते.

संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीपुढें सक्तमजुरीसंबंधीं जो पुरावा ठेवण्यांत आला त्यावरून पाहतां रुमानियांतील सक्तमजुरीच्या छावण्यांत डांबलेले कैदी हे पुढील सदरांत येतात. ( १ ) इंडिपेन्डंट सोशॅलिस्ट डेमोक्रॅटिक पार्टी, लिबरल पार्टी, नॅशनल पेझंट पार्टी यांसारख्या लोकशाही पक्षांचे पूर्वीचे सभासद, ( २ ) पश्चिम सरहद्दीवरून हलवलेले लोक ( ३ ) कम्युनिस्ट विरोधी हालचाल करणारे ( ४ ) ज्यांची मालमत्ता ताब्यांत घेतली आहे असे जुने शेतमालक ( ५ ) जुने सरकारी अधिकारी व लष्करी अधिकारी ( ६ ) शिष्ट—पांढरपेशावर्गांतील—विशेषतः सिव्हिल सर्व्हिसमधील लोक ( ७ ) आर्थिक जीवन उखडून टाकण्याचा प्रयत्न करणारे ( ८ ) रशियन सेनेंतील अधिकाऱ्यांना राहण्यासाठीं ज्यांचीं घरें सरकारनें घेतलीं ते लोक.

मार्च १९५२ पासून शहरांतील दाटी कमी करण्याच्या मिषानें या निरनिराळ्या वर्गांतील जनता सक्तमजुरीच्या छावण्यांत पाठविली जात आहे. बुखारेस्टमध्यें वस्ती हलविण्यासाठीं आजवर जी उपाययोजना झाली तिचा उद्देश तर पुढील वर्गीय जनता हळूंहळूं पूर्णपणें हांकून देण्याचाच आहे; ( १ ) उद्योगधंदेगारांचीं कुटुंबें, सोव्हिएट युनिअनमध्यें निर्वासित

केलेल्या लोकांचीं कुटुंबें, गुन्हेगारांची व कैद्यांची त्याचप्रमाणें परदेशी पळून गेलेल्या लोकांचीं कुटुंबें. यांतील 'कुटुंब' या शब्दामध्यें पति किंवा पत्नी, मुलें, भाऊ, आई, आणि बाप यांचा समावेश होतो. या वर्गात अंतर्भूत होणाऱ्या लोकांना आपल्याबरोबर ५० किलोग्रॅम इतकें सामान नेण्याची सवलत आहे. बारा किंवा २४ तासांच्या सूचनेनें त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणीं जाण्याची त्यांची तयारी असावी लागते. (२) सैन्यांतून हांकून दिलेले शिपाई, जुने न्यायाधीश, वकिलीची सनद काढून घेतलेले जुने वकील, ज्यांची मालमत्ता राष्ट्रीय मालमत्ता ठरली असे जुने उद्योगपति, व्यापारी, १० हेक्टरपेक्षां अधिक जमीन मालकीची असणारे जुने शेतमालक. या सदरांत येणाऱ्या लोकांना जातांना जें जें जवळ आहे तें नेण्याची मुभा आहे. ही वरील हकिकत पहातां या लोकांची सक्तीनें पुनर्वसाहत करायला लावण्यांत त्यांचा कोणत्याहि गुन्ह्याशीं किंवा गुन्ह्याची चौकशी आणि शिक्षा यांच्याशीं संबंध नाहीं.

## रुमानियांतील वेठीची व्याप्ति

या पुस्तकांत सामील करतां येईल असा रुमानियांतील वेठीबाबतचा अहवाल दुर्दैवानें प्रत्यक्षपणें मिळूं शकला नाहीं. बहुधा रुमानियांतून येणाऱ्या निर्वासितांकडून जी व्यक्तिनिरपेक्ष माहिती मिळते त्याचें कारण आपल्या-मागें रुमानियांत राहिलेले आपले कुटुंबीय व मित्र यांना त्रास होईल ही भीति निर्वासितांच्या पोटीं असावी. त्यांहूनहि रुमानियन नॅशनल कमिटीनें (वॉशिंग्टन, डी. सी.) साहित्य गोळा करून त्याचें पृथक्करण केलें आहे. इंटर नॅशनल फेडरेशन ऑफ दी जर्नॅलिस्टस् आणि इंटर नॅशनल लीग फॉर दी राइट्स् ऑफ मॅन् यांच्याबरोबर या कमिटीनें आपला पुरावा संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीपुढें ठेवला आहे.

रुमानियांतील निरनिराळ्या विभागांत पसरलेल्या ५० वेठबिगारी छाव-ण्यांचें वर्णन विशेष लक्ष देण्याजोगें आहे. विशेष उल्लेखनीय योजना म्हणजे

डॅन्यूब–काळा समुद्र यामधील कालव्यांचें बांधकाम. तेथें ६० हजार ते दीड लाख कैदी काम करीत असावेत असा अंदाज आहे. हे सर्व कैदी कालव्याच्या कांठावरील निरनिराळ्या जागीं वसलेल्या तीस छावण्यांत ठेवलेले आहेत. हे बहुतेक सर्व कैदी बुद्धिजीवि असून आतां हातश्रमाचीं कामें करीत आहे. त्यांना देण्यांत येणारें अन्न हें निकस असून रोजच्या आहारांत कांदे किंवा पावटे यांपासून केलेलें सूप व कार्नमील असतें. कैदी दररोज १२ हून अधिक तास काम करतात. शौचकूप इत्यादि साधनें जवळजवळ नाहींतच त्यामुळें मृत्युसंख्या वाढतीच आहे. या कामावर धार्मिक व राजकीय पुढाऱ्यांची वेठकाम करणाऱ्या मजुरांतच गणना केली जाते.

लाहित्झा येथें कॅथॉलिक पाद्र्यांसांठीं एक खास छावणी आहे. तेथें दीड ते दोन हजार कॅथॉलिक पाद्री डांबलेले आहेत. आणि त्यांच्यावर अत्यंत मानखंडना करणारें काम लादलेलें आहे. व्हॅलचिआ परगाण्यांतील ओस्ट्रोव्हेनी छावणींत दोनशें कैदी आहेत. त्यापैकीं बहुतेक पूर्वाश्रमीचे व्यापारी किंवा मध्यमवर्गीय आहेत. बनात परगण्यांतील अनीना कॅंपमधील कैदी हे कामकरी आणि लोखंडाच्या खाणींत सक्तीनें कामाला लावलेले राजकीय कैदी आहेत. मोल्डोव्हा कॅंपमध्यें दहा हजार वेठीचे मजूर आहेत. ते नीम्झ परगण्यांतील बिकॅझजवळ विजेच्या कारखान्यांत काम करतात. ‘ स्वतंत्र ’ मजुरांबरोबरच कैदीहि एका मोठ्या कारखान्याच्या व धरणाच्या कामासाठीं जड वजनाचा माल वाहून नेण्याचें काम करतात. म्युटेनिआंतील जालोमिटझ छावणींत मोठमोठ्या शहरांतून व सरहद्दीवरून हलवलेले लोक कैदी आहेत. या कैद्यांत कामगार, पूर्वीचे जमीन मालक आणि राजकीय कैदी आहेत. ते डॅम्ब्रोविझडॅन्यूब कालव्याचें काम करतात. डोल्ज परगण्यांतील क्रैव्हा येथें एक ‘ खडतर ’ अशी छावणी असून तेथें १ हजार कैदी आहेत. ते बहुतेक लोकशाही राजकीय नेते आहेत. येथें कैदी वेठकाम करतात. आणि डॉ. इल्यू मॅन्यू ( शेतकरी पक्षाचा पकडलेला प्रमुख ) आणि लोकशाही पक्षांचे प्रमुख यांविरुद्ध त्यांनीं निवेदनें करावीं म्हणून जेलर त्यांचा

छळ करीत असतात. कोवुर्लुई परगण्यांतील गॅलत्झी येथें अत्यंत महत्त्वाचे राजकीय पुढारी डांबलेले आहेत. या छावणींत सोव्हिएट रशियांत पाठवल्या जाणाऱ्या निर्वासितांची बारीक तपासणीहि होते. आणखी पांच छावण्यांतून रस्ते व आगगाड्यांचे रस्ते बांधण्यासाठीं मजूर पुरविले जातात. युरोपांतील अत्यंत मोठ्या तेलाच्या खाणींचें केंद्र म्हणून असलेल्या प्लोइस्टीचे आसपास सर्वत्र सक्तमजुरीची पद्धति केंद्रित झाली आहे. देशांतल्या देशांत निर्वासित केलेल्या लोकांचे जे आंकडे मध्य युरोपच्या संशोधन केंद्रानें संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीकडे पाठविले आहेत ते विलक्षण धक्का देणार आहेत. रुमानियाची १९४८ सालची लोकसंख्या १५८७३००० इतकी होती. संयुक्त राष्ट्रांपुढें आलेल्या पुराव्यावरून साडेबारा लक्ष लोकांना सोव्हिएट रशियांत निर्वासित केले आहे. आणि अडीच लक्ष लोक देशांतल्या देशांत निर्वासित झाले आहेत. यावरून रुमानियाची सुमारें दहा टक्के लोकसंख्या एका जागेवरून उखडून दुसऱ्या जागीं फेंकून दिली आहे असें सिद्ध होत.

मागील वृत्तांवरून रुमानियांतील वेठपद्धत ही सोव्हिएट रशिया आणि त्याचे अंकित देश या प्रचलित असलेल्या वेठीच्या नमुन्याचीच आहे. या पद्धतीचा उद्देश एकच दिसतो तो हा कीं, कम्युनिस्ट सरकारला विशिष्ट वर्गीय किंवा लोकशाही–बुद्धिवादी म्हणून धोकेबाज वाटणारे सर्व लोक सामाजिक व राजकीय जीवनांतून सर्वस्वी उखडावयाचे आहेत. या असंतुष्ट लोकांचे सक्त श्रम घेऊन कम्युनिस्ट राष्ट्राची अर्थयोजना तडीला लावावयाची आहे.

● ● ●

अनुक्रम 30962
क्रमांक 2383
नों. दि.

# भाग आठवा

## अल्बेनिया—सोव्हिएट चौकी

कम्युनिस्ट राजकीय मतप्रणालीशीं अल्बेनियाच्या राजकीय मतप्रणालीचें बरेंच साम्य असलें तरी कम्युनिस्ट जगांत अल्बेनियाला वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. हा एकच सोव्हिएट गटांतील असा देश आहे कीं, जो खुष्कीच्या मार्गानें सरळ रशियाशीं जोडलेला नाहीं. दरम्यानच्या सोव्हिएट विरोधी देशांतून गेल्याशिवाय ह्या देशामधून रशियांत जातां येत नाहीं. ॲड्रियाटिक समुद्र व भूमध्य समुद्र यांवरील सोव्हिएट रशियाची चौकी होऊन बसलेला हा देश आहे. अल्बेनियाची सरहद्द दोन विरोधी राष्ट्रांच्या सरहद्दींशीं जोडलेली आहे. पैकीं एक विरोधी राष्ट्र म्हणजे युगोस्लाव्हिया. युगोस्लाव्हिया हा कांहींसा लोकशाहीकडे कल असलेला देश आहे. त्यामुळें अल्बेनिया हें वाढत्या प्रमाणावर कडक पोलिसी राज्य बनूं पाहत आहे. १९४८ पासून तेथें राजकीय गुन्ह्यांसाठीं वेठीची शिक्षा वाढत्या प्रमाणांत ठोठावली जात आहे. अर्थात वेठ मजुरांच्या छावण्याहि तेथें वाढत्या प्रमाणावर आहेत.

## वेठ कामाचें चित्र

हा लहानसा देश शेतीप्रधान आहे. त्यामुळें सक्तमजुरीसाठीं दलदल सफाई, कालवें बांधणें, रस्ते बांधणें, रेल्वे रस्त्यांची दुरुस्ती यांसारखीं खडतर शारीरिक श्रमांची गरज असलेलीं कामें योजलेलीं आहेत. साक्षीदारांच्या माहितीच्या आधारें पाहिलें तर अल्बेनियाच्या मध्य व दक्षिण भागीं वसलेल्या छावण्यांतून वेठीचे मजूर कामें करीत आहेत.

कामाचे तास व इतर परिस्थिति ही कम्युनिस्ट देशांत इतरत्र आहे तशीच येथेंहि आहे. सांगायला काम ८ तास पण प्रत्यक्षांत १० ते १२ तास करावें

लागतें. अन्न साधारणत: नेहमीं अपुरें व हलक्या प्रतीचें असतें. अल्बेनियां-तील तुरुंग व सक्तमजुरी छावणी या दोहोंतहि राहिलेल्या लोकांकडून असें समजतें कीं, दोन्ही ठिकाणीं अन्न सारखेंच असतें. फरक असला तर तो थोडा ब्रेडच्या प्रमाणांत असतो. तुरुंगांत ५०० ग्रॅम तर छावणींत ६५० ग्रॅम एवढेंच. इतर अंकित राष्ट्रांमध्यें कामाची कमाल मर्यादा जी आहे तीच येथेंहि. ती कमाल मर्यादा फार जाचक आहे. ती गांठतां आली नाहीं म्हणजे शिक्षा. निसत्त्व आहार आणि भयानक शारीरिक श्रम यांनीं कैद्यांची प्रकृति दुबळी बनतें. वैद्यकीय मदत जेमतेमच.

१४ जुलै १९५० रोजीं रशद इजाज आणि ९ डिसेंबर १९४९ ला स्कॅंदर धूम हे दोघे इसम ग्रीसमध्यें पळून गेले. त्यांनीं एका छावणीचें हुबेहूब शब्दचित्र रेखाटलें आहे. व्हलोकिस्टी गांवाच्या सीमेवर १२०० कैदी असलेली ती छावणी आहे. दुनावेक कालवा खणण्याच्या कामावर हे कैदी लावलेले होते. ३०० कैदी एकेका बराकींत अशा चार बराकी तेथें होत्या. या दुमजली इमारतींना दोन्ही दिशांना खुले दरवाजे होते. उन्हाळा असो वा हिंवाळा असो ते खुलेच असत. दाटी म्हणजे कमालीची. प्रत्येक कैद्याला ५० सेंटिमीटर इतकी जागा. शौचकूप इत्यादि सोयी नव्हत्याच. एक पाण्याची तोटी. तीवर तुरुंगाच्या स्वयंपाकासुद्धां सर्व गरजा भागवल्या जात. मुताऱ्या अगदीं थोड्या. कैद्यांच्याच अंगावर नव्हे तर इमारतींतहि उवा बुजबुजलेल्या होत्या. त्या नाहींशा करण्याची कोणतीहि तजवीज केली जात नव्हती.

आहार अपुरा असे. सकाळच्या न्याहारीला सगळ्या दिवसासाठीं म्हणून दिलेली ब्रेड असे. ती ६०० ग्रॅम ( १ पौंड आणि २ औंस ) इतकी मिळे. ती गळ्याखालीं उतरविण्यासाठीं चहा हें केवळ नांव असलेलें पेय कैद्यांना दिलें जाई. संध्याकाळीं आणि दुपारीं जेवण म्हणजे मॅकारोनी, बटाटे किंवा पावटे यांचें सूप.

सतत थकवा आणि सतत भूक हा नित्याचा परिपाठ. मित्रांनीं किंवा नातेवाईकांनीं पाठवलेलीं अन्नाचीं पार्सलें मिळत पण मधून मधून आणि

तीहि पोलिस अधिकाऱ्यांनीं त्यांची तपासणी करतांना त्यांना हवें तें त्यांतून काढून घेतल्यावर मिळत. कैद्यांच्या अंगावर कपडा म्हणजे त्यांनीं कैदखान्यांत येतांना बरोबर आणला असेल तेवढा.

तुरुंगाच्या दवाखान्यांत तीन कैदी डॉक्टरचें काम करीत. वैद्यकीय मदत नुसती अपुरींच होती असें नव्हे तर अतिशय आजाऱ्याच्या रोगावर डॉक्टरांनीं विश्रांतीची शिफारस केली तरी अधिकारी ती धुडकावून देत. डॉ. जुसूफ हायसेनबेग्ज् हे प्रोग्रॅडेर्सीचे, डॉ. स्पिरो ट्रेस्का हे कोर्कोचे आणि डॉ. धीमिटर लिटो हे गिरोकास्ट्राचे राहणारे. ते तिघे कैदी म्हणून तुरुंगांत असतांना त्यांनीं धिमिट्री टीराना नांवाच्या कैद्याला 'कामाला असमर्थ' असा रिपोर्ट दिला. पण स्कँडर हेमली या संरक्षक पोलिसानें त्या कैद्याला चुकार ठरवून त्याच्यावर काम चालूं ठेवण्याची सक्ति केली. हा पोलिस म्हणजे तेथील सर्वाधिकारी असा होता. डॉ. दररोज त्या कैद्याला 'कामाला असमर्थ' असा शेरा देत, पण व्यर्थ. अखेर एके दिवशीं कामावर जातां जातांच तो आजारी कैदी खालीं कोसळला आणि रस्त्याच्या कडेला मरून पडला.

पहाटे पांच वाजतां फावडीं, लांकडी फळ्या, कुदळी आणि हातगाड्या हातीं घेतलेले कैदी कामावर नेले जात. एकंदर कैदी सहा ब्रिगेड्स्मध्यें विभागलेले असत. एकेका ब्रिगेडमध्यें चार कंपन्या व प्रत्येक कंपनींत तीन तुकड्या असत.

कामाची जागा छावणीपासून सुमारें ७·५० किलोमीटर म्हणजे चार मैल दूर होती. तेथपर्यंत दुडक्या चालीनें जावें लागे. जे मागें रहात किंवा वेगानें पळूं शकत नसत त्यांना हातकड्या आणि मारझोड होई. अर्थात वयस्क आणि आजारी यांच्या नशिबीं हा प्रसाद ठरलेला असे. एखादा कैदी रस्त्यांत चालतां चालतां पडला तरी त्याला मदत करण्याची इतर कैद्यांना परवानगी नसे.

एकदां कामाच्या जागीं आल्यावर ३·५० क्यूबिक् मीटर खड्डा खणून तेथील माती दूर टाकण्याचें काम करावयाचें ही कामाची ठरवलेली किमान

मर्यादा असे. तरुण व सुदृढ कैद्यांना किमान मर्यादेबाहेर काम करावें लागे आणि ते त्यांनीं केलें नाहीं किंवा म्हाताऱ्यांना कामाची किमान मर्यादा गांठतां आली नाहीं तर कामाच्या वेळेबाहेर त्यांना काम करावें लागे; अन्न दिलें जात नसे. आणि शिकवण्यासाठीं म्हणून त्यांना कामावरून आल्यावर २४ तास खांबाला बांधून ठेविलें जाई.

## कैद करण्याचीं कारण

कैद करण्याचीं कारणें सांगणारी म्हणून इतर छावण्यांतील माहिती हीं बोधप्रद आहे.

मुर्हेरम मुल्ला नांवाचा इसम १९५२ मध्यें ग्रीसमध्यें पळून गेला. त्यानें दिलेली हकिकत अशी:—" माझा भाऊ राजकीय शरणार्थी म्हणून ग्रीसमध्यें गेला, म्हणून सुरक्षक पोलिसांनीं मला ताबडतोब गिरफदार केलें आणि टिराना-जवळ काम्झा येथें असलेल्या वेठीच्या छावणींत पाठवून दिलें. मी १५ फेब्रुवारी १९५० ला छावणींत गेलों आणि २५ नोव्हेंबर १९५१ रोजीं माझी सुटका झाली. माझ्या हातून कोणताच गुन्हा घडलेला नसल्यानें कोर्टासमोर चौकशी-साठीं मला पाठवण्यांत आलें नाहीं. ' लोकसंरक्षणार्थ ' या सबबीवर मला पकडलें होतें. काम्झाची छावणी ही ज्यांचे बंडखोर ठरवले गेलेले सगेसोयरे देशांत किंवा देशाबाहेर होते अशा माझ्यासारख्या लोकांसाठीं होती. तसेंच कोर्टानें दिलेली शिक्षा पुरी भोगूनहि जे कम्युनिस्टांच्या दृष्टीनें चालू जमान्याला ' धोकेबाज ' वाटत होते, असें लोकहि तेथें होतें. अल्बेनियांतील सर्व सत्ताधारी श्रमजीवि सरकारला वेठीला धरलेले मजूर राष्ट्राच्या फायद्याचे वाटत असल्यानें ही छावणी अस्तित्वांत आलेली होती.........."

मे १९५१ मध्यें ग्रीसमध्यें पळालेला झिल् सिलेज्मनी यानें पुढील वृत्तांत प्रसिद्ध केला आहे.

" सिगुरीमी पोलिसांनीं मला पकडलें आणि ३ महिने १९ दिवस तुरुं-गांत टेवलें. तेथें माझे हात पाय तारेनें बांधलेले होते. ११० दिवसांनंतर

मला लष्करी कोर्टापुढें उभें केलें. ते पांच न्यायाधिशांचें कोर्ट होतें. त्यांनीं मला निर्दोषी ठरविलें; तरीहि पोलिसांनीं मला सोडलें नाहीं. कोर्टाच्या निकालानंतर लगेच मला तेपेलानच्या छावणींत सक्तमजुरीसाठीं पाठवून दिलें. २७ डिसेंबर १९५० रोजीं मी त्या छावणींत पोहोचलों.

या छावणींत तीन प्रकारचे लोक होते. ( १ ) पकडलेले पण निरनिराळ्या कोर्टांनीं निर्दोषी म्हणून सोडल्यानंतर राजकीय पोलिसांना ' भयंकर ' असें वाटणारे ( २ ) कोर्टांनीं दोषी ठरवून दिलेली शिक्षा पुरी भोगल्यावरहि सरकारला धोकेबाज वाटणारे आणि ( ३ ) परदेशीं पळून गेलेल्या राजकीय लोकांचे सगेसोयरे."

सलाहउद्दीन हक्शू हा इसम १९५२ मध्यें ग्रीसमध्यें पळून गेला. त्याची हकिकत अशी:— " मी सैन्यांत काम करीत होतों. १२ एप्रिल १९४९ ला सिगुरीमी पोलिसांनीं मला अचानक पकडलें. आणि तिरानो येथील पोलिस ठाण्यावरील कोठडींत २॥ महिने ठेवलें. नंतर मला लष्करी कोर्टापुढें उभें केलें. मी माझ्या कंपनींतील शिपाईगड्यांमध्यें कम्युनिझमविरुद्ध प्रचार करतों या आरोपाखालीं मला कोर्टानें १८ महिन्यांची शिक्षा दिली. मला तुरुंगांत पाठवलें आणि जानेवारी १९५० मध्यें एल्बासान जिल्ह्यांतील बिस्केमीच्या वेठीच्या छावणींत पाठवून दिलें. बिस्केमीच्या छावणींत साधे व राजकीय गुन्हेगार ठेवीत. तसेंच बेकायदेशीर कृत्यांत गुंतलेल्या कम्युनिस्ट पार्टी-सभासदांनाहि ठेवीत. साधे गुन्हेगार व कम्युनिस्ट कैदी यांना इतर राजकीय गुन्हेगारांवर पाळत ठेवण्याचें काम असे. बिस्केमीच्या छावणींत देशांतील सर्व तुरुंगांतून कैदी येत. जेव्हां कैदी मरत किंवा शिक्षा पुरी भोगून झाल्यामुळें त्यांना सोडीत तेव्हां त्यांची जागा दुसऱ्या कैद्यांनीं भरून काढण्यांत येई. पोलिसांना कैद्यांची तूट कधींच पडत नसे. जेव्हां कैद्यांची संख्या कमी पडे आणि विनावेतन सक्तश्रम करणाऱ्या मजुरांची उणीव भासे तेव्हां कम्युनिझमचे आणखी दुसरे विरोधक पकडले जात आणि इतर असामी देश-

बांधवांबरोबर त्यांची छावणींत रवानगी होई. सध्यांच्या सरकारचा, कम्यु-निस्ट नसलेल्या लोकांना शिक्षा करण्यांत विशिष्ट हेतु आहे. कम्युनिझम विरोधी लोकांचा पद्धतशीर नाश करणें हा तर हेतु आहेच पण पैसा खर्च करावा न लागतां त्यांच्या शारीरिक शक्तीचा अधिकांत अधिक उपयोग योजनांसाठीं करून घ्यावयाचा.

## सोव्हिएटचें अनुकरण

कम्युनिस्टांनीं अल्बेनियांतील सत्ता काबीज केल्यानंतर अल्पावधींतच तेथील वेठीनें कम्युनिस्टशाहींमधील पद्धत स्वीकारली आहे. ती म्हणजे राजकीय भिन्न मतवाल्या लोकांचा कांटा काढून त्यांना पूर्वनियोजित आर्थिक योजना पार पाडावयास लावावयाचें. इतर मोठ्या अंकित राष्ट्रांत वेठीचा जो नमुना तोच याही देशांत आहे. पण येथील आणखी एक विशेष असा कीं, लोकशाही मतें व कम्युनिझम विरोधी मतें किंवा कृति यांसाठीं तर शिक्षा होतातच. पण शिवाय लोकांना टीटोवादी म्हणूनहि भयंकर शिक्षा होतात. १९४८ पासून अल्बेनियांतील सरकारनें लोकशाहीवादी व टीटोइस्ट या दोन्ही पाखंड्यांना खड्यासारखें वेगळें काढलें आहे. या देशाच्या सरहद्दीवर कडेकोट बंदोबस्त असतो. इतका कीं, कम्युनिस्टांनाहि तो कडक वाटावा. आणि सोव्हिएट युनियन खेरीज कोणत्याच देशांशीं येथून दळणवळण नसतें. तरीहि स्वतंत्र जगांत जाऊन सक्तमजुरीच्या कहाण्या जगाच्या कानांवर घालणारे कित्येक लोक युगोस्लाव्हियांत व ग्रीसमध्यें पळून गेले आहेत. स्वतंत्र अल्बेनिया-साठीं अस्तित्वांत असलेल्या राष्ट्रीय समितीनें ( रोम ) या कहाण्या एकत्र करून त्यांचें पृथकरण केलें. आणि संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीपुढें आक्टोबर १९५२ मध्यें पुरावा पुढें ठेवला.

# भाग नववा

## पादाक्रांत पूर्व जर्मनी

कम्युनिस्ट वेठ विगार पद्धतीचा जर्मनींत फार मोठ्या प्रमाणावर अवलंब केला गेला. रशियनांनीं पकडलेले जर्मन कैदी शेंकडों हजारांनीं सोव्हिएट युनियनमध्यें वेठ मजुरीसाठीं लावले गेले. या जर्मन कैद्यांची काय व्यवस्था आहे, याबाबत सोव्हिएट सरकारनें अवाक्षरहि उच्चारलेलें नाहीं. युद्धानंतर कैद केलेल्यांपैकीं कांहीं थोडेंच घरीं परतले आहेत. वेठ व निर्वासन या तडाख्यांत सांपडलेले लोक दहा लक्ष तरी असतील असा अंदाज आहे. पण सक्तश्रमाची ही बाजू येथें विचारांत घ्यावयाची नाहीं. त्याचप्रमाणें रशियाला निर्वासित झालेल्यांबद्दलहि विचार करावयाचा नाहीं. जपान व पश्चिम जर्मन सरकारचें रिपोर्ट पहा.

गेल्या युद्धांत जर्मनीनें अनेक राष्ट्रें उध्वस्त केल्यानें त्यांची नुकसान भरपाई करण्याला जर्मनी बांधलेला असला तरी सोव्हिएट आक्रमित पूर्व जर्मनी हाच एक असा देश आहे कीं, जेथें आक्रमकांनीं सरळ आपल्या फायद्यासाठीं जर्मन मजुरांची पिळवणूक चालवली आहे. पूर्व जर्मनीचें नवें नांव जर्मन लोकसत्ताक जनराज्य असें असलें तरी तें सोव्हिएट आक्रमक सत्ताधारांच्या हातांतील त्यांच्या तालावर नाचणारें बाहुलें होऊन बसलें आहे.

## पूर्व जर्मनींतील वेठीची पद्धति

जर्मनींतील वेठीची पद्धति दोन प्रकारची असल्यानें ती रशियाच्या इतर अंकित राष्ट्रांहून निराळी आहे. इतर राष्ट्रांत असणाऱ्या वेठपद्धतीला जर्मन लोकशाही जनराज्यानें कायद्याच्या चौकटींत बसविलें आहेच, पण शिवाय आक्रमणाच्या हुकुमावर हुकूम सोव्हिएट अधिकाऱ्यांना तेथील सर्वसत्ता

मिळालेली आहे. खास योजनांसाठीं कामकरी पाहिजे असतील तेव्हां फक्त त्यांची भरती करावयाची. हिटलरच्या शस्त्रनिर्मितीच्या कारखान्यांत ज्या पद्धतीनें वेठकामाचा हुकूम दिला जाई तसाच या कारकीर्दीत मजुरांचे अधिकारी हुकूम देतात. पूर्व जर्मनीस अविश्वसनीय ठरल्यानें जनतेंतून उखडून टाकलेल्या लोकांचीच आर्थिक पिळवणूक होते असें नव्हे तर स्वतंत्र मजुरांनाहि वेठीला लावण्याचें काम मजूर कायद्यांनीं केलें जातें. इतर अंकित राष्ट्रांतहि हीच स्थिती असली तरी जर्मनी हा आक्रमित देश असल्यानें तेथें याबाबत अधिक कडकपणा आहे.

झेकोस्लोव्हाकियाप्रमाणेंच येथेंहि ज्या एकमेव राष्ट्रीय योजनेंत अधिकांत अधिक वेठीला धरलेले लोक आहेत ती म्हणजे युरेनियम खाणीची. पूर्व जर्मनींत विशेषतः सॅक्सनींत झेकोस्लोव्हाकियांतील युरेनियमचे भूस्तर येऊन पसरलेले आहेत, सोव्हिएट आक्रमणानंतर लगेंच ही खनिज संपत्ति काढण्याचें काम सुरू झालें आणि तें उत्तरोत्तर वाढत्या वेगानें सुरू आहे. या खाण-कामाची व्यवस्था पाहण्यासाठीं एक खास कॉर्पोरेशन सोव्हिएट अधिकाऱ्यांनीं स्थापन केलें आहे. खाणींतून काढलेलें युरेनियम त्याचप्रमाणें त्याच्याशीं संलग्न असलेल्या इतर उत्पादित वस्तु या ॲटम् शक्तीच्या निर्मितीसाठीं सोव्हिएट युनियनकडे पाठविल्या जातात.

या खाणींपैकीं बऱ्याच खाणी कित्येक वर्षांपूर्वींपासून नुसत्या पडून होत्या. वीस वर्षांनंतर खाणकामगारांच्या रक्षणासाठीं त्यांत आधुनिक यंत्रसामुग्री उभीं करणें आवश्यक होतें. पण तांतडीचें उत्पादन हें सोव्हिएट सरकारला आवश्यक वाटल्यामुळें अत्यंत प्राथमिक स्वरूपाच्या सुरक्षणाची काळजी घेण्यासाठीं लागणारी उपाययोजनाहि न करतां खाणींतून काम सुरू झालें.

सुरवातीला सक्त श्रम घेतले जात नव्हते. स्वेच्छेनें येणाऱ्या कामगारांनाच अधिकारी कामावर घेत. आणि त्यांनीं मोठमोठ्या पगारांचें आमिष दाखवून कुशल कामगारसेना मिळविण्याचा प्रथम यत्न केला. पण लवकरच ही ऐच्छिक

भरती थांबवून वेठीसाठीं भरती सुरू झाली. कारण आमिषें दाखविलीं तरी पूर्वीच्या कामगारांच्या अनुभवावरून अनेक साधार बातम्या प्रसृत झाल्या आणि कामगारांची संख्या घटली. तेव्हां प्रत्येक म्युनिसिपालिटीला अमुक संख्येपर्यंत मजूर पुरविण्यासंबंधीं कायद्यानें आदेश दिला. वेठीसाठीं वाटेल तशी भरती केली जात असल्यानें इतर कम्युनिस्ट देशांतील छावण्यांत राजकीय कैदी संख्येनें अधिक असतात तसे येथें नाहींत. पण १९४५ सालापासून मात्र ही संख्या वाढून हें प्रमाण बदलूं लागलें आहे. प्रारंभीं राजकीय कैदी म्हणजे युद्ध गुन्हेगार किंवा नाझी म्हणून ज्ञात असलेले लोक असत. पुढें ज्या लोकशाही पक्षीयांनीं समाजवादी ऊर्फ कम्युनिस्ट पक्षापुढें मान तुकवण्याचें नाकारलें त्यांचा राजबंद्यांत समावेश झाला. याशिवाय शहरवासी मध्यमवर्गीय लोकांना जनतेचे शत्रु म्हणून डागळण्याचा सपाटा सुरूं झाला. त्याचबरोबर नव्या जमिनीच्या वांटपपद्धतीनें अधिक यशस्वी झालेल्या शेतकऱ्यांनाहि नाहींसें करण्यांत आलें. हे सर्व लोक आणि पाश्चिमात्यांबद्दल सहानुभूति बाळगल्याचा ज्यांवर आरोप ठेवला असे लोक कम्युनिस्ट 'न्यायाच्या' वरवंट्याखालीं म्हणजे वेठीला धरले गेले.

## फ्रिट्झ लोएन्थालची कहाणी

डॉ. फ्रिट्झ लोएन्थाल हा एक जर्मन वकील असून पूर्वी कम्युनिस्ट होता. १९४६ सालीं पूर्व जर्मनींत सोव्हिएट अंमलामध्यें तो न्यायखात्याचा संचालक झाला. पुढें कम्युनिझमशीं असलेला आपला संबंध तोडून तो पश्चिम जर्मनींत पळून गेला. १९४७ सालीं जर्मनीच्या युरेनियमच्या खाणींतील परिस्थिति त्यानें नजरेनें पाहिली असल्यानें त्याची साक्ष महत्त्वाची आहे. कम्युनिस्टांच्या सर्जीत असतांना एके दिवशीं त्यानें खाणकामगारांची अवस्था ही अगदीं जवळून निःपक्षदृष्टीनें पाहिलेली आहे. आणि तो स्वतः कम्युनिस्टांचा शिकार झालेला नसल्यामुळें त्यानें सांगितलेलें वृत्त हें गढूळ नजरेनें सांगितलेलें नाहीं. डॉ. लोएन्थालनें सांगितलेली हकिकत व आंकडे ह्या गोष्टी विशेष-

करून जबरीनें भरती केलेल्या कामगारांच्या परिस्थितीबद्दल असल्यानें पूर्व जर्मनींतील ‘ स्वतंत्र मजुरी ’ व ‘ वेठ मजुरी ’ यांचा नमुना दर्शविणाऱ्या आहेत.

“ मी इवॉका येथें असतांना शेजारींच काय घडत होतें तें माझ्या कानीं आलें, म्हणून मी मोटरीनें इनीवर्गला निघालों. कांहीं थोड्या तपासानंतर येथील वेठमजुरीचा शोध बाहेरच्या जगाला कां लागलेला नाहीं हें मला समजलें. तेथील कामगारांचा आंकडा कुणालाच नक्की असा माहीत नसला तरी येथें कित्येक हजार मजूर खाणींत आणि खाणीबाहेर मानवी संस्कृतीच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंतील हत्यारांच्या साहाय्यानें कामें करीत आहेत.

हिटलरच्या कारकीर्दींत शस्त्रनिर्मितीच्या कारखान्यांतून कामगारांकडून जशीं जबरीनें श्रमाचीं कामें करून घेत त्याप्रमाणेंच कामगारांची प्रकृति, धंदा, कौटुंबिक परिस्थिति याचा कांहींहि विचार न करतां मजूर भरती करणाऱ्या अंमलदाराच्या मदतीनें लागतील तेवढें मजूर आणून खाणींत समजविले जातात. विशिष्ट कामाला विशिष्ट माणूस उपयोगी आहे कीं नाहीं यासंबंधीं मुळींच विचार न करतां जनतेंतील सर्व थरांतून मजुर-भरती केली जाते. ऑफिसांत काम करणारे, विद्यार्थी, न्हावी, पूर्वीं वकिली करणारे, अंमलदार, म्हणजे ज्यांना हातपाय आहेत अशीं कोणतींहि माणसें भरती केलीं जातात. कायद्यानें १८ ते ४५ वयापर्यंत भरती करावयाची अट आहे. परंतु प्रत्यक्षांत १४ वर्षांचीं पोरें आणि ६५ किंवा त्याहून अधिक वयाचीं माणसें कामाला लावलीं जातात. स्वतःचे अंगावरचें पोर किंवा वर्षाचे आंतील पोर असेल तरच स्त्रीची कामांतून सुटका होते. एखाद्या कुटुंबांतील दोन तीन माणसें कामावर दाखल करून घेतलेलीं असतील तरच त्या कुटुंबांतील गृहिणीला कामाची माफी मिळे.

खाणींत अगदीं प्राथमिक स्वरूपाचीं संरक्षण-साधनेंहि नव्हतीं. धुळीपासून बचाव करण्याची योजना नव्हती. हवा आणि उजेडहि पुरेसा मिळण्याची व्यवस्था नव्हती. गर्दीमुळें उबलेली कोंदट हवा बाहेर घालविण्याची सोयहि

नव्हती. खाणींत उभ्या केलेल्या फळ्या या कुजलेल्या होत्या. भिजलेल्या फळ्यांच्या जिन्यावरून कामगारांना खाणींत उतरावें लागे आणि दलदलीच्या वाटांतून सतत आठ आठ तास काम करावें लागे. तेथें बहुधा गुडघा गुडघा पाणी असे आणि त्यांत वाकून काम करावें लागे. ह्या खाणी बंद होण्या-पूर्वी त्यांतील खनिज पदार्थ घोडे वर वाहून आणीत असत. आतांच्या सुधारणा युगांत मात्र माणसें ह्या गाड्या वर ओढून आणतात.

भूगर्भांत अविरतपणें तीन पाळ्यांनीं काम चालतें. किमान काम म्हणजे तीन क्युबिक मीटर्स खोदणें. जमिनिवर कामाच्या दोन पाळ्या असतात. मग गुदमरण्याइतका उन्हाळा असो किंवा मुसळधार पाऊस असो. दुसऱ्या दिवसासाठीं कामगार कपडे कुठें वाळवतात याचीहि कोणी चौकशी करीत नाहीं. प्रत्येक माणसानें मग तो लहान असो वा स्त्री असो वा पुरुष असो रविवारीं काम केलेंच पाहिजे. साधारणतः महिन्यांतून एक दिवस सुटी असते.

भीषण अपघात अनेक होतात. त्यांतहि खाणींत दगड कोसळून पडल्यानें होणाऱ्या अपघातांचें प्रमाण अतिशयच आहे. २५ एप्रिल १९४७ ला तीन नंबरच्या पिट्मध्यें एक सारी गॅलरी कोसळून तीं खालीं वीस लोक ठार झाले. त्यानंतर कांहीं दिवसांनीं अब्राहममध्यें मध्यरात्रीं-नंतर भयंकर अपघात झाला. व त्यानंतर लातेर पिट्मध्यें झाला. म्हणजे अशा रीतीनें अपघाताचें चक्र सतत सुरू असून कामगारांच्या जीवित-रक्षणासाठीं कांहींहि केलें गेलें नाहीं.

अशा स्थितींत मेलेल्या कामगारांचे जागीं दुसऱ्या पुरुषांची पुरेशी भरती होणें कठीण होऊं लागलें त्यामुळें अखेर मुली व बायका यांची भरती एप्रिलमध्यें सुरू झाली. कामगार कचेरींत इतर स्त्रियांबरोबर गरोदर स्त्रियाहि बोलाविल्या होत्या. लहान मुलांच्या आया आणि एकहि बुटांची जोडी नसलेल्या अनवाणी बायकाहि आणल्या गेल्या. ज्यांची निवड झाली त्यांना सल्फ्यूरिक् अॅसिड् कार्पोरेशनमध्यें काम करण्यासाठीं मेरियनबर्गला नेत असल्याचें सांगण्यांत आलें. त्यावर कोणतेंहि म्हणणें ऐकलें जात नव्हतें. रेशन-

काढें त्यांच्याकडून काढून घेऊन त्यांच्यावर जाण्याची आणखी सक्ति केली. मेरियन- बर्गला पोहोंचल्यावर त्या स्त्रियांना मोठमोठे मातीचे ढीग खणून काढण्याचें काम दिवस पाळीनें आणि रात्रपाळीनें दिलें. तें काम म्हणजे थकव्यानें त्या निपचित पडण्याइतकें होतें. खूप भारी श्रमाचें काम करण्या-साठीं असलेलें रेशनकार्ड त्यांना दिलें जाई. कांहीं जादा अन्न आणि कधीं कधीं आमिष म्हणून सिगारेट्स् दिल्या जात; पण ज्या मानानें श्रम पडत त्या मानानें शक्ति भरून येण्याइतकेंहि पुरेसें अन्न रेशनवर मिळत नसे.

एर्झेबर्गला जे तरुण पाठविले आहेत, त्यांच्या पन्नास पन्नासच्या तुकड्या केल्या आहेत. एका खोलींत ४ ते ६ जणांना ठेवतात. त्या खोलींत लांकडी पलंग, सुती पोतीं आणि असलें तर एखादें ब्लँकेट असतें. आणि त्यासाठीं त्यांना महिना १८ मार्क इतकें भाडें द्यावें लागतें. जे लोक जमिनीखालीं काम करतात, त्यांच्यांतील जबर मेहनतीचें काम करणारांसाठीं रेशनकार्डें असतात. जे जमिनीवर काम करतात, त्यांच्यासाठीं दुसऱ्या प्रतीचीं रेशनकार्डें असतात. याशिवाय महिन्याला प्रत्येकाला १ किलोइतकें अन्न, पाऊण किलोइतकें ओट, बार्ली किंवा नूडल्स आणि अर्धा किलो लोणी आणि मांस मिळतें. खाणींत काम करणाऱ्या कामगारांना १०० ग्रॅम चीझ आणि २०० ग्रॅम चरबी काढून घेतलेलें दूध दिलें जातें. दुपारचें जेवण अगदींच भिकार असतें. त्यांत भाज्या नसल्यानें स्कर्व्हीचें भय सर्वांनाच. ब्रेड आंबट लागते आणि ती खाल्ल्यावर जठरांचीं आणि आंतड्यांचीं दुखणीं सुरू होतात.

कामगारांकडून निर्घृणपणें काम करून घेतलें जातें. पहाऱ्याला ठेवलेले रशियन पहारेकरी सारखे ' द्या, द्या ' म्हणून ओरडत असतात. ठोसे आणि लाथा मारण्यांत ते तत्पर असतात. व्यवस्थापकांच्या मताप्रमाणें कामगारांकडून काम कमी झालें असें ठरल्यास त्यांना अन्नच दिलें जात नाहीं. प्रत्येक कामाच्या पाळीनंतर गरम ताजें अन्न मिळावें असा नियम असला तरी तसें अन्न कामगारांना मिळत नाहीं.

या सर्वांचा नैसर्गिक परिणाम म्हणजे सततचें आजारपण. पण उघड उघड दिसणाऱ्या जखमा नसल्या किंवा खूप ताप हाताला लागत नसला तर आजारी माणूस काम करायला लायक आहे असें समजलें जातें. जर्मन डॉक्टरांनीं ' कामाला असमर्थ ' असे शेरे आजारी कामगारांसंबंधीं मारले तर ते ' विद्रोही ' म्हणून शिक्षेस पात्र ठरण्याचा धोका असतो. कारण नसतांना एखादा मजूर कामावरून एक दिवस गैरहजर राहिला तर त्याला अन्नासाठीं तीन दिवस चिठी मिळत नाहीं. दोन दिवस गैरहजर राहिला तर ६ दिवस अन्नाची चिठी मिळत नाहीं.आणि तीन दिवस गैरहजर असणारांना पोलिसांच्या ताब्यांत दिलें जातें.

## सोव्हिएट अंकित पूर्व जर्मनी

१९४७ मध्यें एका खाणींतील स्थितीसंबंधीं ही माहिती मिळाल्यापासून वेठपद्धतीला उत्तरोत्तर पूर्व जर्मनींत बहरच येत असल्याचा पुरावा मिळत आहे. राजकीय विरोधकांचा, शत्रूंचा आणि अविश्वसनीय व्यक्तींचा नाश हळूंहळूं केला जात आहे. पश्चिम जर्मनींत पूर्व जर्मनींतून पळून येणाऱ्यांची रीघ पाहिली आणि लांब पसरलेल्या सरहद्दीवरून सतत पश्चिमेकडे येणाऱ्या निर्वासितांच्या संख्येकडे पाहिलें म्हणजे मुळांतच असंतुष्ट असलेल्या या लोकांवर सरकारी दडपण कशा प्रकारें येत आहे याची कल्पना येते.

स्वतंत्र मजदूर संघानें ( ब्रूसेल्स ) आणि स्वतंत्र ज्जूरसंच्या समितीनें ( बर्लिन ) लोकांनीं शपथेवर सांगितलेल्या हकिकती संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीपुढें ठेवल्या. रशियानें पूर्व जर्मनीवर आक्रमण केलें तेव्हां अंशतः उध्वस्त झालेल्या उद्योगधंद्यांची आतां पुनः स्थापना झालेली आहे. आणि नव्या उद्योगधंद्यांसाठीं लागणारी मनुष्य-शक्ति ही राजकीय ' गुन्हेगार ' आणि धडधाकट कामकरी या दोन्ही वर्गांची वेठीसाठीं भरती करून मिळविली जात आहे.

❁ ❁ ❁

# भाग दहावा

## पोलंड

पोलंड हा सोव्हिएट अंकित राष्ट्रांतील एकच असा देश आहे कीं, ज्याची सर्व सरहद्द कम्युनिस्ट देशांच्याच हद्दींना भिडलेली आहे. त्यामुळें ह्या देशांतून एखाद्याची सुटका होणें हें भौगोलिक स्थितीनेंच अगदीं कठीण आहे. परंतु वेठीच्या पद्धतीचें ओझरतें चित्र उभें करण्याइतके पोल लोक पोलंड-मधून पळून गेले आहेत. आंतरराष्ट्रीय स्वतंत्र पत्रकारांच्या समितीकडून संयुक्त राष्ट्रांच्या समितीपुढें जो पुरावा मांडला गेला त्यावरून १९५२ च्या ग्रीष्म ऋतूंत पोलंडमध्यें वेठमजुरीसाठीं ७४ छावण्या असून ११६००० ते १४८००० लोक तेथें होते असें दिसून येतें. सोव्हिएटमधून निसटलेल्या राजकीय कैद्यांच्या पोल समितीनें असाच पुरावा दिला आहे.

## वेठीच्या छावण्यांचें जाळें

नियोजित आर्थिक योजनांची अंमल बजावणी चालू असतांना प्रमुख औद्योगिक योजना स्थळें आणि छावण्या हीं जवळ जवळच सांपडतात. भारी उद्योगधंद्यांसाठीं किंवा लष्करी डावपेंचांचीं दळणवळणांचीं साधनें निर्माण करण्यासाठीं येथील कामगार कामावर घेतले जातात.

छावण्या दोन प्रकारच्या असतात. कांहीं स्थायी तर कांहीं फिरत्या. आगगाडीचे रूळ तयार करणें व लोहमार्ग टाकणें यासाठीं गरजेप्रमाणें छावणी हालवली जाते. सायलेशियन खाणीजवळ किंवा लोक् लॉवेक्च्या मायलेथिन जिल्ह्यांत कॉंक्रीटच्या प्लेटस् आणि ठोकळे तयार करण्याचें काम चालतें. अशा ठिकाणीं स्थायी छावण्या असतात.

संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र समितीपुढें १९५२ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत आलेल्या प्रमाणांवरून पुढील ठिकाणीं छावण्या असल्याचें सिद्ध होतें.

( १ ) बुग नदीपासून २ मैलांवर जमोस्क व्लोड वोलिन्स्की रेल्वे रस्त्याजवळ लेजनोग्रोनोवो नांवाची छावणी आहे. या छावणींतील कैद्यांना लोडाझीमिर्झ वोलिन्स्कीपासून उसीलाव मधून जाणारा ऱ्हुबीयसजाव आणि जमोस्कपर्यंतचा रेल्वे रस्ता बांधण्याचें काम करावें लागतें. त्याचप्रमाणें मोरोजीनचा हवाई तळ, उसीयुगचा रेल्वेपूल, स्ट्रजाइजवळचा स्फोटक पदार्थांचा कारखाना, आणि हुजीन येथें जमिनीखालीं बांधला जाणारा शस्त्रनिर्मितीचा कारखाना येथील कामें या छावणींतील कैद्यांकडून करवून घेतलीं जातात.

( २ ) शहरांतील घरें बांधण्यासाठीं जे कैदी लागतात ते वॉर्सा येथील ' घेरो ' ' गोर्नोग्लास्का ' ' पॉडचोराझिश् ' या छावण्यांतून पुरविले जातात.

( ३ ) झ्लोटोरिआ के. लेग्निसी येथून तांब्याच्या खाणींत १५०० कैदी कामावर लावलेले आहेत.

( ४ ) रोकिट्निका के काटोविक्, स्झोपिएनिस्–जानॉव, जावोंझ्नो के काटोविक्, वनूरोग के रिबनिका, आणि क्रिओफास येथील छावण्यांतील कैदी ओस्ट्राव्हा येथील कोळशाच्या खाणींत काम करतात.

## वन्दी शहर

झाइकोविस् शहरांत एक तरुण पोल अधिकारी म्हणून काम करीत होता. तो पोलंडहून पळून गेला. तत्पूर्वीच्या त्या शहरांत असलेल्या तुरुंगाचें व वेठीच्या छावणीचें त्यानें वर्णन केलें आहे. तो स्वतः छावणींत नव्हता; परंतु तेथील पद्धति व परिस्थिति त्यानें पाहिलेली आहे.

स्ट्जेप्टा ओपोस्कीज या नांवाच्या शहराचें सारें जीवन सायनेसियाच्या मोठ्या छावणीशीं निगडित आहे. तेथील कैद्यांची संख्या १२ ते १५

हजारांपर्यंत आहे. या तुरुंगांत दोन कारखाने आहेत. पैकीं मोठ्या कारखान्यांत सैन्यासाठीं जोडे तयार केले जातात. जवळच असलेली मोक्रेलॅनी आणि सुशेलॅनी हीं मोठालीं शेतेंहि कैद्यांकडून केलीं जातात. एक स्थानिक हाशण्याची बाब म्हणून असें म्हटलें जातें कीं, हीं दोनच शेतें नफा दाखवण्यासाठीं उपयोगी पडतात. पूर्वीं स्थानिक खडूच्या आणि चुनखडीच्या कारखान्यांत कैदी काम करीत असत; पण १९५१ मध्यें वेठीसाठीं छावणी तयार झाल्यापासून कैदी दुसरीकडे काम करतात.

कैदी आणि वेठीचे मजूर हे सारख्याच तऱ्हेचे कपडे वापरतात. पूर्णपणें केस काढून टाकलेल्या डोक्यावर लहानशी टोपी आणि पायांत लांकडाचे जोडे हे लोक घालतात. अन्नाची कमतरता आणि तेंहि निकस असतें. स्टूजेलस आयोलस्की येथील शेतकीच्या अवजारांच्या कारखान्यांत स्वतंत्र आणि वेठीचे असें दोन्हीहि मजूर आहेत. सुमारें एकूण ६०० कामगारांपैकीं १० टक्के लोक हे वेठीचे आहेत. ते बहुधा ‘ राजकीय ’ कैदी असावेत.

## मॉडलीन येथील वेठीची छावणी

ऑस्ट्रेलियांत पळून गेलेल्या एका तरुण पोलनें मॉडलीन येथील वेठीच्या छावणीचें बारकाईनें वर्णन दिलेलें आहे. एप्रिल १९४६ पासून डिसेंबर १९४८ पर्यंत तो तेथें कैदेंत होता. त्या सुमारास या छावण्यांच्या स्थापनेला नुकतीच सुरवात होत होती. तो म्हणतो:—

“ या छावणींत लांकडी चार बराकी होत्या. प्रत्येक बराकींत ५० प्रमाणें २०० कैद्यांसाठीं या छावणींत सोय होती. प्रत्येक बराकींत तेथील ५० राहत्या कैद्यांसाठीं एक सर्वसाधारण खोली होती. प्रत्येक बराकींत एक शौचकूप आणि एक धुण्यासाठीं खोली होती. त्या छावणीभोंवतीं कांटेरी तारेचें कुंपण होतें. तें ३ मीटर उंच आणि ३ मीटर रुंद होतें. कुंपणाच्या मधोमध देखरेखीसाठीं उंचसा बुरुज होता. तेथें एक भारी मशीनगन् आणि एक सारा कॅंप दिसेल असा एक आरसा होता.

" अन्नाची कमतरता आणि तेंहि फार वाईट होतें. सकाळच्या न्याहारीसाठीं काळी कॉफी, १०० ग्रॅम ब्रेड (एक चतुर्थांश पौंडापेक्षां कमी). दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणासाठीं कोबीचें किंवा पावस्याचें सूप आणि ब्रेडचा एक एक तुकडा मिळे. खास अन्न म्हणजे शुक्रवारीं दोन बटाटे आणि एक मासा मिळत असे. दोन बटाट्यांपैकीं एक बटाटा खाण्याला अयोग्यच असे. अडीच वर्षें कँपमध्यें असून मांस किंवा मांसाचे पदार्थ मीं खाल्लेले नाहींत.

" या छावणींत वीस पहारेकरी असून दोन शिकारी कुत्रें होतें. कांहीं पहारेकरी अतिशय कडक असून बाकीचे आपल्या कामाविषयीं निष्काळजी असत. शंभर शंभराच्या दोन गटांनीं कैद्यांना कामावर नेलें जाई. जर्मनांनीं नासधूस केलेल्या एका किल्ल्याची पुनर्बांधणी करण्यासाठीं एक गट पायीं नेला जाई. दुसरा गट हा जवळच्याच दगडाच्या खाणीवर नेला जाई. बहुतेक वेळां या गटाला ट्रक्समधून नेलें जाई. प्रत्येक ट्रकमध्यें २५ कैदी आणि चार बंदुकधारी पहारेकरी, असे चार ट्रक्स कैद्यांना नेत. ट्रक ड्रायव्हर हे बिनलष्करी असत. कैद्यांना त्यांच्याशीं बोलण्याची सक्त मनाई असे. एखादा कैदी ड्रायव्हरशीं बोलतांना दिसला तर त्या कैद्याला पहारेकरी बेदम मारीत असत. जेव्हां ट्रक मिळत नसे तेव्हां दगडाच्या खाणीवर पायीं जावें लागे. या खाणी अर्ध्या तासाच्या अंतरावर होत्या. जेव्हां चालत जाण्याचा प्रसंग येई तेव्हां कैद्यांबरोबर ६ ते ८ पहारेकरी असत. तीन बाजूंनीं खाणीच्या सरळ उंच भिंती आणि ४ थ्या बाजूला कांटेरी तारेचें प्रवेशद्वार अशा रीतीनें खाण ही पूर्ण संरक्षित असे. खाणींत सुरुंग लावण्याचें काम पहारेकरी करीत. पण बाकीचे सर्व काम कैद्यांना करावें लागे. जाण्यायेण्याचा वेळ जमेस धरून कामाचे तास सकाळीं ६ ते १२ आणि साडेबारा ते संध्याकाळीं ६ असे असत. कामासाठीं पगार नसे.

एका कैद्यानें काम करण्याचें नाकारतांच त्याला इतकी मारहाण झाली कीं दवाखान्यांत नेण्याइतकी वेळ गुदरली. काम चुकारपणा करणाराला

चंदुकीच्या दस्त्यानें पहारेकरी चोपून काढीत. रात्रीं ९ वाजतां प्रत्येकानें निजलें पाहिजे असा निर्बंध होता. पहारेकऱ्याला एखादा माणूस बिछान्या-बाहेर किंवा दुसऱ्याशीं बोलतांना आढळला तर त्या खोलींतील ५० हि कैद्यांना बराकीबाहेर हांकलून काढून रात्रभर 'तय्यार' असें उभें रहावें लागे. आणि दुसऱ्या दिवशीं अन्नाशिवाय काम करावें लागे. छावणींत वैद्यकीय मदत नसे. अतिशय आजारी कैद्यांना तपासण्यासाठीं दर शुक्रवारीं एक डॉक्टर येई.

वेठमजुरांची वर्गवारी सांगणारा साक्षी पुरावा मिळालेला नाहीं. परंतु सोव्हिएटच्या कडक नियंत्रणाखालीं असलेला हा देश रशियाच्या अंकित असलेल्या इतर देशांहून या बाबतींत निराळा असेल असें वाटत नाहीं. विरोधकांना किंवा संशयितांना दडपून टाकण्यासाठीं कैद आणि वेठ या दोन उपायांचा वापर होत असे. पोलिश निर्वासितांनीं त्याच त्या कंटाळ-वाण्या व दुःखद गोष्टी सांगितलेल्या आहेत, त्यावरून कम्युनिस्ट पोलिसी राज्यांतील पद्धतींचें साम्य स्पष्ट होतें. तें असें कीं, राजकीय दृष्ट्या अविश्व-सनीय असलेल्या लोकांना पकडून शेती व कारखाने यांत मजूर म्हणून राबवण्यांत दिसून येणारी या पद्धतीची उपयुक्तता.

● ● ●

# भाग अकरावा

## टिटोचा युगोस्लाव्हिया

आज युगोस्लाव्हिया हा एकच कम्युनिस्ट देश असा आहे कीं, जो सोव्हिएट रशियाच्या राजकीय किंवा आर्थिक नियंत्रणाखालीं नाहीं. तरीहि सोव्हिएट पद्धतीचा अंगिकार सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांच्या आधीं युगोस्लाव्हियानेंच केलेला आहे.

ह्या सोव्हिएट पद्धतीबरोबरच कम्युनिस्टांच्या राजकीय व आर्थिक धोरणाला उपकारक अशीं साधनें वेठ आणि वेठमजुरांच्या छावण्या ह्या गोष्टीही ओघानें आल्याच. वरिष्ठ व कनिष्ठ असे सर्व तथाकथित 'लोकाधिकारी' हे सुदृढ स्त्रीपुरुषांना कांहीं काळ 'समाजसुधारणेचें काम' करावयास भाग पाडूं शकत. ह्या अधिकाऱ्यांनीं महायुद्धानंतर तीन वर्षें आपल्या अधिकाराची अंमलबजावणी हवी तशी केली. आणि प्रतिवादीला पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणेल त्याप्रमाणें न चुकतां शिक्षा ठोठावण्यांत आली. कारण प्रतिवादी आणि त्याचा वकील यांना कोर्टापुढें पुरावा आणायला संधीच दिलीजात नसे.

## युगोस्लाव्हियानें वेठ सौम्य केली

टिटो हा रशिया व कोमिनफॉर्म यांमधून फुटून बाहेर पडल्यानंतर या वेठीच्या शिक्षेंत कांहीं काटछाट झाल्याचा पुरावा मिळतो. स्वतंत्र टिटोशाहीनें कांहीसें निराळें अर्थ–धोरण पत्करल्याचा हा परिणाम असावा असें दिसतें. अवाढव्य आणि अवास्तव–महत्त्वाकांक्षी औद्योगिकरणाच्या कार्यक्रमांना मर्यादा घातल्या गेल्यामुळें फेब्रुवारी १९५३ मध्यें सक्तीची सामुदायिक शेती सोडून देण्यांत आली. अर्थात् नव्या कार्यक्रमाप्रमाणें मनुष्यबळाची

गरजाहि कमी झाली. संभाव्य राजकीय विरोधहि कमी झाल्यानें शिक्षाहि कमी झाल्या. शिवाय युगोस्लाव्हियानें आपलें राजकीय स्वातंत्र्य राखण्याचें ठरविल्यावर एकपक्षीय पोलिसी राज्याच्या चौकटींतहि कायदेशीर हक्कांना अधिक मान्यता मिळाली. ८ आक्टोबर १९५१ पासून पूर्वींचा ' सुधारणे-साठीं श्रम ' हे नवीन कायद्यांनीं आणि नियमांनीं बरेंचसे मवाळ केले आहेत. परंतु जुन्या वेठकऱ्यांच्या छावण्या अजून नाहींशा झालेल्या नाहींत किंवा पूर्वीं शिक्षा मिळालेल्या कैद्यांनाहि सोडलेलें नाहीं. वस्तुतः कायद्यांत बदल झालेला असूनहि वेठपद्धत अजून आहे असें कबूल केलें जातें. ४ जून १९५१ ला कम्युनिस्ट पार्टीच्या मध्यवर्ति समितीच्या सभेपुढें भाषण करीत असतांना अलेक्झांडर रॅन्कोव्हिक या गृहमंत्र्यानें सक्तमजुरीवजा दिसणाऱ्या कैदेचें वर्णन स्वतः केलें आहे. गुप्त पोलिस खातें या मंत्र्याच्या कारभारांत मोडतें. कम्युनिस्टांच्या अतिरेकी उत्साहाबद्दल खेद प्रकट करून तो म्हणाला कीं, गुप्त पोलिसांनीं १९४९ सालीं पकडलेल्या लोकांपैकीं ४७ टक्के लोकांची धरपकड ही अन्यायाची होती. आणि पुन्हा तपासानंतर पकडलेल्या लोकांना सोडावें लागलें.

## युगोस्लाव्हियांतील वेठीचें स्वरूप आणि व्याप्ति

पाश्चिमात्यांच्या दृष्टीनें पहातां कम्युनिस्ट युगोस्लाव्हियांतील कोर्टांनीं शिक्षा दिलेल्या लोकांची संख्या विश्वास न बसण्याइतकी मोठी आहे. १९४८ मध्यें १२८१०८; १९४९ मध्यें ९३५९८; १९५० मध्यें १३६३९६, गृहमंत्र्यांनीं अधिकृतपणें दिलेले हे आंकडे आहेत. कोर्टांनीं वेठीची शिक्षा दिलेल्या लोकांखेरीज अंमलबजावणी खात्याच्या हुकुमांवरून राष्ट्रांसाठीं सक्तीनें वेठीसाठीं भरती करून वेठकऱ्यांच्या छावणींत रवानगी झालेले पण मोजदाद न झालेले असे हजारों लोक आहेत. देशांतील एकंदर दीड कोट लोकवस्तीपैकीं तीन लक्ष युगोस्लाव्ह लोकांना तीन वर्षांच्या कालावधींत पकडून कम्युनिस्ट तुरुंगांत घातलेलें होतें. असें अधिकृत आंकडे सांगतात.

ऱ्या पकडलेल्या लोकांपैकीं निम्या लोकांना पूर्ण तपासानंतर निरपराधी म्हणून सोडून द्यावें लागलें. तुलनेनें पूर्वीची स्थिति सांगायची म्हटली तर १९२८ साली तुरुंगांत असणारांची एकंदर संख्या ९ हजारापेक्षां कमी होती.

युगोस्लाव्हियांतील वेठीची योजना रशिया अगर त्याच्या अंकित राष्ट्रांत जशी आहे तशाच प्रकारची आहे. बांजीसाची येथील नाझींची कुप्रसिद्ध वेठकऱ्यांची छावणी हा सर्वांत मोठा कम्युनिस्ट तुरुंग म्हणून आतां अस्तित्वांत आहे. त्याच्यांतील इमारती वाढवल्यानें तो आणखीच मोठा झाला आहे. बोर आणि ट्रेप्का खाणींत हजारों वेठकरी काम करीत आहेत. औद्योगिक कारखाने आणि रेल्वे मार्गाची बांधणी या दोन्ही कामांवर आणखी कित्येक हजार कैदी सक्तीनें कामाला लावलेले आहेत. रेल्वे रस्त्यांच्या कामावर असणाऱ्या कैद्यांसाठीं रेल्वे रस्त्यांच्या मार्गानें स्झबॅक–कोविल्जेसा, व्हाल्जेव्हो, झ्वोर्निक येथें आणि पेक व प्रिझेन येथें छावण्या आहेत. सर्व्हिया आणि क्रोशिया येथें जास्तींत जास्त छावण्या असल्या तरी बऱ्याचशा देशभर सर्वत्र पसरलेल्याहि आहेतच.

## ‘ गुन्हेगार ’ मिळविण्याचे युगोस्लाव्हियाचे मार्ग

कोमिनफॉर्मपासून युगोस्लाव्हियानें स्वतःची फारकत करून घेतल्यापासून युगोस्लाव्हियांतील अल्बेनियन् लोकांचें जीवन दुहेरी धोक्याचें झालें आहे. कम्युनिस्ट अल्बेनिया हें पूर्णपणें रशियानिष्ठ असें अंकित राष्ट्र राहिल्यानें पूर्वीचे टिटोभक्त असे समजण्यांत येणारे अल्बेनियनहि कोमिनफॉर्मचे अनुयायी म्हणून शत्रूचे हस्तक असे समजले जातात. कोस्मत, ओटॅहोवो येथें या अल्बेनियन् कैद्यांसाठीं खास छावणी आहे.

कॅथॉलिक पंथीय, पुराणमतवादी आणि मुसलमान असे धर्मीय पुढारी येथें बंदिस्त असून त्यांपैकीं बऱ्याच जणांना सक्तमजुरी करावी लागते. १९४८ मध्यें कोमिनफॉर्ममधून फारकत झाल्यापासून धार्मिक संस्थांना बरेंच

स्वातंत्र्य मिळाल्यासारखें दिसतें. तरीहि प्रार्थनेखेरीज इतर धार्मिक कृत्यांवर सरकारची मुळींच कृपादृष्टी नसते.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी व युद्ध चालू असतां सरकारला ज्यांनीं विरोध केला होता, त्यांच्याविरुद्ध अत्यंत कडक धोरण सरकारनें अंगिकारलेलें आहे. कोमिन-फॉर्मला सहानुभूति असणारांनाहि कडक शासन होतें. मिहैलोविकच्या चेट्निक्सचे सभासद हे आपोआपच गुन्हेगार ठरले. आणि कम्युनिस्ट सत्ता प्रस्थापित होतां क्षणींच तांतडीनें त्यांना न्याय दिला गेला. युद्धपूर्व सरकारशीं संबंधित असलेले, कम्युनिस्टविरोधी चळवळ करणारे आणि नाझींचे विरोधक हे सर्व गुन्हेगार समजले गेले.

लांछन लावून एखाद्याला अपराधी कसें ठरविण्यांत येई हें एका उदाहरणा-वरून लक्षांत घेण्यासारखें आहे. १९४५ सालीं कम्युनिस्ट सत्ताधारी झाल्या-बरोबर एका युगोस्लाव्ह विधवा स्त्रीला पकडण्यांत आलें. तिचा अपराध एवढाच होता कीं, तिचा पति युद्धपूर्व युगोस्लाव्ह सरकारचा एक महत्त्वाचा अधिकारी होता. पतीला मरून कांहीं वर्षे झालीं असलीं तरी तिच्या पतीच्या 'पापाचीं' फळें तिनें भोगलीं पाहिजेत अशी कम्युनिस्ट सरकारची मागणी होती. तिला ६ वर्षांची वेठीची शिक्षा झाली. पोझारेव्हॅक येथील तुरुंगात ती ६ वर्षे होती.

एडव्हर्ड बुकोव्सेक्ला महायुद्धांत जर्मन सैन्यांत दाखल करून घेण्यांत आलें होतें. जर्मनींतील त्याची नोकरी झाल्यावर त्याला रशियाविरुद्ध स्वारीवर पाठविण्यांत आलें. त्याला रशियनांनीं कैद केलें. १९४७ पर्यंत तो रशियांतच कैदी म्हणून होता. पुढें त्याला १९४८ मध्यें इतर कैद्यांबरोबर युगोस्लाव्हिया सरकारच्या स्वाधीन करण्यांत आलें. युगोस्लाव्ह सरकारनें त्यांना जुब्जाना येथें आणलें. आणि ज्यांच्या त्यांच्या प्रांतांत खटल्यासाठीं पाठविलें. बुको-व्सेकला स्लोव्हेनियांतील सेल्जे गांवीं पाठविण्यांत आलें. तेथें त्याची चौकशी होऊन लष्करी कोर्टानें त्याला २० वर्षे वेठीची शिक्षा ठोठावली. त्यानें युगोस्लाव्हियांतील निरनिराळ्या ११ छावण्यांतून व तुरुंगांतून काम केलें. शेवटीं जानेवारी १९५२ मध्यें पोल्जॅन्स्की नॅसिपहून तो पळून गेला.

१९५२ एप्रिलमध्यें तो सरहद्दीवरून ऑस्ट्रियांत पळाला. त्याची साक्ष ही युगोस्लाव्हियांतील छावण्या व तुरुंग यांच्या माहितीसाठींच महत्त्वाची आहे असें नाहीं तर वेठपद्धतीची सुधारणा ज्या कालावधींत झाली त्या कालांत तो तेथें असल्यानेंहि त्याच्या साक्षीला महत्त्व आहे.

त्याच्या सांगण्याप्रमाणें पाहिलें तर फारच थोडी सुधारणा छावण्यांत झाली आहे. झाले कँप ही एक छावणी आहे. इतर छावण्यांच्या मानानें लहान अशा या छावणींत अंदाजें हजार कैदी होते. त्यांतच कित्येक धर्मोपदेशकहि होते. अधिकारी आणि कैदी या दोघांकडून धर्मोपदेशकांचा अवमान होई व त्यांना कडवट वागणूक मिळे. बहुसंख्य कैदी राजकीय असले तरी सामान्य गुन्हेगारहि तेथें होते. ते म्हणजे जणूं तुरुंगांतील उमराव असे असत. त्यांना सोपीं कामें मिळत आणि त्यांना पक्षपातानें वागवीत.

सावा नदीवर एक विजेचा कारखाना उभा करण्याच्या कामावर तसेंच लिटोस्ट्रोज येथें एक इमारत बांधण्याच्या कामावर बरेंचसे वेठकरी घेतलेले आहेत. अत्यंत दुरवस्थेंत काम करावें लागतें. तुरुंगांतील आहार हा त्यांच्याकडून करवून घेतल्या जाणाऱ्या भयंकर श्रमांच्या मानानें अपुरा असतो.

लुब्लियानापासून २० किलोमीटर्सवर एक पूर्वीचा उर्सुलीन जोगिणींचा मठ होता. त्याच मठांचें रूपांतर तुरुंगांत करून तेथें ७०० कैदी ठेवलेले आहेत. ही इमारत म्हणजे ६०० वर्षांच्या जुन्या किल्ल्यापैकीं एक भाग असून कित्येक शतकें बव्हेरियांतील कैसिंगच्या बिशपांची रहाती जागा होती. या तुरुंगापासून जवळच असलेल्या एका मोटारीच्या कारखान्याला मजुरांचा पुरवठा केला जातो. तुरुंगापासून कारखान्यापर्यंतच्या रस्त्याला दोन्ही बाजूंना कुंपण घातलेलें असून कारखान्याभोंवतीं संपूर्णतः कांटेरी तारांचें कुंपण घातलेलें आहे. बहुसंख्य कामगार हे राजकीय कैदी आहेत. पण नेहमींप्रमाणेंच साधे गुन्हेगारहि तेथें आहेत आणि दुसऱ्या कैद्यांवर ते हेरगिरी करतात.

इथ छावणींत जो आहार दिला जातो तो तुरुंगाचा म्हणून मासलेवाईक आहार आहे. न्याहारी म्हणजे एक कप काळी कॉफी. सबंध दिवसांत ६००

ग्रॅम ( म्हणजे १ पौंड ) ब्रेड दिली जाते. मधल्यावेळीं कैद्यांना पावटे, बार्ली, कोबी किंवा दुसरी कोणती तरी भाजी आणि नांवाला थोडी चरबी यांचें एक पॉइंट सूप मिळतें. रात्रीचें जेवण म्हणजे कोबी किंवा पावटे घातलेल्या मत्स्याचें असतें. सर्व छावण्यांत इग्ची छावणी ही जास्तच कुप्रसिद्ध आहे. कारण तेथें अमानुषहृदयी कमांडरची देखरेख आहे.

मेडव्होड नांवाच्या, दुसऱ्या एका कँपांत आहार आणि कामाची परिस्थिति अतिशय ' तिरस्करणीय ' असल्याचें जुने कैदी सांगतात. ही छावणी प्रत्यक्ष गृहमंत्र्याच्या हुकुमतीखालीं असून अतिशय ' वाईट ' ठरलेले राजकीय कैदी येथें ठेविले जातात. कामाचे तास रोजीं ८ असतात. तेवढ्या तासांच्या पाळींत ८ जणांनीं मिळून १२० क्यूबिक मीटर खणलेला दगड गाड्यांतून भरायचा किंवा त्यांमधून बाहेर काढायचा हें किमान काम ठरलेलें असतें. हें एवढें काम म्हणजे भरपूर खायला मिळणाऱ्या माणसालाहि जडच वाटणारें आहे. ८ तासांत हें काम संपत नाहीं; मग कामाची ही किमान मर्यादा गांठीपर्यंत काम तसेंच करवून घेतलें जातें.

कोर्टानें किंवा पोलिसांनीं शिक्षा दिलेले कैदी देशभर निरनिराळ्या बांधकामाच्या योजनांत गुंतलेले आहेत. सैन्यासाठीं बराकी, इस्पितळें, कारखाने बांधणें किंवा अशींच दुसरीं कामें त्यांच्याकडून करवून घेतलीं जातात. सबंध पोलिस खातें, तुरुंगखातें आणि वेठकऱ्यांच्या छावण्या ह्या गोष्टी गृहमंत्र्याच्या हुकमतीखालीं आहेत. तो बेलग्रेड मधील एका वृक्षाच्याकडे बंगल्यांत राहतो.

युगोस्लाव्हियांत देशासंबंधीं बरेच कायदेशीर लेखी पुरावे असले तरी त्याचा अर्थ इतर कोमिनफॉर्म देशाहून तेथील स्थिति अधिक बिकट आहे, असें नव्हे. तर त्याचा अर्थ एवढाच कीं सर्व कम्युनिस्ट देशांपैकीं युगोस्लाव्हिया हाच एक देश असा आहे कीं, जो वेठपद्धति अस्तित्वांत असल्याचें उघडपणें कबूल करतो. उलट सोव्हिएट व त्याचे अंकित इतर देश यांनीं मात्र आपली अंतर्गत परिस्थिति कळूं नये म्हणून लोहभिंती आपल्या भोंवतीं उभ्या केल्या आहेत.

वाचनालय

# भाग बारावा

## ‘ नवा ’ चीन

चीनमधील वेठपद्धतीसंबंधीं प्रकाशित वाङ्मय अगदीं थोडें असलें तरी स्वतंत्र व्यापारी संघाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेनें संयुक्त राष्ट्रांच्या समितीपुढें कांहीं पुरावा सादर केला आहे. हाँगकाँगहून निसटलेल्या चिनी लोकांकडून कांहीं माहिती मिळाली आहे. चीनमध्यें स्वतंत्र चीन मजदूर समितीच्या ( फोर्मोसा ) गुप्त हेरांनीं दिलेली माहिती आणि चिनी वर्तमानपत्रांवरून मिळणारी प्रकाशित माहिती येथें जमेस घेतली आहे.

प्रचंड नव्या योजनांसाठीं कामें करणाऱ्या मजुरांची भरती फार मोठ्या प्रमाणावर केली असल्याचा पुरावा मिळतो. धरणें, रेल्वेमार्ग, कालवे हे राजकीय शत्रु किंवा विरोधी समजल्या जाणाऱ्या लोकांतून सक्तीनें मजूर भरती करून बांधले जात आहेत. सक्तीनें भरती केलेल्या मजुरांची संख्या दहा लाख असावी असा सर्व पुराव्यावरून अंदाज करतां येतो. पंचेचाळीस कोटी लोकवस्तीच्या कम्युनिस्ट देशांत हा आंकडा फार नाहीं. स्वतंत्र चीन मजदूर संघाच्या अंदाजाप्रमाणें ५१४७ छावण्यांत एक कोटी ८० लक्षांहून अधिक वेठकरी असावेत. हिंदुस्थानच्या श्रीमती व्ही. एल्. पंडित या नुकत्याच चीनला जाऊन आल्या. त्या चिनी कम्युनिस्टशाहीच्या विरोधक नाहींत. एका प्रचंड धरणावर वेतनाशिवाय काम करण्यासाठीं २० लाख लोकांची भरती केलेली आहे, असें त्यांचें म्हणणें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

“ २३ आक्टोबर १९५१ ला राष्ट्रीय राजकीय सल्लागार समितीकडे परराष्ट्र मंत्री चौ एन लाय यांनीं सादर केलेल्या अधिकृत धोरणासंबंधींच्या अहवालांत असें कबूल केलें आहे कीं. शिक्षा झालेल्या राजकीय कैद्यांना

' सुधारण्यासाठीं ' सक्तमजुरीला लावण्यांत येतें. अध्यक्ष माव त्से तुंग यांच्या सुचनेप्रमाणें शिक्षा भोगावयास लावतांना पुढील तत्त्वें पाळलीं जावीं.

प्रतिक्रांति करूं पाहणारांचे पुढारी हे देशांचें ऋण रक्तानेंच फेडूं शकतात. ज्याच्याविषयीं जनतेला विलक्षण घृणा आहे त्यांना फांसावर लटकावलें पाहिजे. देशाच्या हिताला फार मोठा धक्का ज्यांनीं लावलेला आहे त्यांना मृत्यूचीच शिक्षा देऊन फांसावर लटकावलें पाहिजे. ज्यांनीं रक्तानेंच आपल्या ऋणाची भरपाई केली पाहिजे असें नाहीं पण जे मृत्यूच्या शिक्षेस पात्र आहेत, जनता ज्यांच्याबद्दल फार घृणा बाळगीत नाहीं, ज्यांनीं देशांचें नुकसान केलें पण अत्यंत गंभीर स्वरूपाचें नाहीं; त्यांच्या बाबतींत मृत्यूची सजा द्यावयाची पण दोन वर्षें ती सजा देण्याचें थांबवून त्याना वेठीसाठीं पाठवावयाचें व त्यानंतर त्यांच्यांत काय बदल होतो तो पाहावयाचा असें धोरण आहे. "

" पेपिंग जनतेची दैनंदिनी " ही अधिकृत मानली तर तिच्यांतील एका परिच्छेदाप्रमाणें पहातां मृत्यू टाळावयाचा असेल तर कम्युनिझमचा स्वीकार हेंच राजकीय कैद्यांत होणारें परिवर्तन अपेक्षिलेलें आहे. तिच्यांत म्हटलें आहे.

" दोन वर्षें पुढें ढकललेली मृत्यूची शिक्षा याचा अर्थ दोन वर्षांनीं लगेच सुटका असा नाहीं. दोन वर्षांत काय साध्य झालें हें पाहून मगच मृत्यूची शिक्षा द्यावयाची कीं नाहीं हें ठरविलें जाईल. त्याचें काम समाधानकारक झालेलें नसलें किंवा आपणांमध्यें परिवर्तन घडवून आणण्यास ते असंतुष्ट असले तर त्यांची मृत्यूची शिक्षा केव्हांहि अंमलांत येईल. सुधारण्याची नुसती तयारी जरी दर्शविली तरी त्यांची मृत्यूची शिक्षा कमी करून कांहीं मुदतीपर्यंतची जन्मठेप त्यांना दिली जाईल. "

' जेन मिन् जेन पाव ' या आणखी एका पेपिंगच्या वर्तमानपत्रांत लो युई चिंगचे उद्गार उधृत केले आहेत. ते असे कीं, " प्रतिक्रांतिवाद्यांना वेठीला लावणें हाप्रतिक्रांतिवाद्यांचा वर्ग नाहींसा करण्याचा अटळ मार्ग आहे."

साहजिकच प्रतिक्रांतिवादीच आणि राजकीय दृष्ट्या अविश्वसनीय ठरलेले लोकच वेठकरी म्हणून भरती केले जातात असें नव्हे तर त्यांची राजकीय

मतें विचारांत न घेतांहि जनतेंतील कित्येक वर्ग वेठीसाठीं भरती केले जातात. चेन हॅन पो या पूर्वीच्या कम्युनिस्ट अधिकाऱ्यानें कम्युनिस्ट सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर लगेच लिहिलेल्या ' आजचा पैपिंग ' या पुस्तकांत रस्त्यांवर भीक मागणाऱ्या सुमारें एक लाख भिकाऱ्यांसंबंधीं असें म्हटलें आहे.

" गुप्त पोलिसांनीं एक दिवस ठरविलें कीं, या लोकांनीं उत्पादनाचें काम केलें पाहिजे. लगेच सर्व सशस्त्र पोलिसदल एकाएकीं गल्ल्यागल्ल्यांतून शिरले आणि अत्यंत तत्परतेनें त्यांनीं सारे भिकारी गोळा करून त्यांची दोन गटांत वर्गवारी केली. मांचूरियाच्या रानांत घोडे आणि जनावरें यांची निगा ठेवण्याचें काम करण्यासाठीं म्हाताऱ्या आणि अशक्त लोकांना पाठविण्यांत आलें आणि पीन नदीच्या प्रदेशांत व शानहैक्वान् जवळ असलेल्या खाणींत काम करण्यासाठीं तरुण व सुदृढ लोकांना वेठबिगारीसाठीं छावण्यांत पाठवून दिलें.

कम्युनिस्ट चीनमधील वेठीच्या हकिकतीचें मूल्यमापन करितांना सादर केलेले आंकडे ' अतिशयोक्त' म्हणून नजरेंआड करण्यापूर्वीं बऱ्याच गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. अत्यंत प्रचंड लोकवस्ती, दीर्घकाल चाललेली यादवी, मोठमोठ्या बांधकामाच्या व उद्योगधंद्याच्या कम्युनिस्ट योजना, सोव्हिएटच्या आर्थिक जीवनाशीं चीनची झालेली एकरूपता या सर्व कारणांनीं अत्यंत तांतडीनें पद्धतशीर वेठपद्धति अस्तित्वांत आली. पुरावा जरी बेताचाच मिळाला तरी कम्युनिस्ट चीनच्या पोलिस राज्यांतील आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवनांत वेठीला केवढें मोठें स्थान आहे याबद्दल संशय उरत नाहीं.

## ग्रंथकर्त्याच्या दृष्टीनें

आतांपर्यंत सादर केलेला पुरावा हा कांहीं ठिकाणीं तुटक तुटक किंवा अपुरा आहे असें वाटलें तरी त्यावरून कम्युनिस्ट हुकुमशाही राष्ट्रांत अत्यंत निर्घृण अशी वेठपद्धति अस्तित्वांत आहे याबद्दल मुळींच संशय रहात नाहीं. या वेठपद्धतीनें ' समाजसत्तावादी पुनर्रचनेसाठीं ' अकुशल मनुष्यबळ राबवून

द्यावयाचें असें ठरविलें असतें. आणि हें मनुष्यबळ म्हणजे राजकीय विरोधक किंवा ‘ अविश्वसनीय ’ ठरविलेल्या लोकांचें असतें. गरजेप्रमाणें मजुरांची भरती करतांना त्यांचें हातून कोणता राजकीय गुन्हा घडला याचा उल्लेख नसतो. श्रमिक वर्गाला ह्या योजना म्हणजे संकटच आहे. स्वतःच्या निवडीचे उद्योग करून स्वतःच्या कुटुंबियांत रहावयाचें हा जो मनुष्याचा हक्क तो या पद्धतीनें नीचपणानें हरण करून घेतलेला आहे. या ग्रंथानें कुतूहल उत्पन्न होऊन संयुक्त-राष्ट्रें या दुष्ट पद्धतीवर जो हल्ला करीत आहेत त्याला पाठिंबा मिळाला तरी राजकीय जुलमाला अर्थपूर्ण प्रतिकार केल्याचें खरें समाधान लेखकाला मिळेल.

कम्युनिस्ट पोलिसी राज्याच्या धोक्याच्या आघाड्यांपैकीं एकीवरच हल्ला करणें व्यर्थ आहे आणि कम्युनिस्टशाहीचा नाश किंवा तिचे एकदम लोक-शाहींत रूपांतर करणें याशिवाय दुसरा कोणताहि उपाय हा व्यवहार्य नाहीं, असें कोणी म्हणतील. हें म्हणणें कांहींसें बरोबर असलें तरी त्यांत ह्या दुष्ट पद्धतींचें खरें स्वरूप जनतेसमोर उघडें करून त्यांच्यामध्यें हळूंहळूं सुधारणा घडणें शक्य आहे, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होतें. शस्त्रांचा उपयोग न करतां जर कम्युनिस्ट पोलिस राज्याचा विस्तार खंडित करावयाचा असेल तर अविवेकानें पछाडलेले आणि निराशेनें खचलेले लोक कम्युनिझमकडे वळूं नयेत एवढ्या-साठीं त्यांना त्याबद्दलचें सत्य सांगणें हाच मार्ग आहे. मनुष्यत्वाची प्रतिष्ठा राखायला कम्युनिस्ट राष्ट्रांना भाग पाडावयाचें असेल तर तें कार्य जगांतील जनतेच्या मतप्रभावानेंच साध्य होईल. वेठपद्धतीबद्दल जसजसें अधिक ज्ञान होईल, धार्मिक छळाच्या कहाण्या अधिक कानांवर येतील, धार्मिक पंथ व आर्थिक निरनिराळे वर्ग कसे नष्ट केले जातात, यांची जसजशी माहिती मिळेल तसतसा कम्युनिझम हा मनुष्यजातीचा नीचपणें व तुच्छतेनें कसा उपमर्द करीत आहे, हें सत्य उघड होईल.

● ● ●

## वेठीसंबंधींचे कायदे

### रशिया

सोव्हिएट वेठ-मजुरीची पद्धतच युरोपीय अंकित राष्ट्रांनीं आपल्याला सोयीची करून घेऊन स्वीकारली. वेठीच्या पद्धतीची वाढ होण्यास ३० वर्षे लागलीं परंतु तिला आतांचें स्वरूप प्राप्त झालें तें १ ऑगस्ट १९३३ मध्यें जो मजूर सुधारणा कायदा झाला त्यानेंच. सोव्हिएट विश्वकोशाची १९४० सालची ४७ व्या खंडाची जी आवृत्ति आहे, तींत 'वेठ' या शब्दाखालीं असें लिहिलें आहे:—

" समाजवादी सोव्हिएट रशियाच्या गुन्हेगारीच्या कायद्याप्रमाणें वेठ हें शिक्षेचें अत्यंत मूलभूत स्वरुपाचें कलम समजलें जातें. वेठीचे प्रकार दोन :— एक असा कीं, आरोपीला सामुदायिक मजूर-यंत्रणांनींच चालवलेल्या कामासाठीं वेठीला धरणें आणि दुसरा असा कीं आरोपीला त्याच्या नेहमींच्याच जागीं कामाला जुंपणें. या दुसऱ्या प्रकारांत आरोपीला काम करायला लावून त्याच्या पगारांत शेंकडा २५ टक्के कपातीची शिक्षा दिली जाते. मात्र कामानंतरच्या वेळांत आरोपीवर कुठलींहि बंधनें नसतात. क्रिमिनल कोडामध्यें ज्यांना वेठीची शिक्षा देतां येईल अशा गुन्ह्यांची यादी दिलेली आहे.प्रतिक्रांतीच्या गुन्ह्यांसंबंधीं कोडाच्या ५८व्या कलमांत असें म्हटलें आहे:—

" पुढील प्रत्येक कृत्य हें क्रांतिविरोधी समजलें जाईल, ज्या कृत्यांचा परिणाम (१) शेतकरी कामकऱ्यांच्या सोव्हिएटचा अधिकार उलथून पाडण्यांत, पोंखरून टाकण्यांत किंवा दुबळा करण्यांत होईल, असें कृत्य किंवा ज्या कृत्यामुळें सोव्हिएट रशियाची सुरक्षितता धोक्यांत येईल असें

कृत्य किंवा ज्या कृत्यानें कामकऱ्यांच्या क्रांतीमुळें झालेल्या आर्थिक, राजकीय किंवा राष्ट्रीय लाभांची नुकसानी होईल असें कृत्य."

५९ व्या कलमाखालीं सांगितलेला गुन्हा हा "सरकारच्या शासन पद्धतीच्या विरोधासंबंधींचा" आहे. पण यांत सोव्हिएट सत्ता प्रत्यक्ष उलथून पाडण्याच्या कृत्याचा समावेश नाहीं. विशेषतः शासन पद्धतीविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांत क्रांतिविरोधी उद्देश नसला तरी, जर त्याचा परिणाम राज्यसत्ता खिळखिळी करण्यांत किंवा सोव्हिएट रशिया व लोकसत्ताक राज्यें यांचें आर्थिक सामर्थ्य खच्ची करण्यांत होत असेल तर असले गुन्हे हे सोव्हिएट रशियाच्या दृष्टीनें विशेष भयावह होत.

वेठीच्या शिक्षांमध्यें प्रती आहेत. उदा. निर्वासित होऊन चारित्र्य सुधारण्यासाठीं करावी लागणारी वेठमजुरी ही सर्वांत कडक शिक्षा होय. त्या वेठमजुरींत पुढील कामें करावीं लागतात. (कोडेक्स १०१ कलम)

(अ) सरकारी सहकारी पद्धतींतील किंवा सामाजिक योजनांतील कामासाठीं वेठबिगार.

(ब) चारित्र्य–सुधारक श्रमसंस्थांनीं मुद्दाम तयार केलेल्या योजनांतून करावी लागणारी वेठ बिगार.

(क) अशा श्रमसंस्थांनीं सरकारी व सहकारी पद्धतींतील अधिकाऱ्यां-साठीं कंत्राटांनीं चालविलेल्या सांघिक कामासाठीं करावी लागणारी वेठबिगार.

(ड) वसाहतींत सांघिक कामासाठीं करावी लागणारी वेठ बिगार.

या कलमाखालीं शिक्षा झालेल्या माणसांना सोव्हिएट रशियाच्या अगदीं दूरवरच्या कोपऱ्यांत पाठविण्यांत येतें. त्या ठिकाणचें जीवन अत्यंत खडतर असतें.

## झेकोस्लोव्हाकिया

१ आक्टोबर १९४५ च्या कामासंबंधींच्या हुकुमनाम्यांत (डिक्री नं. ८८ दि कलेक्शन ऑफ लॉज) वेठीसंबंधीं कायदेशीर तरतूद झेकोस्लोव्हाकियांत

केलेली आहे. २५ ऑक्टोबर १९४८ ला सक्तीच्या मजुरीसंबंधीं पूर्वी झालेल्या कायद्यांना मागें टाकणारा वेठीच्या छावण्यांचा कायदा पास झाला. (लॉ. नं. २४७, दि कलेक्शन् ऑफ लॉज ) कलम २ ( १ ) अ म्हणतें:- १८ वर्षें पूर्ण झालेले आणि ६० वर्षांहून अधिक वय नसलेले, शरीरानें व मनानें सुदृढ असलेले जे लोक कामचुकारपणा करतात किंवा लोकशाहीच्या व्यवस्थेंत किंवा राष्ट्रीय आर्थिक जीवनांत गोंधळ करूं पहातात, ते लोक या छावण्यांत पाठविण्यांत येतील.

१९५० मध्यें हा कायदा मागें घेतला गेला तरी याहून वेठबिगारीला निश्चित स्वरूप देणारा कायदा अस्तित्वांत आला. तो म्हणजे १२ जुलै १९५० चें नवें क्रिमिनल कोड.

१२ जुलै १९५० ( लॉ. नं. ८६, १९५० ) च्या क्रिमिनल कोडाच्या वेठबिगारीच्या छावण्यासंबंधींच्या ३६ व्या कलमांत असें म्हटलें आहे:—

" एखादा गुन्हा करून ज्यानें लोकांच्या लोकशाही व्यवस्थेला उघडपणें असें धोरण दाखविलें असेल, त्याला शिक्षा झाल्यावर ती तो भोगीत असतांना आपल्या कामानें अगर आचरणानें ज्यानें स्वतःमध्यें पुढें सुधारणा होईल अशी आशा दाखवलेली नाहीं; त्याला त्याची सर्व शिक्षा भोगून झाल्यावर तीन महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत वेठबिगारीच्या छावणींत पाठविलें जाईल. "

कलम १२ पोट कलम ३, क्रिमिनल कोड फॉर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲथॉरिटीज् ( लॉ. नं. ८८, १९५० ) पुढें म्हणते—

" गुन्हेगारानें ज्या पद्धतीनें लहान गुन्हा केला त्या पद्धतीवरून जर असें स्पष्ट झालें कीं, जनसत्ताक राज्याच्या लोकशाहीला विरोधक किंवा समाजसत्तावादाच्या स्थापनेला बाधक कृत्य करण्याचें गुन्हेगाराचें धोरण होतें किंवा तो तसें बाधक कृत्य करीत होता, तर त्याला तीन महिन्यापासून दोन

वर्षें इतक्या मुदतीपर्यंत वेठीच्या छावणींत राहण्याची शिक्षा होईल. आणि क्रि. कोडच्या खास कलमानें लहान गुन्ह्यासाठीं जी दंडाची शिक्षा होते, त्याहून दुप्पटी इतका अधिक दंडहि गुन्हेगाराकडून घेतां येईल. तसेंच स्थानबद्धतेची शिक्षा व दंडवसुला न झाल्यानें त्याबद्दली होणारी वेठीची शिक्षा या वेठबिगारी छावण्यांत भोगावी लागेल.

## हंगेरी

कम्युनिस्ट हंगेरीमध्यें सक्तमजुरी किंवा सक्तमजुरीच्या छावण्या यासाठीं विशिष्ट तरतूद कायद्यांत केलेली नाहीं. तरीहि पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या मधल्या काळांत युद्धकालीन उपाययोजना म्हणून कांहीं कायदे पास केले आहेत. १९२० च्या सुमारास हंगेरींत जी गोंधळाची परिस्थिति निर्माण झाली ती दडपून टाकण्यासाठीं कायदे केले गेले, ते अजूनहि कम्युनिस्टांनीं काढून घेतलेले नाहींत. या युद्धपूर्वकालीन कायद्याखालीं आजहि हंगेरींत एखाद्या व्यक्तीला सक्तीनें मजुरीला लावतां येते. संशयित वाटणाऱ्या किंवा जनराज्याच्या धोरणाबद्दल सहानुभूति नसणारांना कैद करण्याचा अधिकार गृहमंत्र्याला आहे. आणि अशा रीतीनें कैद केल्या गेलेल्या व्यक्तींना सनदशीर न्यायालयांकडे दाद मागण्याची व्यवस्था नाहीं.

गृहमंत्र्यानें १९३९ सालीं पास केलेला कायदा हा अशा छावण्यांच्या स्थापनेबाबतचा मूलभूत कायदा म्हणावयास हरकत नाहीं. या कायद्यांच्या १२ व्या कलमाप्रमाणें :–

" गृहमंत्री कांहीं ठिकाणच्या योग्य अशा मोठ्या इमारती कैद्यांच्या छावण्यासाठीं ताब्यांत घेऊं शकतो.

१६ व्या कलमाप्रमाणें :– " छावण्यांत ठेवलेल्या लोकांनीं आपल्या कुवतीप्रमाणें काम केलें पाहिजे. परंतु शरीराला धोका पोहोंचेल असें तें काम नसावें. "

१७ व्या कलमाचा अर्थ पाहतां या छावण्या स्वत: सिद्ध असण्यासाठीं उपयोग केला जातो. "कैद्यांना सरकार पुरवठा करील आणि त्याबद्दल कैद्यांनीं स्वतःच्या मिळकतींतून किंवा मजुरींतून पैसे द्यावे."

कायद्याच्या आणखी एका कलमानें गृहमंत्री ६ महिने मुदतीची शिक्षा देऊं शकतो आणि ती मुदत वाढविणें त्याच्या मर्जीवर अवलंबून असते.

बल्गेरिया

"शैक्षणिक श्रम करणाऱ्या जमातींसाठीं एक कायदा करण्यांत आला. (दुर्झव्हेन वेस्तनिक नं. १५, २० जानेवारी, १९४५) हा कायदा उघड उघड पतित लोकांना छावण्यांत घालण्यासाठीं होता. जुगारी, भिकारी वेश्या आणि सामान्य स्वरूपाच्या गुन्ह्याखालीं एकाहून अधिक वेळां शिक्षा झालेले लोक जर सरकारला किंवा जनतेच्या सुव्यवस्थेला धोक्याचे असतील तर कलम १ प्रमाणें त्यांचा छावण्यांत समावेश होत असे."

दुसरा कायदा म्हणजे शैक्षणिक श्रम करणाऱ्या जमातींसंबंधींचा कायदा असून तो राजकीय दृष्ट्या धोकेबाज वाटणाऱ्या लोकांसाठीं होता. वेठीला कोणाला लावावे यासंबंधीं व्यापक मर्यादा त्यानें घातली. कलम १ असें आहे. सरकारचें सुरक्षण व सुव्यवस्था यांना धोका पोहोंचविणारांना, शैक्षणिक श्रमांसाठीं ज्या खास जमाती सरकारी शेतांवर किंवा सरकारी निरनिराळ्या योजनांवर किंवा खेड्यांतून स्थापिलेल्या आहेत, तेथें जनतेच्या पोलिसांच्या देखरेखीखालीं ठेविलें जाईल."

अतिशय सूचक आणि सर्वव्यापी असा बल्गेरियांतील वेठीसंबंधींचा कायदा म्हणजे जनतेच्या पोलिसांबद्दलचा कायदा (दुर्झव्हेन वेस्तानिक, नं. ६९, मार्च २५, १९४८).

चौकशीवांचून ज्यांना वेठबिगारीच्या छावण्यांत ठेवतां येते, त्या लोकांचा वर्ग इतका व्यापक करण्यांत आला कीं, गृहमंत्री आतां अनिश्चित आणि

संशयास्पद गुन्ह्यांसाठीं कोणालाहि शिक्षा देऊं शकतो. या कायद्याचें ५२ वें कलम असें:--

"जे फॅसिस्ट असतील किंवा लोकाविरोधी कृत्यें करीत असतील, जे जनतेच्या सुव्यवस्थेला धोका आणतात, आणि सरकारच्या सुरक्षणाला धोका आणतात किंवा जे भयंकर खोट्या बातम्या प्रसृत करतात, त्या लोकांना शैक्षणिक श्रमाच्या जमातींत किंवा नव्या वसाहतींत ठेवण्याचा जनतेच्या पोलिसांना अधिकार आहे."

५४ व्या कलमांत "नव्या वसाहतींत तात्पुरतें किंवा कायमचे पाठविण्याची" सोय आहे.

२० जानेवारी १९४५ चे दोन कायदे काढून घेऊन त्या ऐवजीं हा कायदा झाला. त्या कायद्यानें कोणत्याहि बल्गेरियन् माणसाला चौकशी-शिवाय केवळ गृहमंत्र्याच्या हुकुमावरून पकडण्याची सर्व कायदेशीर व्यवस्था झाली आहे.

## रुमानिया

रुमानियाच्या कायद्यांत वेठबिगारीची निश्चित तरतूद नाहीं तरी मजूर भरतीचे हुकूम आणि गुन्हेगारांना सक्तश्रमाला लावण्यासंबंधींचे कायदे यामुळें वेठबिगारी निर्माण झाली. नानातऱ्हेच्या कायद्यांखालीं मिळणाऱ्या शिक्षांमुळें खाणी किंवा औद्योगिक योजना, सार्वजनिक कामांच्या योजना यांत काम करावें लागतें. २७ फेब्रुवारी १९४८ ला एक नवा गुन्हेगारीसंबंधीं कायदा झाला. त्यानें जनतेविरुद्ध गुन्हे करणाऱ्यांसाठीं ठरविण्यांत आलेल्या शिक्षेच्या तऱ्हा अधिक व्यापक झाल्या. गुन्हेगाराला त्यामुळें कैदेंतच घालतां येतें असें नव्हे तर औद्योगिक योजनांवर सक्तीनें कामाला लावतां येतें. (क्रिमिनल कोड, २८ वें आर्टिकल ७ वा परिच्छेद).

"वर निर्देशिलेली कैदेची मुदत (दोन वर्षे, त्याहून कमी किंवा अधिक) संपल्यावर वेठीला धरलेल्या कैद्याला सर्वांबरोबर आणि मुकाट्यानें श्रम करावयाचे असतात. हे श्रम खाणींतील सार्वजनिक कामांत किंवा एखाद्या औद्योगिक योजनेंत करावयाचे. रात्रीं त्याला कोठडींतच ठेवावयाचें. खाणींतील काम संपल्यावर कैद्याला बाहेर नेऊन रात्रीं कोठडींत ठेविलें पाहिजे."
याच कोडाच्या ३२ व्या आर्टिकलचा, ५ वा परिच्छेद असा आहे.

कठोर कैदेची शिक्षा झालेल्या कैद्यानें वेठकामाच्या ठिकाणीं औद्योगिक किंवा वेठकामाच्या ठिकाणाबाहेर सार्वजनिक उपयुक्ततेचें काम शिक्षा म्हणून पार पाडलें पाहिजे."

मजूरभरती पुरेशी व्हावी म्हणून कोर्टें व अंमलबजावणी करणाऱ्या संस्था यांना कम्युनिस्टशाहीला विरोध करण्याच्या 'गुन्ह्या'खालीं लोकांना कैद करण्याचे व चौकशीसाठीं आणण्याचे अधिकार आहेत.

## पोलंड

१६ नोव्हेंबर १९४५ च्या कायद्यान्वयें एका खास बोर्डाची नेमणूक झाली. या कायद्यानें राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला हानिकारक ठरणारीं कृत्यें व त्या अर्थव्यवस्थेविरुद्ध होणारे गुन्हे यांच्यावर उपाययोजना करण्यांत आली आहे. हें बोर्ड म्हणजे एक निराळी शासनसंस्था असून, नागरिकांना विना-चौकशी वेठबिगारीच्या छावण्यांतून बंदींत टाकण्याचे तिला अधिकार दिलेले आहेत. वरील कायद्यांत दुरुस्ती करून पुढें त्याचा समावेश ३१ ऑगस्ट १९५० च्या मुख्य-प्रधानाच्या कायद्यांत करण्यांत आलेला आहे. आणि त्याचाच सध्यां अंमल चालू आहे. या कायद्याचें पहिलें कलम असे :—सदर बोर्डाला पुढील गुन्ह्याचे खटले चालवितां येतील:— ज्या खटल्यांतील गुन्हे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनाला धोका असणारे असतील; विशेषत: ज्यांत सार्वजनिक मालमत्तेची अफरातफर, लांचलुचपत सट्टेबाजी आणि कामगारवर्गाच्या हिताला धोक्यांत आणण्यासाठीं निर्माण केलेला घबराट इत्यादींचा समावेश

होतो असे गुन्हे. सदर खास बोर्डाला या कायद्यान्वयें वरील गुन्हे, आणि त्यांच्यासारख्याच गुन्ह्यांच्या विस्तृत क्षेत्रांवर शासनाधिकार दिलेले आहेत. कलम ६ प्रमाणें त्याला आणखी पुढील अधिकार दिलेला आहे. कामाच्या कंटाळ्यामुळें गुन्ह्याचें कृत्य घडलें असेल किंवा गुन्ह्याचें कृत्य धोक्याचें असून त्याचा परिणाम गैरकारभार (abuses), आणि आर्थिक नुकसानींत (sabotage) होत असेल अशाहि गुन्ह्यांचा बोर्डानें समाचार घ्यावयाचा आहे.

एखाद्या नागरिकावर वरील कलमाप्रमाणें गुन्हा शाबीत झाल्यावर त्याला त्याच कायद्याच्या ७ व्या कलमाप्रमाणें वेठबिगारीच्या छावणींत जास्तींत जास्त दोन वर्षेंपर्यंत बंदींत ठेवतां येतें. व १५०,००० झ्लोटीपर्यंत दंडाची शिक्षा देतां येते.

वेठबिगारीच्या छावणींत अडकविण्याची शिक्षा ज्या गुन्ह्यांना सांगितली आहे अशा गुन्ह्यांचे खटले आरोपीला आपला बचाव करण्यासाठीं वकील देण्याचा अधिकार न देतां चालविलें जातील अशी तरतूद वरील कायद्याच्या ९ व्या कलमाप्रमाणें केली आहे. खास बोर्डानें दिलेल्या शिक्षेविरुद्ध अपील नाहीं.

हा कायदा मुख्य मंत्री, न्यायमंत्री, संरक्षणमंत्री, सार्वजनिक सुरक्षा मंत्री, यांना त्यांच्या स्वतःच्या अधिकारांत जारी करतां येतो.

याप्रमाणें वरील कायद्यानें कोणालाहि खटला, बचावाची संधि किंवा शिक्षेविरुद्ध अपील, याशिवाय निव्वळ राज्यकारभाराच्या व्यवस्थेच्या नांवाखालीं वेठबिगारीच्या छावणींत बंदिवान करितां येतें.

(याप्रमाणें वरील कायद्यानें कुणालाहि वेठबिगारीच्या छावणींत जखडून टाकतां येतें. न्यायालयासमोर त्याचा खटला चालण्याची गरज नाहीं. आरोपीला बचावाची संधि नाहीं. शिक्षेवर अपील नाहीं. फक्त राज्यकारभाराच्या व्यवस्थेच्या नांवाखालीं तें केलें म्हणजे झालें.)

१९४८ च्या राजकीय आणि आर्थिक बारमाही अहवालांत वरचें खास बोर्ड आणि वेठबिगारीच्या छावण्या याविषयीं एक पुरें प्रकरण आहे. खरा

बोर्डाला २१ ऑगस्ट १९५१ च्या कायद्याखालीं माणसांना असल्या छावण्यांत टाकण्याची शिक्षा देण्याचा अधिकार असल्याचें नमूद आहे. ४१७ पानावर आणि पुढें, असल्या छावण्यांचा उद्देश थोडक्यांत सांगितला आहे.

"कायद्यानें या छावण्यांतून सक्तीच्या बिगारीची शिक्षा देतां येते, आणि असल्या छावण्या या समाजापासून अगदीं अलग असलेल्या पाहाऱ्यांतल्या जागा असतात. अर्थातच असल्या छावण्यांतील बंदीवास म्हणजे वास्तविक तुरुंगवासाचीच शिक्षा होय. मजुरी हा शिक्षेचा एक मुख्य भाग असतो. त्यामुळें या बिगार छावण्यांना शिक्षा आणि शिक्षण यांच्या साधनाचें स्वरूप येतें. आजच्या काळाची गरज अशीच आहे. कारण या दिवसांत आपण दुसऱ्यांचें रक्त पिऊन जगणाऱ्यांची गय करतां कामा नये. मग ही त्यांची वृत्ति आळस, उचापतखोरी ( racterees ) किंवा काळ्या बाजारांतील उलाढाली यापैकीं कशानेंहि निर्माण झालेली असो."

## जुगोस्लाव्हिया

जुगोस्लाव्हियाच्या सांघिक लोकसत्तेनें राष्ट्र संघाकडे १७ जुलै १९५२ ला एक अहवाल सादर केला आहे. गुन्ह्यांसाठीं वेठबिगारीची शिक्षा देणें क्रिमिनल कोड २ मार्च १९५१ च्या २४ व्या कलमाखालीं रद्द केल्याचें त्यांत म्हटलें आहे तरीहि जुगोस्लाव्हियांतील अजून कांहीं कायदे असें आहेत कीं त्याखालीं होणाऱ्या शिक्षेचें स्वरूप आरोपीला वेठबिगारीच्या छावण्यांत डांबून टाकण्यासारखेंच आहे. आणि त्यासाठीं आरोपीच्या हातून घडलेलीं कृत्यें वर सांगितलेल्या गुन्ह्यांइतकीं मोठ्या अपराधाचीहि असावी लागत नाहींत असें दिसून येतें.

४ डिसेंबर १९४७ चा लहान गुन्ह्यांसंबंधीं मूलभूत असा ( basic ) कायदा आहे. सरकारच्या शासन विभागांत व्यवस्थापक( Administrative ) खातीं असतात. त्या खात्यांना, उदाहरणार्थ, गृहमंत्री यांना, या कायद्याखालीं

आरोपींना लहानसहान गुन्ह्यांबद्दल सुधारक बिगारीसाठीं ( correctional labor ) बंदींत टाकण्याचा अधिकार दिला आहे. पण ४ डिसेंबर १९४७ च्या त्या कायद्याच्या जागीं ८ ऑक्टोबर १९५१ चा ४२४ नंबरचा कायदा पास करून जारी करण्यांत आला. लहानसहान अपराधांबद्दलच्या सर्वसाधारण कलमांची जंत्री ( General code ) हा तो कायदा. हा कायदा म्हणतो कीं, लहान अपराधाबद्दल दिली जाणारी शिक्षा म्हणजे दंड किंवा तुरुंगवास ही असेल ( विभाग ६ प्यारा १ ) तो कायदा पुढें असेंही म्हणतो कीं, ८ ऑक्टोबर १९५१ नंतर माणसांना सुधारण्यासाठीं त्यांना वेठीला धरणें किंवा ताकीद देणें या शिक्षा कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं दिल्या जाऊं नयेत ( अधोरेखन ग्रंथकर्त्याचें ). त्याच कायद्याच्या १५९ व्या कलमांतील दुसऱ्या परिच्छेदाप्रमाणें या कायद्याची अंमलबजावणी झाल्यावर अशा सुधारक वेठीला धरलेल्या लोकांना वेठीऐवजीं तुरुंगवासाची शिक्षा द्यावी. यावरून असें दिसतें कीं, बारीकसारीक गुन्ह्यांबद्दल पकडलेल्यांना ‘ सुधारक वेठी ’ ला लावण्याची पद्धति रद्द करून त्याऐवजीं तुरुंगवास सुरू झाला.

१९५१ च्या कायद्याच्या १५५ व्या कलमाप्रमाणें पूर्वीच्या प्रत्येक जनसत्ताक राज्यानें लहान लहान गुन्ह्यांसाठीं केलेले कायदे व हुकूमनामे हे नव्या संघराज्यानें केलेल्या कायद्याशीं जमवून घ्यावयाचे आहेत. दिनांक ८ ऑक्टोबर १९५१ च्या कायद्यांत विशिष्ट जागीं स्थानबद्ध करण्याची तरतूद नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक गणराज्याला अशा तऱ्हेनें स्थानबद्ध करावयाचे प्रत्यक्ष अधिकारहि दिलेले नाहींत. परंतु प्रत्येक जनसत्ताक राज्यानें इतर कांहीं गोष्टींबरोबर असे कायदे केले. त्या कायद्यांनीं ‘ राजकीयदृष्ट्या अविश्वसनीय व्यक्तींना सहा महिन्यापासून २ वर्षांपर्यंतच्या मुदतींत विशिष्ट ठिकाणीं स्थानबद्ध करण्याची तरतूद करून घेतली. पण या ठिकाणीं कामें कोणतीं करवून घ्यावयाची हें सांगितलेलें नाहीं. ( उदाहरणार्थ, ६ डिसेंबर

१९५१ चा कायदा पहा. मॉन्टेनेग्रोच्या जनसत्ताक राज्यांतील लहान गुन्ह्यांबाबतची केलेली तरतूद मॉन्टेनेग्रोच्या जनसत्ताक राज्यांतील सरकारी गॅझेटमधील लहान गुन्ह्यांसंबंधींच्या मूलभूत कायद्याशीं ( नं. २७–२८, कायदा नं. १५३, ३१ डिसेंबर, १९५१ ) जमवून घेण्यासाठीं हा कायदा केलेला होता. )

याचा परिणाम असा झाला आहे कीं, चालू संघराज्याच्या कायद्यांत एखाद्याला चौकशीविंचून डांबण्याला कायदेशीर आधार उघड उघड नसला तरी प्रत्येक जनसत्ताक गणराज्यानें ' विशिष्ट जागीं स्थानबद्ध ' करण्यासाठीं केलेल्या तरतुदींनीं तो कायदेशीर आधार मिळाल्यासारखाच झाला आहे. या स्थानबद्धतेची सांगड वेठीशीं घातलेली असण्याचा संभव आहे. ' सुधारणेचे उपाय ' किंवा ' सामाजिक उपयुक्त कार्य ' अशीं त्या वेठींचीं नांवें आहेत. पण असा निष्कर्ष काढण्यासाठीं प्रत्यक्ष आधारभूत कायदे केलेले दिसत नाहींत. अंमलबजावणीच्या विशिष्ट पद्धतीनें लोकांना अजून वेठीच्या छावण्यांत ठेविलें जात आहे, अशी कबुली मिळत असूनहि लहान गुन्ह्यांसंबंधींचा, युगोस्लाव्ह संघराज्याचा कायदा किंवा जनसत्ताक गणराज्यांचा कायदा अशा तऱ्हेच्या पद्धतीला आधार दाखवीत नाहीं.

● ● ●

अनुक्रमांक 5092
30762
ग्रंथ
2383
IRBK-0105312
IRBK-0105312